Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ३ आगष्ट सन १८७३ इ० | अंक ३१

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| मागाहून अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| " दुसरे खेपेस | ८२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. अकोल्यांतील ब्रह्मवृंदाविषयीं थोडी हकीकत कळवितों ती छापण्याची कृपा व्हावी.

हीसपुरकर गंगाराम पंत पांड्ये ह्मणून आहेत त्यांची बहीण सौभाग्यवती तुळसाबाई हिचा नवरा सुमारे बोस वर्षें परागंदा आहे त्याचा पत्ता नाहीं पाठीमागें त्याचें कुटुंब तारुण्यावस्थेच्या गडबडींत गरोदर झालें व ते बारशीटाकळी जवळ शेलगावीं जाऊन बाळंत झालें व मुलगा वणजाऱ्याला देऊन सुटसुटीत होऊन माघारें अकोल्यास आलें. त्यांच्या बधूनीं ब्रह्मवृंदाला सांगितलें कीं आमची भागिनी कृतकर्माविषयीं आतां पश्चात्तापी आहे. तिला अनुग्रह व्हावा. त्यावरून धर्माधीकाराचें कंकण हातांत मिरविणारे भाउभटजी यांनीं घोंगे प्रमुख भटजी कडून संमती मिळवून तिला तीर्थ देऊन शुद्ध करून ब्राह्मणांत घेतली. गेले बुधवारीं टोलेजंग ब्राह्मण भोजन त्यानिमित्त झालें व भाऊभटाच्या पायाचें मळकट पाणी पिऊन स्वच्छ झालेल्या तुळसाबाई त्यांत सोवळ्यानें मिरवल्या ती गोष्ट आपले वाचकांत कळावी या हेतून लिहून कळविली आहे प्रसिध्ध व्हावी.

एवढ्या महद्दोषाला इतकें सुलभ प्रायश्चीत देण्याची धर्माधिकारी जाहिरात देतील तर दुसऱ्याही कित्येक बायाबापड्या त्यांकडे येतील व भटांची पोळी पिकेल कळावें हें विनंती.

अकोला तारीख २८ माहे आगष्ट

एक प्रपस्थ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.—

वि. वि. आपल्या गेल्या अंकांत खालीं लिहिलेल्या आर्येचा अर्थ स्पष्ट व्हावा ह्मणून कोणी जिज्ञासूनें आपणास विनंती केलेली माझ्या अवलोकनांत आल्यावरून त्या आर्येचा अर्थ यथामतीनें लिहून पाठविला आहे. तरी आपण कृपा करून आपल्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

अनलसमीहित साधी राया वारा महीवरा कामा ॥ अनलस मीहि तसा धीरा याया रामही वरा कामा ॥ १ ॥

हे राजा पृथ्वी पते धीरा जसा वारा अग्निनें इच्छिलेलें काम साधितो तसा मीही तुझ्या कामाविषयीं आळस टाकिला तेव्हां बळराम ही येईलच मग लक्ष्मी कोण श्रेष्ट १ ॥–

यांत न्युनाधिक्य असल्यास वाचक कळवितील तर त्यांचे मजवर फार उपकार होतील. ही आर्या वनपर्वांत आहे धर्मराज व श्रीं कृष्ण यांचें परस्पर संभाषण होत असतां श्री कृष्णाच्या उक्तीचें पंतांनीं वरील आर्येंत वर्णन केलें आहे.

अशा प्रकारच्या आर्या आणखीही माझ्या अवलोकनांत आल्या आहेत पैकीं खालीं लिहिलेली एक आर्या जर आपण आपल्या वाचकांपुढें ठेवाल आणि त्यांजला तिचा अर्थ आपल्या पत्रांत कळविण्या विषयीं विनंती कराल तर मी आपले फार आभार मानीन.

॥ आर्या ॥

पृथुकामावरमागेंअर्यायाश्रीस कायश्रीदामा ॥ पृथुकामावरमागें, अर्यायाश्रीसकायश्रीदामा ॥ १ ॥

"क्ष"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या शंकेला आपले पत्रीं जागा द्याल अशी अशा आहे.

सन१८७२चा इंडिया चा पुराव्याविषयीं आक्ट १ कलम ६५ टीप (अ) हींत दुय्यम पुरावा देण्यापुर्वीं '६६ कलमाप्रमाणें नोटिस दिली पाहिजे असे तीन प्रसंग दाखविले आहेत त्यांतील दुसरा प्रसंग खालीं लिहिल्याप्रमाणें.

„एकादा मनुष्य कोर्टाच्या प्रोसेसाबाहेर आहे अथवा त्या प्रोसेसाला पात्र नाहीं अशा मनुष्याच्या अथवा" सदरील अक्टातील कलम६६याचे उत्तरभागांत नोटिस देणें अवश्य नाहीं असे प्रकार दिले आहेत त्यांतील ६ वा प्रकार खालीं लिहिल्या प्रमाणें.

„(६) जेव्हां तो दस्तऐवज ज्याच्या कबज्यांत आहे तो मनुष्य कोर्टाच्या प्रोसेसा बाहेर आहे अथवा त्या प्रोसेसाला पात्र नाहीं असें असेल तेव्हां सदहू" दोन्ही कलमांतील वर लिहिलेले भाग परस्परांशी आगदीं विरुद्ध आहेत तेव्हां यांतून ग्राह्य मत कोणतें या संशयांत मी पडलों आहे ह्मणजे ज्या गोष्टीबद्दल कलम ६५ टीप [अ] यांत नोटिस दिली पाहिजे असें आहे त्याच गोष्टीला नोटिस देणें अवश्य नाहीं असें कलम ६६ यालील सहावे प्रकारांत लिहीलें आहे.

या संशयाची योग्य निवृत्ति कोणी कायदे जाणणार वर्तमानपत्रद्वारें करतील अशी इच्छा आहे. कळावें तारीख २८ जुलाई सन १८७३ इसवी.

एक समाधान इच्छिणारा.

## जगाचा इतिहास.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. ईश्वरानें सृष्टीच्या आरंभीं आकाश आणि पृथ्वी उत्पन्न केली असे ह्या इतिहासकर्त्याचें ह्मणणें आहे परंतु पृथ्वी आकाशापासून उत्पन्न झाली किंवा स्वतंत्रतेनें उत्पन्न झाली याचा बोध या इतिहासावरून आम्हास होत नाहीं म्हटलें असतां झाला पाहिजे. कारण जगाचा इतिहास म्हणजे केवळ बाबीलन शहर अथवा माइनास राजा वगैरे एकदेशीय इतिहास लिहून त्यास जगाचा इतिहास ह्मणणे हें केवळ अप्रबुध्धत्व आहे.

हिंदु लोकांनीं असें स्थापित केलें आहे कीं प्रथमतः आकाश उत्पन्न झालें त्यापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी अशीं पांच महाभूतें उत्पन्न झालीं. आतां यांत जरी कांहीं अपवाद आहेत तरी युक्तीच्या वाटें हे मत जितकें ग्राह्य दिसतें तितकें पहिलें दिसत नाहीं जगाचा इतिहास ह्मणतो प्रथम पृथ्वीच्या रजःकणापासून आदमपुरुष उत्पन्न झाला व त्यापासून एक स्त्री उत्पन्न झाली तिचें नाव ईव त्यास हें ह्मणणें असंभव्य आहे कारण पृथ्वीच्या रजःकणापासून पुरुष उत्पन्न झाला तशी स्त्री होण्यास काय हरकत, होती एकटा पुरुष उत्पन्न होऊन, त्यापासून स्त्री उत्पन्न झाली असें कां मानिलें हिंदु लोकांनीं प्रथमारंभी स्त्रीपुरुषांचा जोडा उत्पन्न झाला असें मानिलें आहे तें ह्यापेक्षां विशेष ग्राह्य आहे.

मागें विविधज्ञानविस्तार कर्त्यांनीं हल्लींच्या इंग्लिश पंडितांचे मत असें स्थापिलें होतें कीं तें पंडीत जगारंभी प्राणी जलचर झाले असावेत असें ह्मणतात, तदनरूपच आमच्या आवतारांचा क्रम आहे तसला प्रकार या इतिहासांत यावयाचा होता कारण हा जगाचा इतिहास आहे. जर असें वर्णन करावयाचा हेतु नसेल तर जगांतील मनुष्य प्राण्यांचा, इतिहास असें नांव ठेवण्याचें होतें. असा एकदेशीय इतिहास मनुष्य प्राण्याकरितां करून मुंबई, इलाख्यांतील सहाव्या यत्तेकरितां, त्याची योजना केली आहे ही फारच अयोग्य, गोष्ट झाली असें म्हणणें प्राप्त होतें.

यापेक्षां जगाची उत्पत्ती कसी झाली कोण कोणचे प्राणी कसकसे उत्पन्न झाले मनुष्य प्राण्यानें आपलें ज्ञान कसें व कोणत्याद्वारें वाढवून घेतलें त्यांचे उत्कर्षापकर्ष कसें, कोणत्या कारणांनीं घडत आले इत्यादि विषयांवर कोणी एखादा शोधक पुरुष ग्रंथ लिहील तर तो सर्वांस मान्य होऊन जगाचा खरा इतिहास मानेल. निम्राड राजा कधीं, झाला सिमिरामीस राणीनें कसें राज्य केलें यांत कांहींच हाशील नाहीं जगाचा इतिहास व्यक्तिवाचक असूं नये सर्वसाधारण असला पाहिजे तरच शोभेल.

एक वाचक

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १० शके १७९५

## अकोलाम्युनिसिप्यालिटीनें काय करावें?

अकोल्यास म्युनिसिप्यालिटीची स्थापना होऊन आठ दहा वर्षें झालीं. वर्षास सुमार पांच सात हजारांचें तिला उत्पन्न आहे, असें असता नित्य नियमित कामाशिवाय लोकोपयोगाचें ह्मणण्यासारखें विशेष काम या कमिटीपासून कांहींच झालेंले नाहीं. हें पाहून वाईट वाटतें. एखादी सडक बांधण्याकरितां, गटार करण्याकरितां, गोड्या पाण्याच्या सोयीकरितां अगर दिवाबत्तीकरितां काणे सालीं एक हजार रुपये देखील खर्चीं पडलेंले कोणास ठाऊक नाहीं. इतकी निकृष्ट स्थिति कमिटीची कां आहे? व ती सुधारण्यास योग्य आहे किंवा नाहीं याचा विचार तींत असणाऱ्या मेंबरांनीं केला पाहिजे. अकोला शहर फार मोठें आहे असें नाहीं. तरी त्यांत अजून पक्क्या सडक होत नाहींत, बांधीव गटारें होत नाहींत, रात्रींचा दिवा लागत नाहीं, व गोड्या पाण्याचे हौद गावांत होत नाहींत. असें जर आहे तर मग फक्त भंगीलोकांवर, त्यांच्या कचऱ्यांच्या गाड्यांवर व त्यांच्या झाडलोटीवर नजर ठेवण्याकरितांच एवढे मोठमोठाले गृहस्थ कमिटींत मेंबर पाहिजे आहेत काय? आम्हाला वाटतें कीं, त्यांना हा वृथैव शीण आहे. कमिटीच्या खटाटोपाप्रमाणें निदान हजार दोन हजार रुपये तरी वर्षास नव्या कामाकरितां उरले पाहिजेत किंवा अवश्यक कामें म्हणून कमिटीने सरकाराकडून कर्ज काढून तरी रस्ते, पाणी, दिवे यांच्या सोयी लोकांना करून दिल्या पाहिजेत व तें कर्ज जमा वाढवून किंवा सेव्हिंग करून व्यवस्थित पणानें वारलें पाहिजे. असें करणें कमिटीचें कर्तव्यकर्म आहे. व तें तिनें न केलें तर कमिटी असून नसून सारखी आहे असें आम्हास वाटतें.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं, मागील दोन वर्षांत पोलिसाचा पगार कमिटीकडून मिळावयाचा तो पोलिसानें मागितला नाहीं सबब तो पसा आतां त्यास न

देतां दुसरे कांहीं लोकोपयोगी कामाकडे लावावा असा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला आहे. ती रक्कम व दुसरी कांहीं मिळून सुमार ८००० रुपये कमिटीच्या शिलकेंत हल्लीं आहेत तर त्यांचा खर्च कमिटी कोणत्या कामीं करणार हें अजून समजलें नाहीं. आम्हास वाटतें कीं, कमिटीनें या पैशाचें तरी कांहीं उत्तम व लोकांस अवश्यक असें काम करावें.

स्यानिटरी कमिशनर यानीं गावांतील जुने पेवांचे पायखाने होते ते काढवून निकालाचे करण्याविषयीं सुचविलें त्या प्रमाणें पांच सहा महिने वाटाघाट होऊन आतां ती गोष्ट अमलांत आली आहे. गावांतील पेवांचे पायखाने कमीं झाले ही गोष्ट फार चांगली झाली, पण त्याच्या बदल्यांत दुसरी एक घाण लोकांच्या दृष्टीपुढें आली, निकालाचे पायखाने केल्यानें दरघरागणीत मैला काढून नेण्याच्या खिडक्या झाल्या आहेत त्याचा दुर्गंध आतां चालू लागेल व त्या खिडक्या नजीकच पायखान्यांतील मोऱ्यांचे निकाल लोकानीं केले आहेत व त्याला बाहेर रस्त्यावर डाहरीं केलीं आहित त्यांत दररोज पाणी जमून दुर्गंधी चालेल व ती लोकांस असहनीय होईल अशी करना आहे. याचें कारण गावांत रस्त्यांचे बाजूला गटारें नाहींत. पक्कीं गटारें झाकल्या तोंडाचीं करून मोऱ्यांचे निकाल त्यांत करविले असतां ही दुर्गंधी कमी होईल सबब आतां अशा प्रसंगीं गटारांची फार अवश्यकता आहे या गोष्टीकडे म्युनीसिप्यालिटीनें लक्ष्य द्यावें अशीं आम्ही तिला सूचना करितो.

दुसरी एक गोष्ट—शहरांत गोड्या पाण्याचें फार दुर्भिक्ष्य आहे सबब या आठ हजार रुपयांनीं व अधिक पैसा सरकार देईल तर त्यानें येऊं शकेल तर नदीचा नळ गावांत आणून थोडे तरी हौद करावे- नदीच्या पाण्याहून गावाची उंची अधिक आहे सबब गावाजवळ एक धरण करून यंत्रानें पाणी नळांत सोडावें व तें हौदांस पुरवावें असें झालें तर लोकांची मोठी सोय होईल. पेठेंत गोड्या विहिरी जागोजाग आहेत सबब तिकडे गावा इतकी तादृश गरज नाहीं गावांत एक विहिर गोडी होती तीही तीन वर्षांपूर्वी खारी होऊन गेली आहे सबब ही रयतेची अडचण मनावर घेऊन म्युनिसिप्यालिटी ती दूर करण्यास झटेल तर लोकांस तिची फार आठवण राहील.

या दोहोंतून कोणती गोष्ट कमिटी करते तें पहावें. कमिटीस आमची इतकीच प्रार्थना आहे कीं ८००० रुपये वेळोवेळ जमणार नाहींत सबब त्यांचा अन्यथा खर्च होऊं नये सरकारी नोकरावर नवीन पोलिसपट्टी बसल्यानें तें एक उत्पन्न कमिटीस नवीन झालें आहे. व दुसरें ही एक मोठें उत्पन्न कमिटी सरकारास मागत आहे तें तिला मिळालें तर तिच्या हातून पुष्कळ चांगलीं कामें होतील पुढचें पुढें असो, पण प्रस्तुत लोकांस प्यावयाला पाणी व रोग न होण्याला गटारांची स्वच्छता इतकें अवश्य पाहिजे.

---

## वऱ्हाडची भूगोलविद्या.

या नांवाचें एक लहानसें पुस्तक शाळा खात्याच्या उपयोगाकरितां रा. रा. चिमणाजी राजाराम पाठक उमरावती जिल्ह्याचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यांनीं तयार करून मुंबईस इजुकेशनल सोसैटीचे छापखान्यांत छापिलें त्याची एक प्रत त्यानीं आम्हांस पाठविली तिचा आदरपूर्वक आह्मी स्वीकार करितों.

हें पुस्तक मोडी पाहिल्या बुकाएवढें असून मोडी लिपींतच छापलेलें आहे. याची किंमत दोन आणे आहे. या पुस्तकाचें हें नाव पाहून आह्मांस मोठा चमत्कार वाटला. वऱ्हाडचा भूगोलविद्या म्हणजे काय? भू म्हणजे पृथ्वी ती गोल ह्मणजे वाटोळी आहे म्हणून भूगोल असें साऱ्या पृथ्वीला म्हणतात व तत्संबंधी विद्येला भूगोलविद्या म्हणतात परंतु तिजवरील एकेका तुकड्याच्या वर्णनाला, भूगोलविद्या म्हणणें अशुध्ध आहे असें आह्मांस वाटतें हिंदुस्थानची भूगोलविद्या, इंग्लंडची भूगोलविद्या, मुंबईची भूगोलविद्या असें कधीं कोणी ह्मणत नाहीं असें असतां आमचे शाळांवरील तपासनीस चिमणाजीपंत असे म्हणतात त्या अर्थीं त्यांत कांहीं विशेष अर्थ असेल व तो ते आम्हास कळवितील तर फार चांगलें होईल. वऱ्हाडचें वर्णन किंवा वऱ्हाडची भू विद्या हें नाव नस्स झालें असतें असें आम्हांस वाटतें.

चिमणाजीपंतासारख्या विद्याखात्यांतील गृहस्थांनीं हें पुस्तक हातीं घेतलें तेव्हां तें मोठें, उत्तम व बहुत प्रकारच्या माहितीनें परिपूरित होईल. असें आम्हाला वाटलें होतें. पण तसें झाल्याचें पुस्तकावरून कांहीं दिसत नाहीं. त्यानीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं " माहिती आमच्यानें मिळूं सकली तितकी दिली आहे." परंतु जर हे ग्रंथ करावयास बसले तर अधिक माहिती मिळविणें यांचें काम होतें. मि॰ लायल साहेब यांनीं वऱ्हाडग्याझिटीयर म्हणून ग्रंथ केला आहे त्यांत या पुस्तकाच्या १०० पट माहिती आहे. त्यांनीं या पुस्तकाकरितां किती शोध केले. व किती भ्रमण केलें तें या ग्रंथकर्त्यांस ठाऊक नसेल असें वाटत नाहीं. साऱ्या वऱ्हाडांत लोणारचें सरोवर विख्यात आहे व त्याविषयीं स्वतंत्र ग्रंथही लिहितां येईल त्याविषयीं आमच्या पाठक रावसाहेबांनीं साडे तीन ओळी लिहिल्या आहेत. व त्यांत देखील इतकाच मजकूर आहे कीं या सरोवरांत क्षार उत्पन्न होतात व त्यांपासून सरकारांस कांहीं उत्पन्न होतें. वा:! किती विपुल माहितीही! असे ग्रंथ पुष्कळांस लिहित येतील तरें असो. माहिती आमच्यानें मिळूं सकली तितकी दिली आहे हें त्यांच्या प्रस्तावनेंतील वाक्य आहे याचा पुन्हा विचार करूं.

व्याकरणाच्या दृष्टीनें पाहिलें तर हें वाक्य केवळ अशुद्ध आहे. असें शाळेंतील मुलें ही सांगतील. आह्मांस माहिती मिळाली किंवा आमच्यानें मिळवली असें असावयाचें होतें. याच प्रस्तावनेंत शेवटाला लिहिलें आहे कीं " यांत कांहीं गोष्टींची कमताई आढळल्यास त्या मेहेरबानीनें कळविल्यास उपकार होतील." हें वाक्यही विशेष मौजेचें आहे. यांत त्या हें कोणाचें दर्शक आहे व ते अनेक वचनांत कां? याचा पत्ता लागत नाहीं. याप्रमाणें अंशतः पुस्तकाचें स्वरूप आम्हांस दिसलें तें वाचकांस कळविलें आहे. शिवाय या पुस्तकांत वऱ्हाडचा इतिहास मुळींच नाहीं हें एक व्यंग आहे. थोडा तरी संक्षिप्त इतिहास लिहावयाचा होता. व तो लिहून भूगोलविद्येच्या व्याख्या न लिहिते तर चालले असतें. अस्तु. चिमणाजीपंताकडून असा ग्रंथ आम्हि अपेक्षिला नव्हता. तरी आह्मांस आशा आहे कीं दुसरे प्रसंगीं तरी ते लोकांस आपल्या नांवाप्रमाणें उत्तम ग्रंथ देतील.

---

## वऱ्हाड

पश्चिम वऱ्हाडचे कमिशनर यांची स्वारी बुलढाण्याकडें गेली आहे.

—000—

मि॰ नौलिस साहेब अ॰ क॰ अकोलें यांस गेल्या महिन्यापासून ७०० रुपये पगार झाला.

—000—

ह्या आठवड्यांत ह्मणण्यासारिखा पाऊस पडला नाहीं. पावसावाचून शेतीची नुकसानी होत आहे. गुडघेमोडीचा आजार अजून गावांत आहेच.

—000—

रा. रा. सखाराम दत्तात्रय तहशिलदार हे त्यांची बदली झाल्याप्रमाणें अकोटास जाण्याकरितां येथें आले आहेत.

—00—

मे॰ क्यांडी साहेब शाळाखात्याचे डैरेक्टर या आठवड्यांत शेगावाकडे गेले होते.

—000

आह्मी ता॰ २० जुलईच्या अंकांत दोघां शिपायांनीं आपसांत मारामारी केली व त्यांत एकाचा प्राण गेला वगैरे मजकूर लिहिलाच आहे. आतां असें समजतें कीं तो मारणारा शिपाई वेडा ठरल्यामुळें त्यास सोडून दिलें. हल्लीं तो इसपितळांत आहे.

—000—

आमचा अकोटकर एक बातमीदार लिहितो कीं अकोटचे माजी तहशिलदार रा॰ रा॰ एकनाथराव यांनीं तेथून जाते वेळेस राधा गोसाविणीस सोडून दिलें व ती आतां गावोगाव भटकत फिरत आहे. हें जर खरें असेल तर एकनाथ रावानीं ही गोष्ट फार चांगली केली.

—000—

उमरावती (मित्राकडून) एथें पाऊस थोडा थोडा पडतो दिवसांतून एकादी सर येते गुरुवारीं दोन पहरीं भिजपाऊस चांगला पडला. एकंदरींत सालमजकुरीं पिकाला उत्तम असा पाऊस अजून पडला नाहीं. व नद्यानां पूर आले नाहींत.

डेंग्यु तापाचा आजार उमरावतीस तुमच्या अकोल्याप्रमाणेंच आला होता. आतांशा कमीहोत चालला आहे.

एथील हायस्कुलावर अकोल्याहून रा. रा. श्रीराम भिकाजी जठार बि. ए. हेड मास्तर येणार. त्याची लोक वाट पाहत आहेत. हायस्कुलांतील मुलांची संख्या अगदीं कमी झाली आहे व तें अगदीं डबघाईस आलें आहे अशा वेळीं श्रीरामपंतास नेमिलें आहे. तरी ते त्याची सुधारणा करितील अशी त्यांचे हुशारीवरून आशा आहे. मि॰ म्याकिंटाश साहेब यांस हें हायस्कूल सुधारण्याकरितां एक वर्षाची मुदत दिली होती ती अर्धीं संपली, फळ कांहीं झालें नाहीं व आतां तर त्यांनीं सहा महिन्यांची रजा घेऊन विलायत पाहिली. ही एक युक्तीच ह्मणावयाची, असेंही ऐकिलें कीं त्यांना वीस महिन्यांची रजा मिळाली अस्तु. श्रीरामपंत एथें येवोत व त्यांस त्यांच्या कामीं चांगलें यश येवो असें आम्हीं इच्छितों.

येथील आफिशीयेटिंग कमिशनर कर्नेल आलाडाइस साहेब यांस कायम करून पश्चिम वऱ्हाडाकडे अकोल्यास नेमणार असें वर्तमान आहे. असें झालें ह्मणजे मेजर बेल साहेब अकोल्याहून उमरावतीस येतील. मेजर नेंभार्ड साहेब डिसेंबर महिन्याचे सुमारास विलायतेहून परत येतील असें ह्मणतात.

एथील डिपुटि कमिशनरचे शिरस्तेदार रा. रा. परशरामराव यांस रेसिडेंट साहेबांनीं बरतर्फ केलें. हा ठराव फार सक्तीचा झाला असें लोक ह्मणतात. कमिटीचे कागदपत्र पाहिल्या शिवाय यांत कोणास न्यायान्यायाविषयीं कांहीं ह्मणता येत नाहीं. परशरामराव आतां एथून लवकरच कलकत्त्यास रेसिडेंट साहेबांचे हुकूमावर अपील करावयाकरितां जाणार आहेत. व रेसिडेंट साहेबांकडे ठरावाच्या व इतर जरूरीच्या कागदांच्या नकला मिळण्याविषयीं अर्ज करणार आहेत. त्यांना त्यांच्या कामांत सिद्धी मिळेल तर फार चांगलें होईल. त्यावर अमुक एक अपराध शाबिद झाला व त्याचें शासन बरतर्फी आहे असे प्रसिद्ध झालें नाहीं. व त्यांसही कळविलें नाहीं परशरामराव स्वभावानें चांगले असून स्नेहाचें त्यांस फार अगत्य आहे त्यामुळें थोडे विघ्न संतोषी लोक खेरीज करून सर्वांस वाईट वाटतें श्रीधरपंतानें त्यांचे नुकसानासाठीं कंबर बांधिली पण त्यांत त्याचेंही नुकसान झाल्या वाचून राहिलें नाहीं. बिचारा तरुण व होतकरू माणूस सर्वस्वी आंचवला दुसऱ्याचे नुकसानास प्रवृत्त होणारांनीं श्रीधरपंतांचें उदाहरण मनांत आणीत जावें.

परशरामराव यांची जागा अजून कायमची भरली नाहीं. इंग्लिश आफिसाकडील ६० रुपये पगाराचे क्लार्क रा. केशव जैकृष्ण हेच अजून काम पहात आहेत. त्या जागेविषयीं दोन तीन प्रकारच्या वार्ता आहेत. मि॰ आर्देसर दिनसाजी ह्मणून जो मुलगा नुकताच तहशिलदार केला आहे त्याला उमरावतीस क्लार्क आफ धि कोर्ट करणार असें ह्मणतात. बुलढाण्याचे क्लार्क मि॰ एदलजी जमशेटजी यांस ही जागा मिळेल असेंही कोणी म्हणतात.

तसे झाल्यास फार चांगले होईल. हे गृहस्थ मराठीचे माहित, विद्वान्, हुशार, सद्गुणी व काम केलेले आहेत. उमरावती हाय स्कूलांतील पाटील मास्तर यांसही दुसऱ्या खात्यांतल्या हवेची इच्छा झाली आहे असे दिसतें. कारण त्यांनींही शिरस्तेदारी मिळण्याविषयीं अर्ज केला आहे याचप्रमाणें इलिचपुर स्मा० कोर्टाचे क्लार्क रा. गोपाळ महादेव यांणींही अर्ज केला आहे. आतां कोणाला जागा मिळते पहावें.

एथील डिपुटी कमिशनरकडील नाझर रा. व्यंकटेश नारायण यांस इलिचपुरास घातले व तेथील नाझर एथें आणिले.

मोरशी तालुक्याचे तहशिलदाराकडे १०० रु५ पर्यंत दिवाणी दाव्यांचा अधिकार होता पण त्यांकडे मुलकी काम बरेंच तुंबलें होतें म्हणून त्याकडील दिवाणी काम रा. रा. नागोराव जयकृष्ण यांचे कोर्टाकडेस दिलें हो त्या तालुक्याचे लोकांनां मोठी गैरसोय झाली शिवाय रा. रा. भास्कर महेश्वर तहशिलदार काम चांगलें करीत असत मग असें कां केलें? कोण जाणे!

श्रीधर मोरेश्वर काळे यांस बरतर्फ केलें त्यांची कारंजाची ३० रुपयांची जागा सिताराम मोरेश्वर यांस दिली व खालीं कांहीं बर्गाबर्गी केली पण चमत्कार असा कीं शेवटील १५ रुपयांची जागा श्रीधरपंताचे बंधूस मिळाली असत्या परींत श्रीधरपंताचें कल्याणाचा हा मार्ग बराच निघाला. व निमें नुकसान भरून आलें. त्यांचे बंधूला ही जागा रा. रा. नागोरावजी यांचे आफिसांत मिळाली.

वऱ्हाडी लोकांशिवाय इतरांनां अशा जागा देऊं नयेत ह्मणून कमिशनर साहेबांचें सरक्युलर आहे पण या प्रसंगीं त्यांची डोळेझाक झाली असें दिसतें गणेश जिवाजी केळकर यांची ४० रुपयांची जागा रिकामी झाली ती इंग्लिश आफिसांतील आबाजी नारायण यांस दिली व दुसरा एक टोपीवाला त्यांचे जागेवर ठेविला बाजार कारकून इकडे काढलेले कित्येक आहेत त्यांतून कोणा कोणास प्रसंगानुसार नोकऱ्या दिल्या तर बरें होईल.

—000—

एलिचपुर—हवा गेले आठवड्यांत पाऊस बराच पडला येणें करून हवा बरीच सर्द झाली आहे. शेतकरी लोकांच्या पेरण्या बहुतकरून आटपत आल्या आहेत.

—000—

मे० पुरुषोत्तमराव यांची काम करण्याची पद्धत उत्तम रीतीची आहे. हल्लीं त्यांजकडे मुलकी, फौजदारी, दिवाणी, क्यांटनमेंट वगैरे किरकोळही कामें बरींच चालतात.

—000—

ता० १९ जुलई रोजीं पेठ सर्मसपुरा येथें रायपुऱ्यांतील रहाणार नारायण कोष्टी याचा कोणी गळा कापून टाकला त्या वेळीं पश्चिम स्टेशनचे चिफ कानस्टेबल यांणीं पंचानुमतें असें ठरविलें कीं, ममत इसम याणें आपले हातीं गळा कापून आत्महत्त्या केली. आतां असें ऐकण्यांत येतें कीं ममताचा भाऊ अंजनगावाहून आला आहे आणि त्याणें या कामांत अर्ज दिल्यावरून चौकशी होत आहे पुढें काय होईल तें पहावें.

—00•—

हल्लीं एलिचपूर तालुक्यांत वाघांचा उपद्रव बराच होत आहे. गेले आठवड्यांत शिरसगाव येथें वाघानें ३१४ बैल व आणखी एक दोन जनावरें मारलीं.

—000—

मेळघाटांत पाऊस बराच आहे.

—000—

ता० २९ जुलई रोजीं मे० डे० क० साहेबांचे कचेरींत परतवाडा येथील इंग्रजी मराठी शाळेचे हेडमास्तर रा. रा. विश्वासराव रघुनाथ जोशी यांस मागें रेसिडेंट साहेब बहादूर आल्या वेळीं शाळेची परिक्षा घेतली मुलांचा अभ्यास उत्तम दिसला व त्यांत सर्वांशीं विश्वासराव यांची मेहेनत कारण आहे असें साहेब बाहादुरांच्या नजरेस आल्या वरून शंभर १०० रु० इनाम देण्याचें ठरविलें होतें तें इनाम देण्याचा समारंभ झाला. मे० मेकनजी साहेब यांणीं विश्वासराव यांस बोलावून इनाम देण्याचे कारण सांगितलें नंतर बाळाजी पाटील वडनेर गंगाईयांणीं देवी काढण्याचे कामांत फार मेहेनत घेतली व मनापासून लोकांस समजुतीच्या गोष्टी सांगून मुलांस देवी काढविल्या व सरकारी कामाबद्दल त्यांची हुशारी सरकारचे लक्षांत येऊन त्यांणीं बाळाजी देशमुख यांस पागोटें व शाल बक्षीस दिली. त्यानंतर जावडे येथील पाटील भराजी यांसही याच कामाबद्दल वर लिहिलेलें बक्षीस दिलें. प. सि.

## नोटिसा

नोटिस—गोपी वल्लद लाऊ हलवाई राहणार ताजनापेठ ( अकोलें ) यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी व माझी बहीण भाऊच्याचे घरांत रहात होते. तेथें तूं आमच्या जवळ राहण्यास आला. तुझी आमची ममता पडली ह्मणून तूं व आह्मी एके ठिकाणीं च होतो. माझी बहीण मेल्यावर मला तूं विनाकारण घरांतून घालवून दिलें. माझ्या व माझ्या बहिणीच्या ९०० रुपये किमतीच्या वस्ता घरांत पेटींत होत्या त्याही मला घेऊं दिल्या नाहींस ह्मणून मी पंचांत फिर्याद केल्यावरून पंचांचे समक्ष एकदोन वेळां वस्ता देण्यास कबूल झालास परंतु अद्याप देत नाहींस सबब ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझ्या वस्ता मजला आणून द्याव्या नाहींतर मी दिवाणींत फिर्याद करीन. तेव्हां फिर्यादीचा व नोटिस वगैरेच्या खर्चासह वस्ता भरून द्याव्या लागतील कळावें. तारीख २ अगष्ट सन १८७३ इसवी.

( सही ) रंभु मर्द बालकिसन हलवाई निशाणी खुद हातची.

नोटिस—बनाम जगूजी वल्लद भगवानजी पाटील मौजे खेटरी तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार मुरलीधर छोटमल साहू दुकान मौजे चान्नी तालुके बाळापुर याजकडून देण्यांत येते कीं तुह्माकडून ज्वारी १॥३॥ एक खंडी तेरा मण नऊ पायली येणें आहे ती अद्याप तुह्मी दिली नाहींत. करितां १५ दिवसांची मुदत देऊन नोटिशीनें कळविलें आहे सदरील मुदतींत तुह्मी येऊन ज्वारीचा निकाल करावा जर करितां तुह्मी मुदतशीर येऊन सफाई करणार नाहींतर तुह्मावर दिवाणींत नालिश करण्यांत येईल व त्याबद्दलचा खर्च तुह्मावर पडेल कळावें. तारीख १ माहे आगष्ट सन १८७३ इसवी.

(सही) मुरलीधर छोटमल दुकान मौजे चान्नी.

नोटिस—बनाम चंदू वल्लद भगवान पाटिल मौजे खेटरी तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार मुरलीधर छोटमल साहु दुकान मौजे चान्नी तालुके बाळापुर याजकडून देण्यांत येते कीं, तुह्माकडेस माघ संवत १९२९ मिती जेष्ट शुद्ध ३ रोजीं खातेबाकी येणें निघाली रुपये ३७९।= शिवाय व्याजयेणें आहे. हे रुपये अद्याप तुह्मी दिले नाहींत यास्तव तुह्मास १५ दिवसांची मुदत देऊन नोटिशीनें कळविलें आहे कीं, सदरील मुदतींत तुह्मी व्याजासुद्धां सर्व रुपये चुकते करून द्यावे वर लिहिल्या मुदतींत तुम्ही येऊन सफाई न केल्यास तुम्हावर फिर्याद करूं. फिर्यादीचा खर्च तुह्मावर पडेल कळावें. तारीख १ माहे अगष्ट सन १९७३ इसवी.

( सही ) मुरलीधर छोटमल साहु दुकान मौजे चान्नी.

नोटिस—नारायण बल्लाळ नामजोशी अ० स्कू० मास्तर अकोलें यांस खालीं सही करणारे आह्मी नोटिस देतात कीं, तुम्हाकडेस तुमच्या मातुश्री व कनिष्ट बंधूच्या संबंधाचे रुपये ५०४ मुद्दल व शिवाय व्याज मिळून १५० रुपये वसूल तुम्ही दिला तो वजा जातां बाकी मुद्दल व्याज येणें असतां तुम्ही कित्येक पत्रें पाठवून व हल्लीं समक्ष सांगून आजपर्यंत द्यावयाचे वायदे करीत गेला परंतु रुपये दिले नाहींत किंवा देत नाहीं. यास्तव तुह्मांवर दिवाणी कोर्टांत फिर्याद केल्यावाचून दुसरा कायदेशीर उपाय नाहीं. परंतु तसें करण्यापूर्वीं एक वेळ नोटिस द्यावी हें बरें समजून ही दिली आहे. आजपासून च्यार दिवसाचे आंत मुद्दल व्याजासहित जी रक्कम वाजवी होती ती व या नोटिशीचा खर्च असे एकंदर रुपये तुह्मी आह्मास द्यावेत. नाहींपेक्षां या नोटिशीचे खर्चासह तुह्मावर दावा करूं. कळावें तारीख ३१ माहे जुलाय सन १८७३ इसवी.

[ सही ] बिष्णुभट बिन भास्करभट गोरे दस्तुर खुद.

## वर्तमानसार

मुंबईचे गवरनरांस देण्याकरितां सर बार्टल फ्रियर यांणीं आफ्रिकेमधून हत्ती आणिला आहे त्याचे कान साधारण हत्तीच्या कानांपेक्षां दुप्पट मोठे आहेत. आणि याच्यावर हौदा ठेवल्यावाचून चांगले बसतां एण्यासारखी त्याची पाठ आहे. हल्लीं हा हत्ती पुण्यास आहे.

पुण्यास ह्मणण्या सारिखा पाऊस नाहीं पिकें चांगलीं एण्यास पुष्कळ पाऊस पाहिजे आहे.

अलाहाबादेस एका मनुष्यानें आपल्या बायकोचीं मुलें वाचावीं ह्मणून एका साधन्यास साधन करावयास सांगितलें त्याणें एका मुलास सुरीनें भोकसून त्यांचें रक्त एका मूर्तीस लाविलें त्याला काळयापाण्याची शिक्षा झाली.

बारदना खेरीज जर्मन लोकांनीं फ्रेंचांचा सर्व देश सोडला.

राणीसाहेबांची कनिष्ट कन्या फ्रान्सचा माजी बादशहा यांच्या मुलास देण्याचा विचार चालू आहे. या राजकन्येचें वय १६ वर्षांचें आहे.

मागील महिन्याचे १० वे तारखेस बंगाल्यांत शिलांग येथें धरणीकंप झाला.

बंगाल्यांत पबना जिल्ह्यांतील दंगा सर्व शांत झाला.

जुनच्या अखेरीस एकंदर ११८२९३१९५ रुपयांचा नोटी हिंदुस्थानांत व्यवहारांत होत्या.

मुंबईचे माजी गवरनर यांस लार्डाचा किताब देण्याचा विचार चालू आहे.

विलायतेस धोलरा कापसाचा भाव ५॥। पेनींचा आहे.

एक मनुष्य दारू पिऊन अतिशय मस्त झाला. व त्या धुंदींत रात्रींचा घरीं जाण्याकरितां निघाला. तो चालत असतां वाटेनें एका शर्यतीच्या जाग्यांत आला आणि घोडे पळण्याचे वाटेंत फिरूं लागला तो तसाच सकाळपर्यंत फिरत होता.

गाइकवाड सरकारानें असा हुकूम फर्माविला आहे कीं, श्रावण महिना कसई लोकांनीं आपलें काम बिलकुल करूं नये.

नेपाळचे राजे, राजाकालीकृष्ण बहादर यांस त्यांनीं हिंदुधर्मास चांगली मदत केली म्हणून एक मेडल देणार आहेत.

कलकत्ता एथील मेडीकल कालेजांत ८०० मुलें शिकत आहेत.

भावनगर येथें एका कसायानें गाईचा बध केला त्याबद्दल कांहीं लोकांनीं त्याजबरोबर तंटा केला. त्यांत दोन इसम मेले त्या अपराधांत ३५ जण धरले होते. त्यापैकीं ५ जणास दर एकास ७ वर्षांची कैद व २००० रुपये दंड आणि ६ जणास ३ वर्षांची कैद व २००० रुपये दंड झाला. बाकी असामी सुटले.

रेपुर येथें एका पोलिसहेड कानस्टेबलानें चोरीच्या बाबतींत एका मनुष्यास इतकें मारलें कीं तो पुढें काम करण्यास निरुपयोगी झाला ह्मणून सदर पोलिसास ७ वर्षांची शिक्षा झाली.

आग्र्यास ता० १२पासून तो तारीख २४ जूनपर्यंत १५ इंच पाऊस पडला. एक इंच पावसानें १८ फूट लांबी रुंदीची व ११ फूट उंचीची जागा भरते.

ता० २७ जुलई रोजीं सुमारें दिवस वारा वाजतां कऱ्हाड शहराचे पूर्वेस कृष्णानदीस गाढे उतार ह्मणून उतार आहे त्या उतारावर नदीचे पलीकडून भरलेली नाव अलीकडे येत असतां पलीकडचे काठापासून सुमारें २५।३० हात वर नाव आल्यावर ती अकस्मात्, बुडाली ही नाव धर्मार्थ लोकांनी चालविलेली असून तींत माणसें १०० नसलेलीं असावीं त्यांत बहुत करून नायका फार होत्या कारण आजचा दिवस वाजार भरण्याचा असोन त्याकरितां शुद्राच्या नायका पुष्कळ आलेल्या होत्या नाव बुडाले ठिकाणीं सुमारें तीन पुरुष पाणीं होतें बुडाले नावे पैकीं आदगासें २५ मनुष्यें जिवंत बाहेर काढलीं गेलीं आहेत व तीन सुमारें मुडदे नायकाचे सापडले आहेत बाकीचीं मनुष्यें व नाव खाली वाहत गेली तिचा अद्याप पत्ता नाहीं नाव बुडण्याचे कारण, नाव फार दिवसांची जुनी मोडकळीस आलेली असोन तिचे मग दुपारा पेक्षां मनुष्यें जास्ती बसलीं गेल्यामुळे बुडाली असे लोक ह्मणतात वाकी कची हकीगत समजल्या नंतर मागहून कळऊं

ज्ञा. च.

काल पासून मेघ राजाने अति वृष्टी चालविली आहे. कित्येक जागचीं पिकें, पावसाचे योगानें पिवळट जाहलीं आहेत. आतां आठ दहा दिवस पाऊस राहील तर नरें असें सर्वांचे मुखीं झालें आहे. शु. सू.

अहमदनगर—हवेचा अहवाल आकाश नेहमीं साभ्र असून वारा अझून सोसाट्यानें वाहतो पर्जन्याकडे शेती लोकांचे डोळे लागले आहेत.

न्या. सिं.

धुळें हवा—या आठवड्यांत पर्जन्य मुळींच पडला नाहीं तेणेंकरून लहान पिकें ऊन धरूं लागलीं आहेत. बाजरीचीं पेरे होणें तहकुब पडलीं आहेत तीन आठवड्यापासून पर्जन्य मुळींच पडला नाहीं.

खा. वै.

नासिक हवा—आकाश नेहमीं अभ्रानें अच्छादित असतें पाहिजे तितका पर्जन्य नसल्यानें पेरण्याचीं कामें मंदाईनें चालली आहेत. ना. वृ.

इंदुर हवा—साधारण मानानें शीत नव्हे व उष्ण नव्हे अशी आहे. पर्जन्य फार पडत नाहीं परंतु धान्यादिकांस फार सोयीचा आहे.

कायदे—हल्लीं नवीन कांहीं कायद्याचें काम सुरू आहे. हे कायदे कांहीं धर्मास व देशरिवाजास अनुलक्षून होतील अशी पुष्कळांची आशा आहे.

एरंडगांव येथें एरंडमाराच्या उत्सवाची एक चाल आहे तिचा समारंभ काल रोजीं झाला पांच सहा हजार लोक जमले होते. या समारंभांत एरंड फळाची मारामार ऐकमेकांवर होऊन शेवटीं लठ्ठालठ्ठीचा परिणाम घडतो असें कित्येक ह्मणतात. मा. अ.

पीक, पाणी, व धारणतारीख १६ माहे मजकूर पर्यंत या इलाख्यांतील पीक, पाऊस व धारणेची हकीकत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

कराची. सुरवंट पडल्यामुळें तांदळाचे पीक खराब होत आहे. पाऊस थोडा. तांदूळ ७.४६ शेर, गहू १०.२६ शेर, सिंधुनदीस यावा तसा अझून पूर आला नाहीं, त्यामुळें पिकांस झोका बसेल असें हल्लीं दिसत आहे.

अमदाबाद. पाऊस ७ इंच ७१ अंश. पिकें बरीं आहेत.

खेडा. पाऊस ४ इंच २७ अंश. पेरणीचें काम सुरू आहे. बाजरी १४.१९ शेर तांदुळ ८.२ शेर

भडोच. पाऊस ८ इंच ४१ अंश. फार पाऊस झाल्यामुळें कापसाचीं व भाताचीं शेतें कोठें कोठें थोडीं खराब झालीं बाजरी १८ शेर.

खानदेश. धुळें. कापसाचीं पिकें चांगलीं. बाजरी १९ शेर.

नाशिक. पेरणी सुरू असून पिकें बरीं आहेत. गहूं ११॥ शेर तांदुळ १० शेर.

ठाणें. पाऊस ५ इंच ९४ अंश. लावणीचें काम सुरू आहे. तांदूळ ८ पासून १३ शेर.

अहमदनगर. पाऊस ४ इंच. पेरणीचें काम सुरू आहे. बाजरी २२.४ शेर.

सोलापूर. पेरणी सुरू आहे. ज्वारी २६.४५ शेर.

सातारा. पाऊस चांगला. पेरणी सुरू असून ज्वारी १८ शेर आहे.

बेळगाव. पाऊस ९ इंच ९७ अंश. पाऊस कमी असल्यामुळें ज्वारीची पेरणी सुरू नाहीं. ज्वारी १७ शेर.

कलादगी. पाऊस चांगला नाहीं. ज्वारी ३० शेर

धारवाड. पाऊसाविषयीं बोभाट आहे.

कानडा. पाऊस १९ इंच. पिकें चांगलीं. तांदूळ १०.६ शेर.

राजकोट. पाऊस ५ इंच ८७ अंश बाजरी १९.५१ शेर.

बडोदें. पाऊस ११ अंश बाजरी १३ शेर.

युरोपांतील नाटकगृहांची याद—हल्लीं युरोप खंडात एकंदर १५०७ नाटकगृहें आहेत. इतालीं देशाची लोक संख्या २,६०,००,००० असून नाटकगृहें ३४८ आहेत; फ्रान्सची लोकसंख्या ३,६०,५५,५५० असून नाटकगृहें ३३७ आहेत; स्पेन देशाची लोकसंख्या १,६०,०५५० असून नाटकगृहें १६० आहेत; जर्मनी लोक संख्या ४,१०,४०,५५० नाटकगृहे १९१ आहेत; आस्ट्रियाची लोकसंख्या ३,६०,००,००० नाटकगृहें १५२; ग्रेटब्रिटन नाटकगृहें १५०, व रशियांत ४४ नाटकगृहें आहेत. हिंदुस्थानची लोकसंख्या २० कोटि पेक्षां ज्यास्त असून नाटकगृहें १०० असतील असें वाटत नाहीं.

विलायतची संपत्ती—विलायतचे मुख्य प्रधान मि० ग्लाडस्टन हे मागच्या वर्षीं लिवरपूल एथें असे बोलले कीं, आपल्या या लहानशा बेटांत जूलियस सीझरपासून पूर्वीच्या शतकांत जितका द्रव्यसंचय झाला त्यापेक्षां अधिक चालू १९ व्या शतकांत झाला व मागच्या २० वर्षांत, त्यांच्या मागील ५० वर्षांपेक्षां जास्त द्रव्य संचय झाला, असें असतां इंग्रजलोकांचें असें ह्मणणें आहे कीं केवळ नेटिव लोकांच्या हिताकरितां आह्मी हिंदुस्थानचें राज्य करितों!!

पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या वाफेच्या अंगीं किती जोर असतो याचा प्रति दिवशीं अपल्यास अनुभव आहे. परंतु पाण्याच्या अंगींही असाच जोर आहे असें दिसतें. कारण, "जर्नल आव सोसायटी आव आर्ट" या पत्रांस एकानें असें लिहिलें कीं स्टीम वापरची परीक्षा पाहण्याकरितां त्यांत पाणी घालून तें दाबलें तेव्हां त्यांतून एक बारीक धार उडाली तिच्या अंगीं इतका जोर होता कीं, तिजमधून एका मुलानें नोट फिरवितांच तें तुटलें. यावरून सदरहु लिहिणारा असा तर्क करितो कीं पाण्याच्या धारेचा उपयोग लाकडें वगैरे कापण्याच्या कामीं करितां येईल.

इराणचे बादशाहा राशियाच्या फौजेची कवाईत पाहून त्यांस इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्यांनीं, आपल्या फौजेस कवाईत शिकविण्याकरितां कांहीं अधिकारी पाठवावें अशी राशियाच्या बादशाहाची विनंती केली व ती त्यांनीं मान्य केली. ने. ओ.

## मनुष्याचीं या जगांतील कर्तव्य कर्में

ईश्वराविषयीं कर्तव्यकर्में.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आजपर्यंत अनेक ग्रंथकार व विद्वान होऊन गेले परंतु त्यांस ईश्वराविषयीं कांहीं शोध लागला नाहीं. चारी वेद, साही शास्त्रें व अठरा पुराणें यांना ईश्वराविषयीं कांहीं कळलें नाहीं मग त्यांनीं ह्मटलें कीं, "यस्यांतन्नविदु:सुरासुरगुणा देवायतस्मैनम:" ह्मणजे ज्या देवाचा कोणाला अंत नाहीं त्याला नमस्कार असो. याप्रमाणें महान महानांची स्थिति तर आम्हा पामरांना ईश्वराविषयीं काय कळणार? म्हणून आम्हीही त्याविषयीं विशेष बारकाव्यतां शिरूं नये. आपल्या ठोकळ समजुतीनें आपणास इतकें कळतें कीं या सृष्टीचा निर्माणकर्ता सर्व शक्तिवान, सर्व व्यापक व सर्व श्रेष्ट परमेश्वर आहे व त्याणें आपणास निर्माण केलें आहे. व त्याच्या इच्छेनुरूप सर्व जगताचा कारभार चालला आहे. व त्याणें जगाच्या सुरळीतपणाकरितां कांहीं आज्ञा दिल्या आहेत ह्मणजे नेम करून दिले आहेत किंवा त्यांच्या प्रेरणेवरून लोकांनीं नियम केले आहेत. ते आपण आदरपूर्वक मानावें, त्यास ऐक्यभावें शरण जावें, त्याची स्तुति करावी, त्याचें भय वागवावें, नित्य त्रिवार त्याची प्रार्थना करावी, त्याला चांगलें मन मागावें, त्यानें संकटापासून तारावें, सुखसौभाग्यांत उन्मत्त होऊं देऊं नये, कर्तव्य कर्मास टळूं देऊं नये, व महान निकट प्रसंगींही मन गडबडूं देऊं नये. यासाठीं त्याची निरंतर प्रार्थना करावी. ज्यांचें ईश्वरीं प्रेम दृढ असतें, जे ईश्वराचेठायीं एकनिष्ठ असतात व ज्यांचा सर्व भरवसा ईश्वरावर असतो त्यांची परमेश्वर कधीं उपेक्षा करीत नाहीं: सर्व सुखाविषयीं व चांगुलपणाविषयीं मनुष्य अतृप्त राहील व त्याला निराशा होतील पण परमेश्वराचें गौरव करण्यांत लक्ष्य पुरविलें असतां मनुष्य कधीं अतृप्त व निराश होणार नाहीं. ऐहिक सर्व वस्तूंला व सुखसंपत्तीला क्षय आहे आणि ईश्वर सदा सर्वकाळ अक्षय व परिपूर्ण आहे इतकें प्रमेय जाणून मनुष्य तल्लीन झालें ह्मणजे त्याला स्वताविषयीं काळजी करायाला नको. त्याची काळजी परमेश्वर इतरांपेक्षां अधिक करील यांत संशय नाहीं. असा दृढभाव असावा. अल्पविचारी मनुष्य आपल्या सुख सोयीकरितां परमेश्वरास भीड घालतो ह्मणजे त्याला पुजा नैवेद्य वगैरे देतो किंवा स्तोत्र करितों ह्मणजे कामापुरतें याला त्यांच पोरवितो व तितकी गोष्ट साध्य झाली ह्मणजे आनंद भरांत त्याला विसरतो. व कांहीं साध्य झालें नाहीं तर ईश्वराला शिव्या देतो व त्याविषयीं अभक्त होतो. हा त्याचे मतीचा दोष समजावयाचा. बाकी ईश्वर त्याच्या स्तुतीला किंवा नैवेद्याला भुलतो असा अर्थ नाहीं. ईश्वराला नैवेद्याची गरज नाहीं. मनाच्या अर्पणाची गरज आहे. जे सद्भक्त असतात त्यांवर दु:खाचा प्रसंग आला तरी ते ईश्वराजवळ कुरकुर करीत नाहींत. गंभीरपणानें सर्व दुखें सहन करितात. तशा प्रसंगीं ते ह्मणतात कीं, अति घोर दु:खांचा समुदाय आह्मांवर येऊन पडणार होता पण कृपाळू परमेश्वरानें आह्मांवर दया करून तो टाळला व हें एक लहानसें संकट मात्र आह्मांवर धाडलें. याचा मारा आम्ही सहन केला म्हणजे आम्ही अर्जिक होऊं. वास्तवीक पाहिलें असतां दु:खें मनुष्याचें काय वाकडें करणार आहेत? जिवाचा व शरीराचा वियोग केला म्हणजे त्यांचे सर्व मार्ग खुंटले पण तसें केल्यानें झालें काय? जिकडची वस्तु तिकडे दास्तानीं लागली म्हणजे पंच भूतांचे अंश भूतांनीं नेले व ईश्वराचा प्राणी ईश्वराकडे गेला. यांत वावगें कांहींच झालें नाहीं. असें म्हणून ते व्याधीस रोगास, विदेस, दरिद्रास व हरकसल्या व्यथेस जुमानीत नाहींत व सुखसंपत्तीनेंही अमर्याद होत नाहींत. आणि अशी ज्यांची तयारी झाली ते जीवन्मुक्त होत व त्यांस कळिकाळाचें भय नाहीं असें खचीत समजावें.

याप्रमाणें ईश्वराविषयीं दृढमति होण्यास आपल्यानें झटवेल तितकें झटावें हे आपलें कर्तव्यकर्म आहे. ईश्वराचा आपणावर राग होऊं नये म्हणून आपण त्याची अवज्ञा करूं नये, सृष्टींतील विशेष किंवा सामान्य वस्तूंस त्याचें सादृश्य देऊंन किंवा तशी त्याचे ठायीं भावना धरून देवाला हलकें करूं नये. तेणेंकरून देवाची कृपा होणें हा जो आपला हेतु तो सिध्धीस जाण्याविषयीं संशय वाटतो. सारांश खरें नाणें मनानें ओळखावें सोंगाला सजवूं नये व त्यावर भाळूं नये. तेणेंकरूनच ईश्वरीकृपा झाल्यास होईल. अन्यथा कांहीं होणार नाहीं हें पक्कें समजावें. इतकें सांगून हा फार लांबलेला निबंध मी आतां पुरा करितों. व विद्वज्जनांची चुकांकरितां व कोत्या विचाराकरितां माफी मागतों.

हें पत्र अकोला एथें खंडेराव नाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. खा

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ — अकोला, रविवार ता० १० आगष्ट सन १८७३ इ० — अंक ३२

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| मागाहून | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| मागून | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीन नोटिस दुसरे खेपेस | ०। |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ” दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

नोटिस—राजश्री हनवंतराव वल्लद केशोराव देशमुख राहणार हतरूण तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, तुह्माकडेस आमचे घेणें येणें व हतरूण दुकानचें असून तुह्मी त्याचा निकाल करीत नाहीं. यास्तव आह्मी तुह्मावर फिर्याद करणार. ही नोटिस तुह्मास सूचनार्थ दिली आहे. तर ही पोंचल्यापासून आठ दिवसांत दोन्ही दुकानचे जें येणें तुमचेकडेस आहे तें सर्व व्याज सुद्धां तुह्मी द्यावें नाहींपेक्षां वरील उपाय योजण्यांत येईल. ह्या नोटिशीचा खर्च ही तुह्मापासून वसूल करण्यांत येईल. कळावें तारीख ७ अगष्ट सन १८७३ इ०.

(सही) शिवबक्ष मजितमल दस्तूर खुद्द

नोटिस—बेलर्मा दुर्गाजी वल्लद निधानजी वाघमारे जात कुणबी राहणार मौजे लावखेडी प्रगणे मोर्तिजापुर यास कळावें कीं, तुह्मी तारीख २१ माहे जुलायची नोटिस वऱ्हाडसमाचारांतून दिली ती पाहिली त्यांत तुह्मी असें लिहिलें कीं, ३ तीन नंबर फरोक्त केले परंतु रुपये दिले नाहींत असें कळविता परंतु तुमचे जमिनीचा निमे हिस्सा मी आपले मागील रुपयांत खरीद घेऊन तुमचे दस्तैवज धडधडाट परत दिले असोन तुह्मी मोर्तिजापुरचे लोकांचे सांगितल्यावरून अशा खोट्या नोटिसा देता पण दस्तैवज रजिष्टर नंबर ९६ यांत पाहून विचार करावा आणि त्या दस्तैवजापैकीं रुपये १०० अक्षरी शंभर मजला घेणें आहेत ते एक महिन्याचे आंत दाखल करावे आणि दुसऱ्याचे ह्मणण्यावर अशी खोटी नोटिस दिली आहे तर याजबद्दल कायदेशीर स्पष्ट जबाब द्यावा न दिल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल तारीख९ माहे अगष्ट सन १८७३ इसवी

(नि) अर्जुनजी वल्लद जानोजी खरबडकार, यांचे हातची खूण.

नोटिस—गोंडी वल्लद फत्तेसिंग देशमुख मयत यांची बायको ललितानाईं जवळ गोंडी देशमुख कसबे तेल्हारें तालुके अकोट इजला नोटिस देण्यांत येते कीं गोंडी देशमुख याचे नावें खात्यांत ६२९॥३ सहासे एकोणतीस रुपये आठ आणे तीन पै घेणें निघत आहे त्याबद्दल तुह्मास मागणें केलें असतां देत नाहीं सबब नोटिसीनें कळवितों कीं १५ दिवसाचे आत सारे रुपये खेरीज व्याज सुद्धां फडशा करावा नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोरटांत फिर्याद करून फिर्यादीचे खर्चासुद्धां व ह्या नोटिशीचे खर्चा समेत तुह्मांकडून रुपये घेतले जातील तारीख ९ आगष्ट सन १८७३

( सही ) जगन्नाथ बल्देव दस्तुर दाजी जैराम

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशिम ता० ४ आगष्ट १८७३ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. अलीकडे हवा फार उष्ण झाली आहे. पाऊस तर बिलकूल नाहीं. दिवस पावसाळ्याचे असोन उन्हाळ्याप्रमाणें वाटत आहेत. सगळा दिवसांतून पाण्याचा एक थेंबही पडल्याचे दिसत नाहीं. आकाश नेहमी अभ्रानें आच्छादित असतें. याचे पाठीमागें जे दोन तीन पाऊस पडले ते वेळेवर पडत गेल्या कारणानें पिकें अद्यापपावेतों बरीं आहेत परंतु यापुढें जर पाऊस नाहीं तर मात्र त्यांची फार खराबी होणार आहे. पावसाकडे सर्वांचे डोळे एकसारखे लागून राहिले आहेत. अद्याप विहिरींनां व तळ्यांनां पाणी आलें नसोन कोठें नदी नाल्यांही भरून चालल्याचें ऐकिवांत नाहीं. ईश्वर करो आणि पाऊस लौकर पडो.

आमचे मेहेरबान डे० कमिशनर साहेब बहादुरांनीं म्युनिसिपाल कमिटीचें सेक्रटरीचें काम रा. रा. विनायक रामचंद्र डे. ए. इन्स्पेक्टर यांस दिलें. हें पाहून संतोष वाटतो. आतां आपले नवे सेक्रटरी हें काम फार हुषारीनें व फार लोकप्रिय राहून करतील अशी उमेद आहे. रा. रा. विनायकराव यांजला सेक्रटरी नेमण्याविषयीं बहुतेक गावकऱ्यांचें मतें अगदीं नव्हतें. परंतु डे० कमिशनर साहेब बहादुरांनीं यांसच नेमावयाचें व हे कामही चांगलें करतील असें त्यांस सांगितलें. साहेब बहादुरांचा असें करण्याचा हेतू इतकाच कीं, कमिटीचें काम बहुतेक इंग्रजींत चालतें याजकरितां येथें कोणी चांगल्या इंग्लिश जाणणाराची योजना करावी. व हा हेतु त्यांनीं सर्व लोकांसही जाहिर केला असें आमचे ऐकिवांत आहे. गावकरी लोक नाखुष होऊन गावकरी पंचापैकीं कित्येक कमिटींतून आपलीं नांवेंही काढून घेण्याविषयीं अर्ज करणार असें ऐकतो असें जर खरेंच असेल तर फारच आश्चर्याची गोष्ट!! या पंचांस आह्मी असें सुचवितों कीं त्यांनीं आपलीं नांवें न काढतां उलटें सेक्रटरी यांनला नेहमीं मदत देऊन कोणत्या तरी रीतीनें मुख्य कमिटीचा उद्देश जो शहर सुधारणेचा व लोकांस सुख देण्याचा तो सिद्धीस न्यावा. ते असें न करतील तर आपण आपले पायावर धोंडा पाडून घेतील.

हल्लीं येथें एक कथेकरी आले आहेत. कथा बरीच चांगली करीत असून संस्कृताचा अभ्यासही त्यांनीं बराच केला आहे. वे ळोवेळीं कथेंत कोणास निद्रा न यावी ह्मणोन हे करताळ, पोवा, सारंगी आणि मोरचंग वगैरे वाद्यें वाजवित असतात. हे कथेकरी बुवा आपले अति वृद्ध तीर्थरूपास कथेचे वेळीं आपले मागें उभे करतात हें फार गैर दिसतें. कारण त्या वृद्ध माणसाला सर्व कथा होईपावेतों उभें राहून टाळ वाजविण्याचे व ह्मणण्याचे फारच श्रम पडतात. याजकरितां बुवांनीं आपले तीर्थरूपास मागें उभें न करितां त्यांस श्रेष्ठ मंडळींत पुढें बसवीत जावें. यांत त्यांणीं आपला पुत्रधर्म पाळल्याप्रमाणें होईल.

मेहेरबान डेपुटी कमिशनर साहेबांची स्वारी सिरपुराकडे वगैरे फिरण्यास येथून परवाचे दिवशीं गेली या महिन्याचे १९ तारिख पावेतों परत येईल असें आहे.

आमचे येथील रिविन्यु शिरस्तेदार रा. रा. कृष्णाजी गोविंद यांस बहडतीची जागा सरकार कां देत नाहींत कांहीं समजत नाहीं. मागें कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर यांचे बर्गावर्गींतच कोठें बहडतीची जागा मिळावयाची परंतु तसें झालें नाहीं. आतां हल्लींचे घालमेलींत तरी सरकार त्यांचे हक्काकडे दृष्टी देतील अशी पूर्ण आशा आहे. कळावें लोभ असावा हे विनंती.

आपला मित्र:
लोकहितेच्छू

राजश्री वऱ्हाडसमाचार कर्ते मुक्काम अकोला याजकडे:—

महाराज, आपले पत्राचा तारीख २० जुलाई सन १८७३ इसवीचा अंक सहज माझ्या हातीं आला तो पाहातां त्यांत कोणी गृहस्थानें “ अनलसमीहितसाधी .” या आर्येचा अर्थ आपले वाचकांस पुसला आहे; मी जरी आपलें पत्र घेणारा नाहीं तरी सदर आर्येचा अर्थ करून पाठविला असतां पृच्छकास कळण्याकरितां त्यास येत्या अंकीं स्थळ द्याल व हस्तदोषादि चुकांबद्दल माफी कराल असा भरंवसा आपले सद्गुणांचे कीर्तीवरून वाटतो, सबब तसें करितों.

आर्या. [ गीति आहे.]

अनल समीहित साधी राया बारा महिवरा कामा;
अनलस मीहि तसा धीरा मावीं रामही वरा कामा.

अन्वय. ( कंसांतील पदें अर्थ पुरा होण्याकरितां आहेत:)

( हे ) महिवरा, राया, ( धर्मा ) अनलकामा, बारा समीहित साधी; तसा मीही [ तुझ्या ] वरा कामा अनलस ( आहे. ) धीरा, राम ही यावा.

प्रसंग

पांडव वनवासांत असतां त्यांजपाशीं तपोनिधान दूर्वास ऋषि अनेक शिष्यांसह दुर्योधनाच्या विनंतीवरून एके दिवशीं मध्यान्ह रात्रीं जाऊन इच्छा भोजन मागूं लागले त्या वेळेस पांडवांपाशीं अन्नसामग्री किंचितही नव्हती पण सत्व राखण्याकरितां आलेल्या ब्राह्मणांस भोजन तर द्यावयाचें सबब या समयीं निजसखा जो श्रीकृष्ण त्याची स्तुति करावी, ह्मणजे आपलें संकट निवारेल, असें जाणून धर्मादि पांडवांनीं कृष्णाची स्तुति केली; व कृष्णानें तेथें येऊन त्यांचें संकटही दूर केलें. नंतर धर्म राजानें कृष्णास पुष्कळ प्रकारें स्तवून आभार दर्शविल्यावर त्यास कृष्ण ह्मणतो.

हे महिवरा राया धर्मा, अनलकामा ह्मणजे अग्नीच्या कार्यासाठीं बारा ह्म० वायु हा जसें समीहित ह्म० उत्तम प्रकारचें सहाय्य साधी ह्म० साधितो;( करितो ) तसा मीही तुझ्या वरा कामा ह्म० श्रेष्ठ कार्यास अनलस ह्म० आळसरहित ( सिद्ध ) आहे. धीरा ह्म० हे धैर्यशालि धर्मा, माझा वडील बंधू रामही ह्म० बळीराम देखील याला, अशा जरूरीच्या कामास मी आलों यांत तुमवर, उपकार ते कोणते? कांहीं, नाहींत; असें बोलून कृष्ण अदृश्य झाला.

पुढील प्रश्न अवलोकन व्हावा ही दुसरी विनंती आहे.

प्रश्न

माझे ऐकण्यांत एक श्लोक आहे तो खालीं लिहितों.

श्लोक ( अनुष्टुप् छंद )

यागातामततागाया ॥
मापरोक्षक्षरोपमा;॥
तागेनोमगनोगेता ॥
मक्षमाक्षक्षमाक्षम. ॥ १ ॥

ह्या श्लोकाचे च्यारही चरण उजवीकडून डावीकडे अथवा डावीकडून उजवीकडे तसेंच एका बाजूकडून दुसरे बाजूकडे असे वाचिले तरी एकसारखेच आहेत. आपले वाचकांपैकीं कोणी याचा अर्थ करून आपले पत्रांत प्रसिद्ध करील तर त्याचे मजवर अमित उपकार होतील.

सर्वथैव क्षमा करा हीच अखेरची विनंती आहे. तारिख २८ जुलाय सन १८७३ इसवी.

आपला सेवक
बाळकृष्ण जनार्दन मद्रे
मास्तर देऊळगावराजा

एक वर्ष लागतें, शिकणाऱ्या स्त्रियांसही पगार नाहीं, यास्तव ज्यांस पदरचें खाऊन एक वर्ष राहण्याची सोय असेल, आणि लिहितां वाचतां व थोडें गणित करितां येत असेल त्यांनीं ही संधि दवडू नये.

स्वदेशीय कापड विकण्याचें दुकान स्थापणाऱ्या मंडळाची सभा तिसरे तारखेस चार वाजतां भुलेश्वरच्या शेट सुंदरजीच्या धर्मशाळेंत भरून नियम मान्य झाले. १०० भाग ह्मणजे १००० रु. भांडवलाचे आंकडे तेथेंच भरले गेले. पुढील रविवारीं पुनः सभा भरेल. इं. प्र.

आनरटी साहेबांवर फिर्याद करण्याकरितां सूटर साहेबानीं सरकारची परवानगी मागितली होती, आनरटी साहेब सूटरसाहेबाविषयीं, पारशांच्या मुकदम्यांत जें कांहीं बोलले तें बोलण्याचा त्यांस अधिकार असून त्यांच्या बोलण्याकडे तुह्मी लक्ष देऊं नये असा सरकारानें जबाब दिला.

बडोदें.— मागच्या सोमवारच्या टाइम्स आव इंडियांत बडोदें संस्थानाविषयीं एक आर्टिकल लिहिलें आहे. त्याचा रोख असा दिसतो कीं, श्री० मल्हारराव गाइकवाड यांणीं राज्याची लवकर सुधारणा न केल्यास त्यांस अजीं गादी वरून उतरण्याचा समय नजीक आला आहे. असें असेल तर मल्हारराव महाराजांनीं लवकर सावध व्हावें व कोणी तरी चांगला दिवाण नेमावा.

जामी जमशेट पत्रावरून कळतें कीं, स्मालकाझ कोर्टाचे पहिले जडज मि० ओलिफंट लौकरच विलायतेंत रजेवर जाणार व त्यांच्या जागेवर दुसरे माजिस्त्रेट मि० कूपर यास नेमणार. दुसऱ्या माजिस्त्रेटच्या जागीं मि० डोसाभाई यांस नेमून मि० नाना मोरोजी यांस तिसरे माजिस्त्रेट नेमणार.

सिंधप्रांतें यंदा पिक चांगलीं येतील असें दिसत नाहीं. टोळांनीं व किड्यांनीं प्रळय केला आहे पर्जन्य कमी आहे.

समाचार बहादुर वरून कळतें कीं, अमदाबादेस नव्या तऱ्हेचा रोग निघाला आहे. मनुष्याची प्रकृती चांगली असतां मनुष्य एकदम बेशुद्ध होऊन श्वास लागतो व लागलेंच थोड्या अवकाशानें मनुष्य मरतें.

डेकनहेराल्डवरून कळतें कीं, कऱ्हाडचे नदीवर नाव मागच्या सोमवारीं उपडी झाली. आंत मनुष्यें सुमारें १५० होतीं. कितीं मेलीं हें अजून समजलें नाहीं.

पाटिल कुळकरण्यांविषयीं कायदा. या कायद्याचा मसूदा मुंबई कायदे कौनसिलासमोर एकवार वाचला गेला. हा कायदा करण्याचें कारण काय व त्यांत काय आहे हें आनरबल मि० राजर्स यांनीं कौन्सिलास समजाऊन सांगितलें व अशी सूचना केली कीं, मसुद्याविषयीं विचार करण्याकरितां नेमिलेल्या कमिटीनें विचार करून ६ आठवड्यांत रपोर्ट करावा. हा कायदा पुरातन काळच्या वतनदारांस लागू असल्यामुळें तो जलदीनें पास केला जाणार नाहीं असेंही राजर्स साहेब बोलले, परंतु आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं, मसुद्याचा विचार करण्याकरितां ६ आठवड्यांची मुदत दिली असतां तो चालू सेशनांत पास होणार नाहीं ह्मणून तीन आठवड्यांची मुदत द्यावी असा गवरनर साहेबांचा अभिप्राय पडल्यावरून अखेरीस याचप्रमाणें ठराव झाला! मग कायदा जलदीनें पास करावयाचा नाहीं याचा अर्थ काय; ज्या लोकांकरितां कायदा पास होत आहे ते इतके गैरमाहित आहेत कीं, कायदा पास होईपर्यंत त्यां विषयी त्यांचें मत काय आहे हें त्यांच्याकडून सरकारास कळल कीं नाहीं या विषयीं आह्मांस मोठा संशय आहे. गवरनर साहेबास इकडची माहिती नसल्यामुळें ते कायदा पास करण्याची जलदी करितात हें स्वाभाविकच आहे. पाटिल कुळकरण्याच्या कामाची, कौन्सिलांतील नेटिव मेंबरांस चांगलीशी माहिती असेल असें आह्मास वाटत नाहीं. या कायद्याचा पुढच्या २० व्या तारखेस पुनः विचार होणार आहे. विचार करण्याकरितां पुढें लिहिलेल्या गृहस्थांची कमिटी नेमिली आहे:— आनरबल मि० राजर्स, आनरबल मि० मंगळदास नथूभाई, आनरबल नारायण वासुदेव, आनरबल गणपतराव तात्यासाहेब पटवर्धन, व आनरबल रावेनस्क्राफ्ट. ने. ओ.

## सन १८७३ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

गांवचे वंशपरंपरेचे अधिकारासंबंधी कायदा आहे तो सुधारण्याविषयींच आकटाचा मसुदा.

सन १८७३ चे ११ वे आक्टांतील ठरावाअन्वयें गांवचे अधिकारांची व्यवस्था करण्यांत अडचणी उत्पन्न होत आल्या आहेत, यास्तव खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे.

१. रकम १. गांवचे वंशपरंपरेचे सर्व अधिकारी मग त्यांचे अधिकारांचीं नांवें कोणतींही असोत त्यांणीं, जितकी व ज्या प्रकारची चाकरी मामूल असेल व सरकारचे एकंदर हुकुमास अनुसरून कलेक्टर फर्मावितील तितकी व त्या प्रकारची चाकरी आपआपले वतनाबद्दल केली पाहिजे.

रकम २. गांवचे वंशपरंपरेचे अधिकाऱ्यांचीं व त्यांचे पूर्वजांचीं अधिकाराचे कामांचीं व कृत्यांचीं सर्व दफ्तरें सरकारचा माल आहे असें ठरविलें आहे. आणि सदर्हू प्रकारचीं दफ्तरें कलेक्टरांनीं मागितलीं असतां तीं हजर करणें गांवचे वंशपरंपरेचे सर्व अधिकाऱ्यांस कायद्याअन्वयें अवश्य आहे.

२. वतन फार दिवस बंद राहिल्यामुळें किंवा सरकारांत घेतल्यामुळें किंवा इतर कारणामुळें खालसा झालें असेल आणि नवीन वतन करणें सरकारास योग्य वाटेल, तेव्हां या आकटाचे २४ वे कलमाचे ( ब ) रकमेंत सांगितलेले रीतीनें अधिकार वंशपरंपरेनें चालविण्यासाठीं कोणा मनुष्यास किंवा कुटुंबास नेमण्याचा आणि योग्य वाटेल तें वेतन त्या वेतनास लावून देण्याचा अखत्यार सरकारास आहे. मग सदर्हूप्रमाणें नेमलेले मनुष्यांस किंवा कुटुंबास या आकटाचे फायदे मिळण्याचा हक्क प्राप्त होईल व या आकटांतील ठराव लागू होतील.

३. या आकटाअन्वयें वहिवाटदार नेमण्यांत येतील यांचें वेतन ठरविणें हें कलेक्टराचें काम आहे. आणि तशी चाकरी करण्याबद्दल प्रत्येक वतन चालत असेल त्या वतनावर किंवा तसे वतनाचे प्रत्येक भागावर सदर्हू कारणासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणे रकमेची आकारणी करण्याचा अखत्यार त्यांस आहे, म्हणजे तसे वतनाचें किंवा हिशाचे भर उत्पन्नाचे मानाहून जास्ती नाहीं अशी जी रकम सदर्हूप्रमाणें ठरविलेलें वेतन भरती करण्यासाठीं अवश्य असेल तितके रकमेची आकारणी करण्याचा अखत्यार आहे. आणि वहिवाटदाराचे मेहेनतान्याबद्दल सदर्हू प्रकारचे वतनांतून जमिनी व नेमणूका निराळ्या करून ठेवण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे.

४. वतनाचें सर्व वेतन किंवा त्यापैकीं कांहीं वेतन गावकऱ्यांकडून परभारें नक्त किंवा ऐनजिनशीं घेण्याचे हक्क असतील तेव्हां त्या हक्कांचा प्रकार व रकम व ते देण्यास पात्र कोणकोण हें पांचांचे पंचायतीकडून लेखी ठरविण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे. त्या पांचांपैकीं दोन गावकऱ्यांनीं नेमावे, व दोन वतनदारांनीं नेमावे आणि एक कलेक्टरानें नेमावा तो सरपंच होईल. आणि नियमित मुदतींत कलेक्टरानें नेमावयाची त्या मुदतींत गांवकरी किंवा वतनदार किंवा ते दोन्ही सदर्हू प्रकारची नेमणूक करण्यात उप [illegible] तील, तेव्हां पंचाईत करण्यास जितके मेंबर ( असामी ) जरूर असतील तितके मेंबर कलेक्टरानें नेमावे. मेंबरांपैकीं अधिकांचे अनुमत असेल तोच पंचायतीचा ठराव होईल. मालक मुदत कलेक्टरानें नेमावयाची त्या मुदतींत ठराव करून दिला तर त्या बाबतींत कलेक्टरानें स्वतः ठराव करावा. पंचायतीचे मेंबरांपैकीं अधिकांनीं ठराव केला असेल तर तो किंवा कलेक्टरानें ठराव केला असेल तर तो सर्व पक्षकारांस लागू होईल. आणि सदर्हूप्रमाणें ठरविलेली रकम सदर्हूप्रमाणें दर्शविलेले पक्षकारांकडून सारप्याप्रमाणें वसूल करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे.

५. वंशपरंपरेचे अधिकाराचे वेतनाची रकम कधीं कमी कधीं जास्त होत असेल तर मागल्या सालांचे सरासरी प्रमाणें एक रकम ठरविण्याचा आणि ती ठरविलेली रकम नियमित मुदतीपर्यंत वतनावर आकारण्याचा किंवा वहिवाटदारांस व इतरांस देण्याचा, आणि सदर्हू प्रकारची मुदत सरल्यावर नवीन सरासरी ठरविण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे.

६. एकच प्रकारची चाकरी करण्याबद्दल लहान लहान रकमेचीं वतनें चालत असतील तशीं दोन किंवा अधिक वतनें एकत्र करण्याचा व अशीं एकत्र केलेलीं वतनें एकच वतन मानून तजवीज करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे; परंतु असें ठरविलें आहे कीं, सदर्हू प्रसंगीं वहिवाट करण्याचा हक्क पूर्वीचे निरनिराळे वतनांपैकीं प्रत्येक वतनाचे वारसानें पाळीपाळीनें चालवावा. हा आकट ठरण्यापूर्वीं या कलमाचे धोरणानें वतनें एकत्र केलीं असतील तें एकत्र करणें या आकटाअन्वयें केलें असतें तर जसें चालतें त्याचप्रमाणें चालेल असें समजावें.

७. रकम १. वहिवाटदारांचे वहिवाटीचे मेहनतान्याबद्दल जमिनी व नेमणुका निराळ्या करून ठेवल्या असतील त्या कोणतेही दिवाणी कोर्टाचे प्रोसेसास पात्र नाहींत आणि सदर्हू प्रकारचे जमिनीवर किंवा नेमणुकांवर कोर्टानें जप्ती बसविली असेल ती सदर्हू प्रकारच्या जमिनी किंवा नेमणुका सदर्हूप्रमाणें निराळ्या करून ठेविल्याचा कलेक्टरसाहेबांचा दाखला पोंचल्यावर कोर्टानें उठवावी. सदर्हू प्रमाणें निराळ्या करून ठेवलेल्या जमिनी व नेमणुका सरकारचे मंजुरीवांचून दुसऱ्यास करून दिल्या जाण्यास पात्र नाहींत. सदर्हू मंजुरी आपले नजरेस येईल त्याप्रमाणें देण्यास किंवा न देण्यास सरकार मुखत्यार आहे.

रकम २. सदर्हूप्रमाणें निराळी करून ठेविलेली कोणतीही जमीन चाकरी करणारे मनुष्याखेरीज इतर मनुष्याचे भोगवट्यांत हा आकट ठरल्याचे तारिखेपूर्वीं गेली असेल तर संक्षिप्त रीतीनें काम चालवून ती कबजांत घेण्याचा व वहिवाटदाराचे स्वाधीन करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे, अथवा जमिनीचे भर उत्पन्नाचे [illegible] मामूल आकारणीहून आणखी धारा जमिनीवर आकारण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे, आणि तसे प्रकारचे आकारणीचा ऐवज येईल तो वहिवाटदारास द्यावा.

रकम ३. कोणतीही जमीन हा आकट ठरण्यापूर्वीं सदर्हूप्रमाणें वेगळी करून ठेवलेली नसेल ती वहिवाटदाराचे वहिवाटीचें मेहतान्याबद्दल निराळी करून ठेवणें यापुढें जरूर किंवा योग्य होईल तर कोणतेही दिवाणी कोर्टाचे हुकुमावरून ती जमीन कोणतेही मनुष्याचे स्वाधीन कांहीं मुदतीपर्यंत केली असल्यास तिचा कबजा ज्या मुदतीपर्यंत कोर्टानें दिला असेल त्या मुदतींत तो कबजा सदर्हूप्रमाणें परत घेता येणार नाहीं; परंतु जमिनीचे भर उत्पन्नाचे मानापर्यंत जमिनीवरच सदर्हू प्रमाणें धारा आकारण्याचा अखत्यार आहे.

८. वहिवाटदारांचे व गुमास्त्यांचे वहिवाटीचे मेहनतान्याबद्दल ज्या जमिनी नेमणुकी निराळ्या करून ठेविल्या नसतील त्या एकाच मालकाकडे किंवा ज्या कुटुंबाकडे तो अधिकार असेल त्या कुटुंबाकडे सर्व किंवा कोणतेही मनुष्याकडे चालण्यास हरकत नाहीं. परंतु त्या जमिनी व नेमणुका सरकारचे मंजुरीवाचून सदर्हू कुटुंब सोडून दुसऱ्याकडे जाणार नाहींत. मंजुरी देणे ती आपले नजरेस येईल त्याप्रमाणें देण्यास किंवा न देण्यास सरकार मुखत्यार आहे. (पुढें चालू)

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. शा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १७ आगष्ट सन १८७३ इ० | अंक ३३

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### विक्रीस तयार

### मराठी पांचव्यापुस्तकांतील कवितांचा अन्वयार्थ संग्रह.

किंमत ०५ टपालखर्च ०३ एकूण ०८ आणे खालील पत्यावर पाठविल्यास पुस्तक रवाना करण्यांत येईल. १० प्रतीस एक प्रत कमिशन मिळेल.

अहमदनगर न्यायाधिश आफिस } गंगाधर गणेश धनेश्वर.

## नोटिसा.

नोटिस—फकीरा वल्लद पिरथमजी राउत रहाणार बटवाडी खुर्द यास खालीं सही करणार शिवाजी वल्लद इंद्राजी पाटिल दुकान बटवाडी बुद्रुक याजकडून नोटिस देण्यात येते कीं, तुह्माकडे पुरज्यावरून २८२ रुपये व व्याज घेणें आहे. सन१२७९ चें हंगामावर देण्याचा करार होता पण तुह्मी उलगडा केला नाहीं ह्मणून तुम्हाला ही नोटिस मुद्दाम दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मुद्दल रुपये व हिशोबानें होईल तें व्याज मिळून सर्व रकम आमचे दुकानीं आणून द्यावी. याप्रमाणें तुम्हाकडून न घडेल तर दिवाणी कोर्टांत तुम्हावर दावा केला जाईल व मग त्याचा खर्च, या नोटिशीचा खर्च आणि व्याजा सुध्धां सर्व रुपये तुम्हापासून घेतले जातील. कळावे तारिख १२ माहे आगष्ट सन १८७३ इसवी.

(सही) शिवाजी वल्लद इंद्राजी पाटिल दुकान बटवाडी बुद्रुक दस्तुर जयवंतराव गणेश गुमास्ते.

नोटिस— काळू वल्लद बापुजी वानखेडे टाकळी खोसबोडकर व सापरडा वल्लद अपराजी वानखेडे टाकळी खोसबोडकर यास शिवाजी वल्लद इंद्राजी पाटील दुकान बटवाडी बुद्रुक याजकडून नोटिस देण्यात येते कीं तुह्मी आह्मापासून १०० रुपये कर्ज घेतले व हंगामावर परत देण्याचा करार केला त्याला सुमारे तीन वर्षें होत आलीं. अजून आमच्या रकमेचा उलगडा केला नाहीं मागावयास पाठविलें असतां देऊ ह्मणता परंतु कांहीं देत नाहीं सबब ही तुह्मास मुद्दाम नोटिस दिली आहे तर मुद्दल रुपये १०० व व्याज रुपये ७५ मिळून १७५ रुपये नोटिस पोचल्यापासून एक महिन्याचे आंत आमचे दुकानीं आणून पावते करावे. तसें न केल्यास दिवाणींत दावा करून त्याचा खर्च व या नोटिशीचा खर्चसुद्धां भरून घेतला जाईल हे तुह्मास कळावें. तारिख १२ आगष्ट सन १८७३ इसवी.

( सही ) शिवाजी वल्लद इंद्राजी पाटील दुकान बटवाडी दस्तुर जैवंतराव गणेश.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### चमत्कारिक श्लोक.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस——

समुद्रात्मजानंदनःसादरेण  
शशांकंसमूचेशुचेमातुलेति  
किमर्थंशिरःश्रमेवच्छिन्नस्य  
खलांबायसःसागुप्तवृत्त्यैवभुक्ता ॥ १ ॥

अर्थ—एके समयीं समुद्रात्मजा जी शिंप तिचा नंदन जो मोति तो शशांक आणि आदरानें आपला मामा जो चंद्र यास विचारितो कीं, मामा मी तुमच्या आश्रयास असून माझ्या शिरावर दगड कां? (नथेची टीक) त्यावर चंद्रानें उत्तर दिलें—अरे दुष्टा मातेची बहीण जी सुधा ती गुप्त वृत्तीनें एकटाच पान करितोस म्हणून तुझ्या शिरावर दगड बसला म्हणजे नथेला हलकडी असते ती स्त्रिया आपल्या ओठानें नेहमीं चुंबित असतात तस्मात् मोति तें अधरामृत पान करितात अशा भावानें कवीनें ही उत्प्रेक्षा वर्णिली आहे.

श्लोक दुसरा.

मुक्ताःकेलिविसूत्रहारगलिताःसंमार्जनीभिर्हृता ॥ प्रातःप्रांगणसीम्नि मंथरचलद्बालांघ्रिलाक्षारुणाः ॥ दूराद्दाडिमबीजशंकितधियःकर्षंति केलीशुकाः ॥ यद्विद्वद्भवनेषुभोजनृपतेस्तत्त्यागलीलायितम् ॥ २ ॥

अर्थ—(भोजराजाच्या ऐश्वर्याचें वर्णन) स्त्रिया क्रिडा करीत असतां त्याच्या गळ्यांतील मोत्यांचे हार तुटून खालीं पडत ते भूमी झाडतांनां अंगणांत साचत त्यावर स्त्रिया पाय देऊन चालत यामुळें त्यांच्या पायांचे लाक्षारस त्या मोत्यांस लागून जवळच्या झाडावर जे पोपट असत त्यांनां हे डाळिंबाचेच दाणे आहेत असा भास होऊन उचलण्याकरितां ते तेथें जात असत.

श्लोक तिसरा.

संक्रांतवर्णांतरमाधिसूनुः  
संपर्कपुण्यादिवरामभद्रः  
क्षात्रक्रमात्पिप्पलदंडयोग्यः  
पलाशदंडाद्रुतपाणिरासीत्

रामायणचंपु

अर्थ—विश्वामित्र राजा असून ऋषी होता. त्यानें रामचंद्र क्षत्रिय होता ह्मणून त्यास पिंपळाचा दंड द्यावयाचा असून पळसाचा दंड दिला हें आश्चर्य "असा चमत्कार दाखवून पुनः श्लेषानें समाधान" पलाशदंड रामाकरवी धारण करविला ह्मणजे पल ( मांस ) यातें अश ( खाणारे ) ह्मणजे राक्षस यांनां दंड करणें हेंच रामाकडून धारण करविलें यांत आश्चर्य नाहीं.

पिंपळनेरवासी.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस——

वि. वि. आपल्या तारिख १ जून सन १८७३ इसवीच्या पत्रांत टपालखात्याच्या सुव्यवस्थेबद्दल मजकूर होता व त्याबद्दल कोणास गिल्ला करणें असल्यास त्याणें त्या खात्याचे अधिकाऱ्याकडे किंवा आपणाकडे जीं पत्रें उशिरानें पावलीं त्याचे कव्हरासुद्धां पाठवून गिल्ला करणें असेल तो करावा असा मजकूर होता त्यावरून खालील मजकूर कळवितो तो येणेंप्रमाणें—मी आपला वर्गणीदार आहे तस्मात् दर रविवारी आपणाकडून माझे नावानें एक अंक रवाना होतच असतो. परंतु मला बहुतकरून दोन दोन अंक एखादे वेळेस तीन अंकही बरोबरच पोचतात. व त्याप्रमाणेंच खानगी पत्रें पोचतात याबद्दल या पत्राबरोबर पाठविलेले पाकिटावरून आपली खात्री होईल व यास दुसरें साधन खरें खोटें पहाण्याकरितां हेंच आहे कीं, या तालुक्याचे शिवायाजवळ गावोगावचे कागद पावते केल्याबद्दल सही घेण्याचें जें बुक आहे त्या बुकावर आमचे गांवचे नांव व सहीही साल्रात किती वेळां लिहिलेली आहे हें तें बुक पाहिल्याबरोबर लक्षांत येणार आहे. व त्यावरूनें पाहिजे तशी पाहिजे त्याची खातीही होईल. आतां याबद्दल नाइलाज होऊन दाद लागावी म्हणोन या पत्रासोबत पाकिटेंही पाठविलीं आहेत. कधीं कधीं तर हरलमेसेंजर हे आमचे गावीं न येतां आमचीं पाकिटें दहिहंडा येथें देऊन ठेवितात हें रास्त आहे काय? यांतून येखादें पत्र गहाळ झाल्यास जबाबदार कोण होईल? तर याबद्दल आपण तजवीज करवाल ही आशा धरून हें पत्र पाठविलें आहे. कळावें. तारिख ११ आगष्ट सन १८७३ इसवी.

आपला वर्गणीदार  
केळीवेळीकर.

* * * सदरील पत्रांत लिहिलेलीं कव्हरें आह्मी सब इन्स्पेक्टर यांजकडे पाठविलीं आहेत व याचप्रमाणें यवतमाळ तालुक्यांतून कळंब येथून उशीराबद्दल बोभाट आला आहे. त्याचेंही पाकीट तिकडेस रवाना केलें आहे. खानदेशांतील पिंपळनेर येथून पत्र उशीरा पोचत असल्याचें गाऱ्हाणें या आठवड्यांत आह्मांकडे आलें आहे. तर आमचे मित्र रा. रा. गोपाळराव सब इन्स्पेक्टर यांनविषयीं चौकशी करून बंदोबस्त करितील अशी आमची इच्छा आहे.

ए. व. स.

रा. रा. व० स० कर्ते यांसः—

वि. वि. हिंदुस्थानांत ५६ देश आहेत असें ग्रंथांतरीं आहे पण ते देश कोणते त्यांचीं जुनीं नावें काय व हल्लीं ते कोठें आहेत यांविषयींची माहिती आमच्या एका मित्रानें आम्हांस दिली ती आपल्या वाचकांस उपयुक्त होईल या आशेनें आपणाकडे पाठवितो. स्वीकार व्हावा.

| जुनें नाव | नवीन माहिती. |
|---|---|
| १ आंध्रदेश | मद्रास इलाख्यांत निलूर, मच्छलीपट्टण, राजमहेंद्री, गंटूर हीं गावें व याच्या लगत्याचा प्रांत या देशाखालीं मोडत होता. |
| २ अंगदेश | जेथें हल्लीं गया आहे तो देश. |
| ३ अवंती | माळवा प्रांत |
| ४ बंगाला | (याच नावानें हल्लीं प्रसिद्ध आहे.) |
| ५ बार्बर | आरबस्थान |
| ६ भद्र | मिसरदेश |
| ७ भोज | काशीप्रांत |
| ८ चोल | चंदीचंदावर |
| ९ दशार्णक | काठेवाड |
| १० द्रविड | हल्लीं याच नावानें प्रसिद्ध आहे. |
| ११ द्राविल | मद्रास |
| १२ पारसीका | इराण |
| १३ गांधार | कंदाहार |
| १४ गुर्जर | गुजराथ |
| १६ गौड | गंगातीरचा बंगालप्रांतील प्रदेश |
| १७ जलंदर | पंजाबांतील प्रांत |
| १८ कलिंग | उडियादेश |
| १९ कोंकण | हल्लीं हेंच नाव प्रसिद्ध |
| २० कोसल | लखनौ |
| २१ कांबोज | ब्रह्मदेशच्या दक्षिणेस कांबोडिया प्रांत. |
| २२ कामरूप | आसाम |
| २३ कर्नाटक | [ प्रसिद्ध आहे ] |
| ५४ काराट | खानदेश |
| २५ कैकेय | काबूल |
| २६ काश्मीर | ( प्रसिद्ध आहे ) |
| २७ केरल | कालिकत |
| २८ किरात | होनावर |
| २९ कुंतल | बेदर |
| ३० कुरु | मिरत, पानपत. |
| ३१ लात | वेरुळ |
| ३२ मत्स्य | प्रयाग, कानपूर |
| ३३ मागध | मणिपुर, कलकत्त्याचा पूर्व भाग |
| ३४ महाराष्ट्र | ( प्रसिद्ध ) |
| ३५ माळव | मेवाड, इंदूर |
| ३६ मलयाड | मंगळूर |

| | |
|---|---|
| ३७ मद्रत | मारवाड |
| ३८ मैथुर | आग्रा |
| ३९ मैथेल | गोरखपुर, नेपाळाजवळ |
| ४० निपाळ | नेपाळ |
| ४१ पानात | काळपी |
| ४२ पांचाळ | लाहोर |
| ४३ पांड्य | अर्काट |
| ४४ पुलिंद | बलुचिस्थान |
| ४५ सौवार | कच्छभूज |
| ४६ सिंधू | सिंधकराची |
| ४७ सिंहल | लंका |
| ४८ सौराष्ट्र | जुनागड, सोरटी सोमनाथ |
| ४९ शूरसेन | आग्र्यानजीक |
| ५० टंकण | कुडुकदेश दक्षिणेंत आहे |
| ५१ वराट | माहूर |
| ५२ विदेह | वऱ्हाड |
| ५३ विदर्भ | गोंडवण, चंद्रपूर |
| ५४ वंग | चितागांग |
| ५५ यवन | बुखारा वगैरे |
| ५६ बाल्हिक | शिपाम |

येणेप्रमाणें छपन्न देशांची माहिती आहे. कळावें हे विनंती.

एक शोधक.

** यांत १६ वा देश मुळींच आला नाहीं तो चुकून राहिला असावा. त्याचें नाव, व बाकीच्यांत काहीं गफलती किंवा सुधारणा असली तर माहितगारांनीं कळवावी.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य १० शके १७९५

## बडोद्याचें राज्य.

बडोद्याचे राज्याची स्थिति अगदीं निकृष्ट दशेस येऊन पोंचली याबद्दल आम्हांला फार वाईट वाटतें. शेंकडो वेळां वर्तमानपत्रांनीं बडोद्याचे स्थितीविषयीं गिल्ला केला परंतु महाराजांनीं त्याकडे लक्ष्य दिलें नाहीं रेसिडेंट साहेबाचे भेटीस महाराज जातात तेव्हां ते त्यास चांगला बुद्धिवाद सांगतात पण तें दरबारांत येऊन सभोंवतालच्या मंडळीच्या मेळ्यांत पडले कीं त्या बुद्धिवादाचें त्यांस भान रहात नाहीं. दिवाण हुशार नाहींत, दुसरे कोणी मंत्री हुशार नाहींत, ते सर्व महाराजांस दुराचारांत निमग्न ठेवितात. रयतेची दाद नाहीं. काळीकडील वसुलास जे लोक नेमतात त्यांत जो अधिक नजराणा सरकारास देईल त्यास नेमतात. मग तो रयतेकडून दुप्पट चौपट पैसा पिळून काढितो. तेणेंकरून रयत जिगाजिग होऊन गेली आहे. शिपायाच्या चाकरीपासून रिविन्यु कमिशनरच्या चाकरपिर्यंत जो कोणी अधिक नजराणा देईल त्यास चाकरी मिळते. ही एक मोठी वाईट वहिवाट त्या दरबारांत सुरु झाली आहे. व दुसऱ्याही कित्येक गैर गोष्टी त्या राज्यांत चालत आहेत व त्यांचा बोभाटा हिंदुस्थान सरकारापर्यंतही गेला आहे. प्रतिष्ठित इंग्लिश वर्तमानपत्र टाइम्स आफ इंडिया याच्या कर्त्यांनीं तर श्रा० मल्हारराव गायकवाड पदच्युत होण्याची संधी आली आहे असेंही लिहिलें आहे व दोन तीन वेळां त्यांनीं महाराजांस उत्तम उपदेशही केला आहे. पण तो ते ऐकतील तेव्हां खरें. या पुण्यार्याच्या गोष्टी आहेत. आणि जर त्यांची पुण्यार्याच संपली असेल तर त्यांस लोकांचे सदुपदेश ऐकण्याची बुध्दी तरी कोठून होईल. आम्हाला एकट्या मल्हाररावांच्या जिवाविषयीं कांहीं वाईट वाटत नाहीं. ते करतील तसें भरतील पण त्यांच्या एकट्याच्या कृतीनें साऱ्या बडोदें संस्थानांतील लक्षावधि प्रजेस दुःख किंवा सुख होणार म्हणून त्यांनीं अथोपर तरी स्वैर वागून अनेक लोकांचें नुकसान करूं नये. मल्हारराव पदच्युत झाल्यानें नेटिवास राज्य कारभार चालविण्याची अक्कल नाहीं, नेंटिव मूर्ख, नेटिव दुर्दैवी, नेटिव बदफैली म्हणून त्यांचे कारभार इंग्लिशास पहावे लागतात असे पोवाडे परराष्ट्रीय लोक गाऊं लागतील व हें साऱ्या हिंदुस्थानाला लांछन आहे. सबब मल्हारराव महाराजांस ईश्वर अजून तरी सद्बुध्दी देवो व त्यांच्या डोळ्यावरील पडळ उ.डो.

इंदुरचे होळकर महाराजांनीं आपणाला कारभारी कसे उत्तम मिळविले आहेत वेगवेगळया कामावर बाहेरून विद्वान लोक कसे नेले आहेत व त्यांच्या राज्याची तशीच शिंदे सरकारच्या राज्याची कीर्ति चहूंकडे कशी गाजत आहे हें लक्ष्य देऊन पाहिल्यास व तदनुसार वर्तन केल्यास अजूनही बडोद्याची स्थिति सुधारण्यास सवड आहे. मल्हारराव महाराजांनीं इंग्लिश सरकाराकडून एक उत्तम दिवाण मागून घ्यावा. व त्याचे सल्यानें सर्व खात्या खात्याच्या सुधारणा कराव्या. स्वप्नांत मिळाविल्या सारखें कैदेतून सुटून जें विपुल ऐश्वर्योपभोगाचें राज्यपद मिळविलें आहे तें जागेपणीं नाहींसें झाल्यासारखें हयगयीनें नाहींसें करून घेऊ नये अशी त्यांत आमची अत्यंत नम्रतेनें प्रार्थना आहे.

## नारायणबुवा ब्रह्मचारी.

या आठवड्यांत अकोल्यास एक रामदासी बुवा आले होते ते बहुत लोकांनीं पाहिले असतील त्यांची माहिती सर्वांस समजली असतां अपूर्व वाटेल. यांचें वय ५० वर्षांचे सुमारांत आहे. ते ब्रह्मच्यारी आहेत व सुमार २५ वर्षें त्यांची धुळ्यास वस्ती आहे. सुमार १४ वर्षें झालीं त्यांनीं धुळ्यास श्रीरामचंद्राच्या देवालयाचें काम आरंभिलें आहे. त्याला सुमार २७००० रुपये लागून गेले असून अजून ५००० रुपये पाहिजेत. म्हणून ते देशाटन करित आहेत. हे ब्रह्मच्यारी व रामदासी सांप्रदायी; म्हणून संसारापासून विन्मुख आहेत तरी पण या रामाच्या देवालयाचे कामांत यांचा जो व्याप आहे तितका संसारी मनुष्य आपल्या प्रापंचिक कामांत ही करणार नाहीं असे वाटतें. देवालयासाठीं जेथें जेथें चांगली वस्तू त्यांना आढळली तेथें तेथें ती मिळविण्याचा प्रयत्न करण्यास त्यांनीं सोडिलें नाहीं. व ईश्वर कृपेंकरून त्यात यांना सिद्धीही मोठीच झाली. नागपुरात शुभ्र दगडाचें काम चांगलें होतें असें पाहून तेथें त्यांनीं ३००० रुपयांचें दगडी काम तयार करविलें. अमदाबादेस फरसबंदीचें दगडी काम रंगी बेरंगी गालीचेवजा चांगलें होतें, असें ऐकून तेथें जाऊन तें करविलें. बडोद्यास मूर्ती चांगली होते ती करविली, सुरतेस देवाचे पोशाग चांगले होतात ते त्यांनीं करविले. बागगाडींतून सामान अणण्यास सोयवार पडावें म्हणून रेल्वे कंपनीची मदत त्यांनीं मिळविली. धुळ्याचे एक सावकार खुशालदास दामोदरदास यांनीं या देवालयासाठीं ब्रह्मच्यारीबुवास रुपये १५००० रोख दिले. हें औदार्य मोठें वर्णनीय होय. बुवांनीं देवालय बांधण्याचा प्रथम विचार केला तेव्हां ३५ रुपये खर्च करण्याचा संकेत होता पण त्यांच्या दीर्घप्रयत्नानें ३५००० जवळ जवळ रकम आली हें पाहून कोणासही आश्चर्य वाटल्यावाचून रहाणार नाहीं. हे धुळ्यास असतात तेव्हां उत्साह, ब्राम्हणभोजनें. कथाकीर्तनें, इत्यादिकांची मोठी गर्दी चालत असते. यांनीं महारुद्र स्वाहाकार, पवमानस्वाहाकार व संहितास्वाहाकार असे तीन यज्ञ केले व तन्निमित्त बहुत खर्च केला. भरवसा ठेवण्यासारख्या आमच्या मित्रांनीं आम्हास सांगितलें कीं, या बुवांचा अशा कामीं आजपर्यंत सुमार खर्च ९५००० रुपये झाला आहे. सावकार लोक यांस कर्जाऊ रकम देतात व हे भिक्षावृत्ती करून येऊन त्यांचीं कर्जें फेडितात आजच्या मितीस बुवांनां कांहीं थोडे हजार कर्ज आहे असें समजतें. बाहेर प्रांतीं त्यांची मुख्य उपासना आम्हांला स्नान संध्येची दिसून आली. नित्य सूर्योदयीं, माध्यान्हीं व सायान्हीं सीतोदकानें स्नान व संध्या करण्याचा त्यांचा मोठा नेम आहे. तो ते कधीं टळूं देत नाहींत. व हजारों कोश रेल्वेनें व पायवाटेनें ते परिभ्रमण करितात ही त्यांच्या निग्रहाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ह्या त्यांच्या सर्व गोष्टी ऐकून त्यांच्या उतार वयांत देवालयाचें राहिलेलें काम त्यांच्या हातून पुरें होवो व त्यास लोकांकडून चांगली मदत मिळो आणि मग त्यांचे काय होणें असेल तें होवो असें आम्ही मनापासून इच्छितो. व ज्या कृपाळु परमेश्वरानें त्यांच्या हातून एवढा प्रचंड हत्ती करविला तो त्याचे राहिलेलें शेपूटही त्यांच्या हातून करविल्यावाचून रहाणार नाहीं असा भरवसा वाटतो.

या गोष्टीवरून हें उदाहरण घ्यावें कीं अल्प स्वल्प मनुष्य कौपीनधारी ब्रह्मच्यारी यांचे दीर्घप्रयत्नानें लाख रुपयांची घडामोड झाली व देवानें त्यांच्या कामांत त्यांस यश दिलें याजकरितां आपण सर्व निरालस्यपणें देशाच्या कल्याणार्थ मनापासून झटलों तर देव आपल्यालाही यश दिल्यावाचून राहणार नाहीं.

## पंढरपुरचा विठोबा.

पंढरपुरच्या विठोबाचे पाय मोडणारा वैरागी याजवर फिर्याद चालवावयास कोणी नसल्यामुळें सरकारानें त्यास सोडून दिलें. बडबेलोक विठोबाचे हजारों रुपये खातात आणि विठोबावर असा प्रसंग आला तर फिर्याद देखील करित नाहींत मग तशा चांडाळांची खोड कशी मोडावी? ते वैरागी कचेरींतून सुटून आल्यावर लोकांनीं त्यांना मरे मरे पर्यंत मारिलें व ते आजारी पडून इस्पितळांत गेले आहेत पोलिसास मारणारे अजून मिळाले नाहींत. या अडून गोळया मारणाऱ्या भित्र्या लोकांस काय म्हणावें? सोलापुरचे कलेक्टर पंढरपुरचा हा प्रकार ध्यानांत आणण्यास स्वतां गेले आहेत. परंतु वरील प्रकारावरून सर्व प्रकरण बिघडलें असें दिसतें. वैरागी मुसलमान होते किंवा नव्हते याजविषयीं अजून कांहीं निर्णय झाला नाहीं. तो होता तर बरें झालें असतें.

ते वैरागी ख्रिस्ती लोक आहेत असा ही एक बूट निघाला आहे. तसेंच आजारी वैराग्यापैकीं दोन इसम मरण पावले असेंही वर्तमान आहे.

## आनूस्टीसाहेबांचा मृत्यू

या प्रख्यात व विद्वान बारिस्टराची अकस्मात मरणवार्ता वाचकांस कळविण्यास आम्हास फार वाईट वाटतें. यांच्या तोडीचा उत्तम वक्ता व निस्पृहरीतीनें भांडणारा व प्रजेच्या हक्कसंरक्षणाविषयीं दक्ष असा दुसरा बारिस्टर हिंदुस्थानांत अजून कोणी निवडला नाहीं म्हणून यांच्या मरणापासून आमचे देशाचा मोठा तोटा झाला असें म्हटलें पाहिजे. हे गेल्या बुधवारीं सकाळीं साडेआठ वाजतां मरण पावले. पांच वाजतां डाक्टराशी नित्याप्रमाणें हे बोलले होते व तेव्हां इतक्या लवकर मरण येईल असें डाक्टरासदेखील वाटलें नाहीं. शीतोदकानें स्नान न करण्याविषयीं डाक्टरानें त्यांनां सांगितलें होतें पण तें त्यांनीं न ऐकतां पुष्कळ थंड पाणी घेऊन पांच वाजतां स्नान केलें. व ती गोष्ट डाक्टरास मुळींच कळविली नाहीं; एवढें काय तें अकस्मात मरणास कारण दिसतें. यांची प्रकृति पारशी लोकांचा मोठा मुकद्दमा नुकताच चालविल्याच्या श्रमानें मव्हाटली होती असें दिसतें. पण ती लोकाचे दिसण्यांत आली नाहीं. अलीकडे ते कोणाकडे जात नसत व त्यांकडेही कोणी जात नसत. एकांतस्थिति यांस फार आवडे. त्यामुळें त्यांचे दुखण्याचा फारसा बोभाटा झाला नाहीं. यांच्या वयाच्या ५८ वे वर्षीं यांस मरण आलें. हे विलायतेस पार्लमेंट सभेंत मेंबर होते. चीन देशांत अटर्नी जनरल होते. हिंदुस्थानांत १५ वर्षें बारिस्टर होते. कांहीं महिने मुंबई हाय कोर्टाचे जडज होते. यांनीं वहाबी खटला कलकत्याकडे चालविला त्यांत यांची उत्तम प्रसिध्धी झाली होती.

वऱ्हाड प्रांताची भूगोलविद्या या पुस्तकाविषयीं दोन आठवड्यामागें आह्मी आपलें मत दिलें आहे त्या विरुद्ध रा. रा. चिमणाजी रघुनाथ यांनीं एक पत्र आह्मांकडे छापण्यास पाठविलें आहे. परंतु निरुपायास्तव त्यांची ते छापण्याची विनंती आमच्यानें मान्य करवत नाहीं; कारण पत्र अतिशय मोठें आहे. व त्यांतील विचार कांहींसे भ्रष्टाचे आहेत. हें पत्र थोडक्यांत लिहिलें असतें तर आह्मी अगत्यपूर्वक आपल्या पत्रांत घेतों. चिमणाजीपंत यांस आमचीं मतें आवडलीं नाहींत त्याला कांहीं उपाय नाहीं. तें मत प्रसिद्ध झाल्या पुढें त्या पुस्तकांतील आणखी कांहीं दोषाविषयीं आह्मांस दोन तीन पत्रें आलीं परंतु तींही आतां विस्तारभयास्तव आह्मी छापूं इच्छित नाहीं. या पत्रें पाठविणारांनीं परभारें चिमणाजीपंत यांस लिहिलें तर कांहीं उपयोग झाल्यास होईल. अस्तु. आह्मी आतां चिमणाजीपंत यांस अशी शिफारस करितो कीं त्या ग्रंथावर आलेले दोषाचे दूरीकरणार्थ जो लेख त्यांनीं श्रमानें तयार केला आहे तो आपल्या पुस्तकाच्याच परिशिष्टादाखल जोडल्यास त्याचा व लोकांना अनायासें उपयोग होईल. व पुस्तकही कांहीं फुगून किंमतीला व फायद्याला जड येईल.

## वऱ्हाड

सालमजकुरीं पर्जन्याचें चिन्ह चांगलें दिसत नाहीं. ऐन घाईला पिकें आल्यावर थोडा पाऊस पडतो पुन्हा कांहीं नाहीं. बारा दिवसांपूर्वी सोमवार, मंगळवार रोजीं पाऊस पडला त्यापुढें थेंब नाहीं. आतां लोक पुन्हा पावसाची वाट पाहून आहेत. गेल्या पंधरवाड्यांतील पाऊस ऐन वक्तावर पडला तसाच आतां पडेल तर मौज आहे. या वर्षी बहुत ठिकाणच्या पेरण्या दुबार झाल्या आहेत व ! अजूनही चांगला पाऊस नी पडेल तर काळजी खरी.

—०००—

उमरावतीहून रा. रा. परशराम सखाराम माजी शिरस्तेदार संकेता प्रमाणें १४वे तारखेस कलकत्याकडे जाण्याकरितां निघून गेले.

—०००—

रा. रा. वामनराव बाळाजी अकोल्याचे अक्टिंग डिपुटी इजुकेशन इन्स्पेक्टर या आठवड्यांत पारस, शेगाव, जलंब या शाळा पाहण्यास गेले होते.

—००—

अकोल्याचें हायस्कूल, नार्मलस्कूल व डिपुटी इन्स्पेक्टराचें आफिस यांकरितां नवराकींत जागा तयार करविली त्याप्रमाणें या आठवड्यांत तीं त्या त्या स्थानीं गेलीं.

—०००—

बाळापुर पेठेंतील स्कूलमास्तर रा. केशवराव लक्ष्मण जोरवेकर यांनीं शिवाजी राजाचा वृत्तांत यावर प्राकृत कवितेचें पुस्तक केलें होतें तें वऱ्हाडांतील प्राइज कमिटीनें पास करून त्यांस १०० रुपये बक्षिस दिले. आतां जोरवेकर हे सदरहू पुस्तक छापण्याच्या तजविजींत आहेत. मागें विचित्रपुरी नावाचें एक पुस्तक यांनीं केलें होतें त्याबद्दल पुण्याच्या दक्षिणाप्राइज कमिटीकडून यांना बक्षिस मिळालें होतें व इकडील डायरेक्टर साहेबांनीं त्या पुस्तकाच्या ३०० प्रति घेऊन त्यांस मदत केली होती. हे गृहस्थ हुशार असून यांची लिहिण्याची सरणी चांगली आहे. यांच्या बरोबरीचे व यांहून अधिक असे मास्तर इकडे बहुत आहेत त्यांनीं कीर्त्यर्थ व देशहितार्थ असे ग्रंथ करून उजेडांत यावें हें त्यांस योग्य आहे.

—०००—

बुलढाण्याहून पत्र आल्यावरून समजतें कीं, हवा चांगली आहे. परंतु यंदा पर्जन्य फार थोडा आहे. उन्हाळ्यांत पाणी कांहीं राहू नये असा प्रकार हल्लींच्या स्थितीवरून दिसतो. एथें महर्गता अकोल्याहून जास्त आहे. मेजर बेल साहेब कमिशनर एथें आले आहेत ते महिना अखेर पर्यंत रहातील असें सुमार आहे.

—०००—

यवतमाळ जिल्ह्यांतून पत्र आल्यावरून समजतें कीं तिकडे पर्जन्य वेळचे वेळीं बोलाविल्या सारखा येत असल्याकरणानें सर्व पिकें उत्तम असून शेतकरी लोक आनंदांत आहेत.

—०००—

राळेगाव परगण्यांतील 'क्ष' या सहीचें पत्र पोंचलें पुढील अंकीं घेऊ.

—०००—

तारिख २४ आगस्ट पासून उमरावतीची गाडी बंद होणार अशा बद्दल अधिकाऱ्यांचे हुकूम येऊन दाखल झाल्याचें समजतें. वर्षांतून आठ दहा महिने ज्या रेल्वेपासून सरकाराचा पुष्कळ फायदा होतो ती दोन महिने कांहीं थोडा तोटा सोसावा लागतो ह्मणून बंद करणें आह्मास रास्त दिसत नाहीं. उमरावती हें शहर खामगावा सारखें नाहीं. खामगावीं फक्त कापसाचा व्यापार हंगामाचे दिवसांत चालतो; परंतु उमरावतींत सर्व किराणे जिनसांचा व्यापार हमेशा चालू आहे. तेव्हां थोड्या दिवसांकरितां लोकांची गैर सोय करणें बरोबर नाहीं. आतां गाडी बंद झाली ह्मणजे बडनेराहून उमरावतीस माल नेण्याची व्यापारी लोकांस तजवीज केली पाहिजे आणि एकदम सरकारांनीं गाडी बंद करण्याचा हुकूम दिला या मुळें बैलगाड्यांचें भाडें थोड्या दिवसांकरितां अतिशय पडेल. महिना दोन महिने पर्यंत टिकिटाचे दर थोडे वाढविले तर लोकांचीं कांहीं हरकत नाहीं. किंवा हंगामाचे दिवसांस योग्य असा जो स्टेशन संबंधी वगैरे खर्च आहे तो कमी केला आणि कांहीं लोकांस बाहेर पाठविले तरी खर्चापुरतें उत्पन्न होईल. दोन गाड्या आहेत त्यांतील एकच ठेवली तरीही खर्च कमी होईल. या प्रमाणें विचाराची तजवीज कांहीं न करितां गाडी अगदीं बंद करणें यांत सरकारांचें देखील हित नाहीं असें आह्मास वाटतें. मेहरबान रेसिडेंट साहेब या गोष्टीचा विचार करून आपला हुकूम फिरवितील अशी उमरावतींतील पुष्कळ लोक आशा करित आहेत. या बाबदींत लोकांनीं अर्ज केला आहे व मे० कमिशनर साहेबांनींही आपला अभिप्राय लोकांचे तर्फे दिला आहे असें ऐकतों.

नोटिस—रामा वल्लद कुसाजी नरगट रहाणार मांडवी तालुके वरूड जिल्हा चंद्रपुर प्रांत नागपुर यास पांडू वल्लद रामजी अळोने रहाणार कारंजे बिबी तालुके मोर्तिजापुर जिल्हा उमरावती यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आपली मुलगी जानकी इचा आम्हाशी गंधर्व करून देण्याचा निश्चय केला होता व वैशाख वद्य १० रोजीं गंधर्व व्हावयाचें होतें त्याप्रमाणें तुम्ही करून दिलें नाहीं. आम्हावर तुमचे एक माणसानें कांहीं दोषारोप केला होता त्याचें निराकरण कायदेशीर करून आम्ही निर्दोष झालों आहों व या गंधर्वाचे बाबदींत ठरावाचे वेळीं आम्ही सोन्या रुप्याचे दागिने व कपडे मिळून सुमार एक हजार रुपयांचा विषय तुमचे मुलीचे अंगावर घातलेला आहे तेणें करून आमचा लग्नाचा हक्क शाबीद आहे तुम्ही दंडेली करिता याजकरितां तुम्हाला मुद्दाम ही नोटिस देऊन कळवितो कीं आजपासून १५ दिवसांत तुम्ही आपले मुलीचा आम्हाशी गंधर्व करून द्यावा. असें न कराल तर तुम्हावर सरकारांत फिर्याद करून सर्व खर्च भरून घेऊ व आम्ही आपली बायको आपले ताब्यांत घेऊ. त्यांत तुमचा फार अपमान होईल याजकरितां आगाऊ कळविलें आहे. या नोटिशीचा जबाब देणें असेल तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत द्यावा. पुढें तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. तारीख १६ माहे आगष्ट सन १८७३ इसवी मुक्काम अकोले.

(सही) पांडु वल्लद रामजी अळोने
याचे वतीं कुलमुखत्यार शेखलाल
वल्लद शेखगुलु कामरगावकर द
स्तुरखुद.

## वर्तमानसार

माळव्यांत धार येथें वृत्तधारा नावाचें वर्तमानपत्र नवीन निघूं लागलें आहे त्याचे दोन अंक आम्हाला पोंचले. तें बऱ्या रीतीनें चालेल असें दिसतें.

इराण देशाचा शहा युरोप खंडांत गेला आहे त्याचे पाठीमागें इराणांत चोरांचा पुंडावा फार माजला आहे. ते लोकांच्या मालाच्या चोऱ्या करतात व मालकास तो माल पुन्हा निमे किमतीनें विकतात. तेथील गवरनरानें त्यांच्या बंदोबस्तास लोक पाठविले होते त्यांस त्यांनीं पकडून कैद केलें.

सुरतेच्या सरकारी सेविंग बांकेमध्यें ३००० रुपया पावेतों ठेव ठेवण्यास सरकारानें मोकळीक दिली. त्यामुळें गेल्या आठवड्यांत लोकांनीं त्या बांकेंत सुमार एक लाख रुपये ठेविले.

भावनगरास पाऊस फारच कमी आहे पर्जन्यकाळ लागल्यापासून तिकडे सारा ९ इंच मात्र पाऊस पडला.

सुरतेस एक हिंदुस्थानी वर्तमानपत्र नविन निघणार आहे.

सुरतेस लवकरच एक सुताचा व विणण्याचा कारखाना एक कंपनी काढणार आहे.

गायकवाड सरकारांनीं श्रावण मासांत मांस विकूं नये व लोकांनीं खाऊं नये असा हुकूम केला होता तो रद्द केला.

हिंदुस्थानच्या सर्व भागांतून विलायतेस साक्षी देण्याकरितां जाऊं इच्छिणारे गृहस्थांची संख्या ७७ आहे असें समजून आलें आहे यांतून कोणास जाण्याविषयीं हुकूम होतील ते पुढें समजेल. यांत मुंबई इलाख्यांतील लोक ३३, बंगाल्यांतील १८ मद्रासेकडील १९, पंजाबाकडील ८ व वायव्यप्रांतांतील ३ आहेत.

बंगाल्याकडे बाबू किशोर चंद्रमित्र नावाचे एक गृहस्थ मरण पावले. हे सतत ३० वर्षें देशहिताचे कामीं झटत होते. हे वर्तमानपत्रास पुष्कळ लिहित असून उत्तम वक्तेही होते.

भावनगरचे राजास इंग्रेज सरकारला वर्षास एक लाखाहून अधिक खंडणी द्यावी लागते त्याबद्दल उक्ते ३२ लक्ष रुपये आज घेऊन खंडणी माफ करावी असें त्यांचें बोलणें आहे. या संस्थानाची अर्ध कोट रुपये शिलक आहे असें कळतें.

मुंबईच्या स्मालकाज कोर्टाचे पहिले जडज मि० ओलियरी ६ म०चे रजेनें विलायतेस गेले त्यांचे जाग्यावर मि० कूपर पोलीसचे सेकंड माजिस्त्रेट व त्यांचे जाग्यावर मि० डोसाभाई फ्रामजी आणि डोसाभाईचे जाग्यावर रावबहादूर नाना मोरोजी याप्रमाणें नेमणुका झाल्या.

माळव्यांत बेळगावाकडे व साता ऱ्याकडे पाऊस बरा आहे. रत्नागिरीकडे मध्यम आहे. व खानदेश, नाशिक, सोलापूर, धारवाड, ठाणें व पुणें जिल्ह्यांत पाऊस चांगला नसून बोभाट आहे.

इराणांत एका प्रतिवादीस हुकूमनाम्याचे फेडीकरितां रस्ते झाडण्याचा हुकूम झाला.

साताराचे वे. शा. रा. रा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर मरण पावले.

पोपयीचा वाळलेला चीक अन्नपचनार्थ प्रशस्त आहे. असें डाक्टर म्हणतात.

वरणगावास रा. रा. काशिनाथ महादेव थत्ते मामलेदार नेमल्याप्रमाणें ते येऊन काम पाहू लागले.

धुळ्याचे मामलेदार रा. रा. त्रिंबक सदाशिव पंडित ४ महिन्यांची रजा घेऊन रामदुर्ग संस्थानांत गेले.

धुळ्यास क्लाक टावर (लांबून दिसावया जोगें घड्याळ) बांधण्याची शुरुवात झाली आहे. खा. वै.

सातारा जिल्ह्यांत कऱ्हाडास नाव बुडून १२९ मनुष्यें पाण्यांत पडलीं त्यांतून चौथाईही जिवंत निघालीं नाहींत.

अहमदनगर—सर्व लोकांचें लक्ष्य तूर्त पर्जन्याकडे लागलें आहे. लवकर न पडेल तर आलेलें पीक नाहींसें होईल. न्या. सिं.

छोटी लढाई. कलकत्यातील किमेक विद्यालयांतील विद्यार्थ्यांची आपसांत छोटी लढाई झाली तिचा प्रकार असा—कलकत्याच्या मेडिकल कालेजांतील युरोपियन व हिंदु विद्यार्थ्यांत प्रथम तंटा उत्पन्न झाला. विद्यागुरु धडा सांगत बेळेस वर्गांतील पुढील जाकांवर युरोपिय

न विद्यार्थी हिंदु विद्यार्थ्यांस बसूं देतना ह्मणून हिंदुस फार वाईट वाटे. एके दिवशीं एका हिंदु विद्यार्थ्याने धीर करून पुढील बाकावरील युरोपियनास एकीकडे सरकावून आपण बाकावर बसला. त्यामुळे युरोपियन विद्यार्थ्यांचे पित्त खवळून त्यांनीं हिंदु विद्यार्थ्यांस मारण्यास आरंभ केला. इतक्यांत धडा सांगण्याकरितां गुरूची स्वारी आल्यामुळें मारामारी बंद झाली. गुरू गेल्या नंतर पुनः मारामारीस आरंभ झाला ती इतकी पेटली कीं, हिंदुविद्यार्थ्यांस आपल्या संरक्षणा करितां पळून दडून रहावें लागलें, कांहीं हिंदू विद्यार्थ्यांनीं कालेजाचे प्रिन्सिपाल यांच्याकडे फिर्याद केली परंतु त्यांनीं या गोष्टीकडे लक्ष्य दिलें नाहीं. कलकत्याच्या मेडिकल कालेजांत सुमारें एक हजार विद्यार्थी आहेत. ज्या दिवशीं ही मारामारी होण्यास आरंभ झाला त्याच दिवशीं दोन प्रहरा नंतर कालेजांतील सर्व विद्यार्थी नाहींसे झाले हें पाहून कालेजाच्या अधिकाऱ्यानें आपल्या कामावर परत न आले असतां दंड होईल अशी नोटिस लावली असतांही कांहीं युरोपियन विद्यार्थी आले नाहींत. मारामारी बंद होत नाहीं असें शेजारच्या प्रेसिडेन्सी कालेजाच्या मुख्य गुरूनें पाहून त्यानें बंगालचे डायरेक्टर आव पब्लिक इन्स्ट्रक्शन यांस लिहून पाठविल्यावरून ते खुद कालेजांत आले व दुसरे कांहीं साहेब लोक मिळून मारामारीची चौकशी चालविली. मारामारी होऊं नये ह्मणून दुसरे दिवशीं पोलिसच्या लोकांनीं ज्या रस्त्यावर कालेजिस आहेत त्या रस्त्यावर व मेडिकल कालेजांत बंदोबस्त ठेवला होता. कालेजांत व कालेजाच्या आवारांत व रस्त्यावर युरोपियन विद्यार्थ्यांनीं हिंदूविद्यार्थ्यांस मारलें ही गोष्ट कलकत्यांतील इतर विद्यालयांतील हिंदु विद्यार्थ्यांस वाईट वाटली. हिंदु विद्यार्थ्यांस चिथावण्याकरितां युरोपिअन विद्यार्थ्यांनीं मेडिकल कालेजावर निशाण उभारलें व एका बाजूस मनुष्याच्या डोकीची कवटी लाऊन ती उभी केली. हें पाहून हिंदु विद्यार्थ्यांच्या अंगांत ही स्फुरण आलें व त्यांनीं ही निशाण उभारून, कलकत्यांतील विद्यालयांपैकीं सुमारें २००० विद्यार्थी मेडिकल कालेजासमोर जमून युरोपिअन विद्यार्थ्यांस मारामारी करण्याकरितां बलाऊं लागले. परंतु हिंदूंचा जमाव पाहून युरोपिअन आले नाहींत. इतक्यांत पोलीसचे डेपुटि कमिशनर, सुपरिंटेंडेंटस, कान्स्टेबलस, शिपाई आल्यामुळें पुढें एकादा अनर्थ झाला असता तो झाला नाहीं या वरून बंगाल्यांतील युरोपिअन व नेटिव लोकांत फार रहस्य आहे असें दिसतें.

ने. ओ.

---

## सन १८७२।७३ चा कपाशीचा हंगाम.

दक्षिण महाराष्ट्र देश खेरिज करून सर्व पश्चिम हिंदुस्थानांत व वऱ्हाडांत मोफ्युशिल कंपनीच्या शाखा आहेत. ह्या इलाख्यांतील मोठ्या बाजारांचे प्रत्येक गांवीं ह्या कंपनीचे विश्वासुक एजंट आहेत. त्यांचे कडून आलेले वार्षिक रिपोर्ट मि० जेम्स मेलव्हील जनरल म्यानेजर हे तपासून सर्व भागीदारांनां पोंचवितात. मागील प्रत्येक हंगामांत व्यापाराच्या बाजारांची कशी काय स्थिति होती हें यांच्या रिपोर्टावरून बिनचूक कळून आलें आहे. नुकताच जो सन १८७२।७३ चा कपाशीच्या हंगामाचा रिपोर्ट आला त्यावरून पुढें लिहिलेली हकीकत मिळाली आहे.

ह्या वर्षीं वर्धा व हिंगणघाट प्रांतांत मात्र अनुमानापेक्षां कपाशीचें उत्पन्न फार कमी झालें. येथें मागील सालापेक्षां यंदा सव्वीस हजार एकर कपाशीची लागवड कमी झाली. शिवाय सप्टेंबर व आक्टोबरांत जे मोठमोठाले पाऊस पडले त्या योगानें नवीन पिकांची सर्व नासाडी झाली. ह्या पावसानें ज्यांचें कांहीं नुकसान झालें नाहीं अशीं शेतें फार थोडीं सांपडतील. हंगाम लागतांना तेथें कपाशीचा भाव २७० दोनशें सत्तर रुपये खंडी ह्मणजे मुंबईच्या भावा पेक्षां दहा रुपये खंडीनें जास्त होता. लवकरच लिव्हरपुलास तेजी झाल्यामुळें तेथील भाव ३१२ पर्यंत वाढला ह्या पेक्षां तेजी सर्व हंगामांत कधीच आली नाहीं. हाच भाव दिसेंबर व जानेवारींत राहिला. इंग्लंडास माल पाठविण्याचीं तारवें भरलीं गेल्यावर लगेच मंदी आली व भाव २३९ पर्यंत उतरला. रेल्वे मार्गानें जो कापूस आला त्यांत गतवर्षी पेक्षां यंदा २४९३ खंडी कमी आला ह्मणजे सन १८७१।७२ सालांत १६४०० खंडी आला व १८७२।७३ सालांत १३९६९ आला. उमरावतीस तर एकंदर पीक किती झालें हें लक्षांत आणलें असतां यंदा पेक्षां उत्तम हंगाम पूर्वीं क्वचितच आला असेल असें दिसतें. उमरावतीच्या बाजारांत यंदा इतकी कपाशी पूर्वीं कधीच आली नव्हती. मागील दोन्ही सालापेक्षां यंदा वीस हजार गठड्या जास्त आल्या पीक उत्तम रीतीचें आल्यामुळें भाव ही फार चढला कपाशीच्या योगानें शेतकरी लोकांस इतका फायदा झाला आहे कीं, कपाशीचे लागवडी करितां आतां नवीन जंगलचे जंगल साफ केले जात आहे टेंकड्यांचे बाजूवर नांगर चालत आहेत व जेथें कधींच नांगर पडले नाहींत, अशा कान्याकोपऱ्यांतील जमीनी सुद्धां तयार होत आहेत. मि० डुयेगल असें ह्मणतात कीं उमरावतीच्या उत्तम कापसाला लिव्हरपुलास चार पेनी पाउंडानें जरी कोणी विचारलें नाहीं तरी वऱ्हाडचे शेतकरी कपाशीची लागवड कधींही सोडणार नाहींत. उमरावतीच्या बाजारांत ज्या ऐंशीं हजार गठड्या आल्या त्या शिवाय दहा हजारां पासून पंधरा हजारां पर्यंत बोंदऱ्या जानेवारी नंतर भाव उतरल्यामुळें जिल्ह्यांत तशाच पडल्या आहेत. अकोटास नेहमींपेक्षा दिढीनें पीक जास्ती झालें परंतु लोकांनीं पुष्कळ कापूस खंडून ठेविल्यामुळें बाजार सुरळीत चालत नसे. मुंबईस लिहून येई त्यापेक्षां नेहमीं सहा पासून दहा रुपये पर्यंत खंडीस भाव जास्त असे. निघालेल्या पिकाच्या ६० हजार गठड्या होतील असें अनुमान होतें परंतु त्यापैकीं वीस हजार गठड्या अद्याप जिल्ह्यांत शिलक आहेत असें वाटतें. शेगावच्या लहानशा बाजारांत यंदा जे सट्टे झाले तसे आजपर्यंत कधींच झाले नव्हते. यंदा तेथून ज्या पंधरा हजार मजबूद दाबलेल्या गठड्या बाहेर रवाना झाल्या तितक्या आजपर्यंत कधींच रवाना झाल्या नव्हत्या. परंतु जरब भावाविषयीं लोकांच्या चढाओढीविषयीं व फायदा होईल अशा रीतीनें कपाशी विकत घेतां येणार नाहीं, असें विषयीं नेहमींच्या कुरकुरी आहेतच.

खामगावाहून ३९ हजार खंडी कापूस बाहेर रवाना झाला व आणखीही दहा हजार खंडी जास्त गेला असता, परंतु करली येथील कापूस बैल गाडीनें खंडाळ्याच्या घाटांतून थेट मुंबईस पाठविणें जास्त सोयवार पडल्यानें तिकडील कापूस रेल्वेनें आला नाहीं. येथील भाव दिसेंबरच्या पहिल्या तारखेपासून जानेवारीच्या शेवटापर्यंत २६० पासून २९६ पावेतों होता व नंतर उतरत उतरत हंगामाच्या शेवटीं २१० पर्यंत आला. सन १८७२।७३ सालांत आजपर्यंत कधींच झाला नाहीं इतका कापूस खानदेशांत तयार झाला परंतु एकंदर किती झाला हें समजलें नाहीं. ह्या हंगामास भडोंचेस कापूस बराच पुष्कळ चांगल्या प्रतीचा झाला. परंतु तयार होण्यास इतका वेळ लागला व मुंबई बाजारा पेक्षां भाव इतका चढून गेला कीं, व्यापाऱ्याच्यानें विकत घेववेना व सारख्याचा कापूस नीट करण्याचीं यंत्रें ज्यांच्या घरीं होतीं त्या व्यापाऱ्यांनां आपलीं यंत्रें सुरू ठेवण्याकरितां अतिशय महाग दरानें कापूस विकत घ्यावा लागला. बडोदें, भडोच, सुरत अमदाबाद व खेडा इतके जिल्हे मिळून एकंदर एक लक्ष पंचवीस हजार खंडी कापूस रवाना झाला, एंकदरींत धोलऱ्याचें पीक नेहमीपेक्षां जास्त होतें परंतु तेथून बाहेर कापूस गत वर्षीं पेक्षा फार कमी रवाना झाला. सन १८७१।७२ सालांत ५८ हजार खंडी रवाना झाला व सन १८७२।७३ त पंचवीस हजारा पेक्षांही कमी रवाना झाला. भावनगरास कपाशीचा भाव अतिशयच चढल्यामुळें धोलऱ्यांतून तिकडे पुष्कळ कापूस रवाना झाला व ह्याचमुळें धोलऱ्यांतून बाहेर इतका थोडा माल रवाना झाला. सर्व हंगामभर धोलऱ्याचे बाजारांत इतकी गर्दी असे व व्यापाऱ्यांची माल खरेदी करण्याची इतकी चढाओढ असे कीं, कधीं कधीं निरसमाल देखील विल्कूल परत जात नसे. धोलरा येथें व आसपासच्या प्रांतांत पुढें तेजी होईल अशा आशेनें ठेविलेला कापूस वीस हजार खंडी ह्मणजे सन १८७१।७२ साला पेक्षां तेरा हजार खंडी शिलक आहे. ह्या मंद झालेल्या बाजारांत एक मात्र चांगली गोष्ट झाली ती ही कीं सर्व तऱ्हेचा माल खपल्यानें मालांत भेसळ करण्याची व्यापाऱ्यांनां जरूर पडली नाहीं ही जी लांबच्या व्यापाऱ्यांनां फसविण्याची रीत होती ती आतां पुष्कळ कमी झाली आहे अशा विषयीं सर्व जिल्ह्यांतील एजंटांचे रिपोर्टांत लिहिलें आहे.

खा. वै.

## सन १८७३ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

गावचे वंशपरंपरेचे अधिकारासंबंधी कायदा आहे तो सुधारण्याविषयींचे आक्टाचा मसुदा.

( मागिल अंकावरून पुढें चालू. )

९. १. वतन ज्या कुटुंबाकडे, किंवा कुटुंबाच्या ज्या शाखेकडे चालत असेल त्या कुटुंबाचा किंवा शाखेचा मुख्य कोण हें ठरविणें किंवा वतनाचे हिस्से, किती एक मनुष्यांत झाले असतील तर मुख्य हिसेदारांची संख्या व नावें व त्यांचे हिशांची आणेवारी ठरविणें कलेक्टराचें काम आहे.

२. कोणतेही वतनाच्या नेमणुका पूर्वीं झाल्या त्या वेळीं जो मनुष्य हिसेदार ह्मणून कलेक्टरानें कबूल केलेला असेल त्याचा कुळपरंपरागत वारस किंवा परवानगीनें दत्तक घेतलेला वारस ह्मणून जो कोणी शाबीद झाला नसेल तो मुख्य हिसेदार आहे असे दाखल करूं नये.

रकम ३. एकाच कुटुंबाचे किंवा कुटुंबाचे एकाच शाखेचे मनुष्याचे हिसे रुपयाचे अष्टमांशाहून कमी विभागलेले असतील तेव्हां त्या मनुष्याचा वारचा ह्मणून मुख्य हिसेदाराप्रमाणें नाव दाखल होण्यासाठीं त्यांपैकीं एक नेमून देण्यास त्यांस कलेक्टरानें सांगावें. आणि एका महिन्याहून कमी नाहीं अशी मुदत कलेक्टरानें नेमावयाची त्या मुदतींत ते सदर्हूप्रमाणें करण्यास चुकले तर सदर्हूप्रमाणें नेमणूक होण्याचा सर्वांहून अधिक हक्क कोणाचा आहे हें संक्षिप्त रीतीनें काम चालवून कलेक्टरानेंच ठरवावें. आणि मुख्य हिसेदार ह्मणून त्याचें नाव लागलेंच दाखल करावें. मुख्य हिसेदार ह्मणून नाव दाखल होण्याचा हक्क पुढें चालणें तो या रकमांअन्वयें नेमलेले मनुष्याकडे वंशपरंपरा चालेल. परंतु नेमणुका परभारें घेण्याचा किंवा जमीनी आपले कबज्यांत ठेवण्याचा कोणताही हक्क इतर हिसेदारांचा असेल त्या हक्कास त्यापासून व्यत्यय येणार नाहीं.

१०. कोणतेही वतनाचीं कामें बरोबर करण्यासाठीं किती वहिवाटदार जरूर आहेत हें ठरविणें व त्यांची हल्लींची संख्या असेल ती त्याप्रमाणें, कमज्यास्त करणें हेंही कलेक्टराचें काम आहे, वहिवाटदारांचे संख्येविषयीं कलेक्टरानें ठराव केला असेल तो सरकारी कामाच जरूरीप्रमाणें वेळोवेळीं फिरविण्याचा अखत्यार आहे. चाकरी करण्याचा कोणते मनुष्यांचा हक्क आहे व त्यांणीं कोणते रीतीनें चाकरी करावी हेंही, खालीं लिहिलेले कानूस अनुसरून कलेक्टरानें ठरवावें. परंतु असें ठराविलें आहे कीं कोणी मनुष्य मुख्य हिसेदार नसेल त्याचा सदर्हू प्रकारचा चाकरी करण्याचा हक्क कबूल करूं नये.

[ पुढें चालू ]

---

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २४ आगष्ट सन १८७३ इ० | अंक ३४

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८४ |
| " दुसरे खेपेस | ८२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. अलीकडे आपले सेवेंत अंतर पडलें. सिंहस्थ यात्रेस गेल्यामुळें असें झालें.हल्लीं खालीं लिहिल्या मजकुरास जागा द्यावी ह्मणोन शिफारस करितों.

खासगी पत्रावरून कळतें कीं, बनारस येथें दुर्गा देवीचा कळस आपोआप खालीं पडला व एके मारुतीचे तोंडातून रक्तस्राव एक दिवस होत होता.

वाशिम एथील भास्कर व्यंकटेश तहशिलदार यांस पेनशन मिळण्याकरितां सार्टिफिकिट मिळाल्यावरून नोकरीस निरुपयोगी ठरले परंतु त्या गोष्टीस कित्येक दिवस झाले अद्याप त्यांचे जागेवर दुसरे इसमाची नेमणूक झाली नाहीं. मोर्तिजापुरचे तहशिलदार तुकाराम परशराम यांजला सार्टिफिकिट मिळण्याबरोबर लागलीच अंक्टिंग नेमणूक झाली होती. हल्लीं असें का झालें समजत नाहीं.

मेहेरबान मीर इनायतहुसेन तहशिलदार यांचे कुटुंबास मागील मंगळवारीं देवाज्ञा झाली. गरोदर असल्यामुळें प्रसूत समयीं हा प्रकार घडला. ही बाई स्वभावानें व गंभीरपणानें चांगली असोन परमेश्वरें दिलेलें ऐश्वर्यंत कालक्रमण करीत असे. ही वार्ता तहशिलदार यांचे इष्टमित्रांस व माहितगारास कळल्यावर वाईट वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

पाऊस नाहीं. पिकें वाळूं लागलीं ह्मणतात. ईश्वरास काळजी!

एक नळगावकर

*** वाशिमचे भास्कर व्यंकटेश यांची जागा भरली आहे. पुसदचे वाशिमास आणून पुसदेस नवीन तहशिलदार नेमिले आहेत. ए. व. स.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. तारिख ३ आगष्टचे अंकांत एक समाधान इच्छिणारा याणें कायद्याविषयीं शंका घेऊन प्रश्न केला; त्याचें उत्तर सन १८७२ चा आक्ट नंबर १ यांतील कलम ६५ टीप (अ) समेत तिन्ही प्रसंगास नोटिस दिलेली असली पाहिजे असा अर्थ होत नसून दोन प्रथमचे प्रसंग खेरिज करून फक्त तिसरा प्रसंग (ज्या मनुष्याला हजर करणें, कायद्यावरून भाग आहे, अशा मनुष्याच्या कबजांत अथवा सत्तेंत आहे अशा दस्तैवजाबद्दल नोटिस दिलेली असली पाहिजे) असें लिहिलें आहे या मजकुरास वरील दोन प्रसंग लागू होत नाहींत. कारण त्या दोन्ही प्रसंगांत नोटिशीबद्दल अगदीं जिकर नाहीं. आणि या धोरणानें कलम ६६ यांतील अवलचा मजकूर नोटिशीबद्दल लिहिला आहे त्यांतही (ज्याच्या ताब्यांत अथवा सत्तेंत दस्तैवज आहेत त्यानला हजर करण्याची नोटिस दिलेली पाहिजे) असें लिहिलें आहे. त्या ठिकाणीं पोलिसीबाहेरील दस्तैवजाबद्दल नोटिशीचा जिकर नाहीं. जसे ६५ कलमांत पोलिसीबाहेरील दस्तैवजास नोटिशीचा जिकर नाहीं तसाच ६६ कलमाचे उत्तरभागांत नोटिस दिलेली असण्याची अवश्यकता नाहीं. त्यांत पोलिसीबद्दलही प्रसंग लिहिला आहे. यावरून दोन्ही कलमांचा विरोध आहे, असें आमचे अल्प बुध्धीनें वाटत नाहीं. कळावें तारिख १६ माहे आगष्ट सन १८७३इ.

लक्ष्मण रंगराव दाणे

दारव्हे.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस:—

श्लोक.

आहे लहान, गुणवान तथापि फार.
आलिंगिती निशिदिनीं मज थोर थोर.
देतें तयांस सुख सौख्य सदा अनंत.
ऐसें असूनि अमती मज निंदितात १.
जातां पथीं मज विलोकुनि लोक येती.
स्वोद्योग साधनि अधीं मज आदरिती
ही थोरवी मम असे जन नित्य गात
ऐसें असूनि अमती मज निंदितात २.
साधेसुधेंच लुगडें मजलागि डंची
लागे न चाड अगदीं मजला तयाची
संतुष्ट नित्य असते मिळतें तयांत
ऐसें असूनि अमती मज निंदितात ३.
ज्याची महा गजबजे जगतांत थोरी
त्या कस्तुरी परिमलासहि वस्त्र हारी
ते अन्य गंध मग कोण सुपात्र होत ?
ऐसें असूनि अमती मज निंदितात ४.
महिलि कोण मजहूनि जनास नारी;
माझी असे विदित ही सकळांस थोरी
मी कोणच्या न शहरीं बसेंत विदीत ?
ऐसें असूनि अमती मज निंदितात ५.
काहीं सुरूप नसतां भुलुनीच जाती,
आलिंगनार्थ मग ते जन शीघ्र येती
शंका न ओळख तरी धरिती मनांत
ऐसें असूनि अमती मज निंदितात ६.
प्राणेश एक नुसता मजला ह्मणाया
देतें जना इतर भोग किती गणाया
अंकांस शक्ति न, तयांस, गमे लचीत
ऐसें असूनि अमती मज निंदितात ७.
लावी मदीय लुगडें पतिला धुवाया
सेवा तशीच सगळीहि तया कराया
वेडा असा करुनि सोडितसें जनांत
ऐसें असूनि अमती मज निंदितात ८.
नाथा समक्ष इतरां उपभोग देतें
त्याच्या मनांत परि वाइटही न येतें;
माझी अशी अनुपमेय विचित्र गात
ऐसें असूनि अमती मज निंदितात ९.
गुह्यांग चुंबन करी मग नाथ भावें
तज्जन्य मोद हृदयीं न तदीय मावे
त्याला असा गुणवळें करितें विजात
ऐसें असूनि अमती मज निंदितात १०.
काहीं न काम करितें; नुसती रहातें;
मोडी न एकाहि कधीं निज काडि हातें
राहे कुठें तरि पडूनिहि कोपऱ्यांत
ऐसें असूनि अमती मज निंदितात ११

( पुढे चालू )

धुळें, ता० १४ आगष्ट १८७३.

चिलमचा मित्र एक "क"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

विनंती विशेष पत्र कर्ते महाराज आह्मी वर्तमानपत्रें ज्या उद्देशानें घेतो तो हेतू आमचा सिद्धीस जात नाहीं. तो शेवटास जाण्यात पोस्टाचें काम चांगलें चाललें पाहिजें. ह्या आमचे राळेगांव पोस्टांत अलीकडे हरल मेसेंजर नसल्यामुळें जो घोटाळा चालला आहे तो लिहितां येत नाहीं. आमचे गांवांतील लोकांची वर्तमानपत्रें येण्यास फारच दिनावधि लागते. एकादा अंक तर येतच नाहीं. आतां ह्या लोकांनीं वर्तमानपत्रें बंद करावीं कीं काय? आमचे गांवापासून पूर्व दिशेस वणी १८।१९ कोश व पश्चिमेस यवतमाळ १६।१७ कोश आहे. आतां या दोहो पोस्टां पैकीं ज्या पोस्टातून आमचीं पत्रें रवाना होतील तीं किती लवकर पोंचतील ह्याचें अनुमान सहज होतें. आह्मी तर अशी वहिवाट ठेविली आहे कीं राळेगांव पोस्टमास्तर हे आमचीं पत्रें यवतमाळाहून बोलावितात व आह्मी स्वत: राळेगावास जाऊन तीं पत्रें घेऊन येतों. आपण जर हा जिल्हा पोस्टाचे मुख्य यांजकडे न्याल आणि राळेगांव पोस्टांत शिपाई नेमण्याची तजवीज होईल तर चोहोकडील आपलीं वर्तमानपत्रें सुरू राहतील, नाहीं तर बंद होण्याचा वक्त आहे. व याजमुळें आमचा मनोभंग होऊन तुमचें ही नुकसान आहे. ह्या आमचे लिहिण्यावर पोस्टाचे अधिकारी जर लक्ष देतील तर त्याचे आम्हीं फार आभारी होऊं. अस्तु.

ह्या आमचे वणी तालुक्यांत रा. रा. अंबादास पंत तात्या तहशिलदार आल्यापासून सुधारणूकेचीं कामें जारी चालली आहेत. वणी येथील दुकानओळीचें व सडकेचें काम झपाट्यानें चाललें आहे. तालुक्यांतील मोठे व लहानांचे गांवचीं सुधारणा चालली आहे. गांवगन्नाचे पाटील व पटवारी यांचे पत्रव्यवहाराचा घोटाळा होता त्याजबद्दल त्या लोकांस किता देऊन उत्तम बंदोबस्त केला. सर्व तालुक्यांत सफाई चांगली झाली. शाळाखात्यास ही विशेष मदत असल्यानें माहरार लोकांस ही उत्तेजन येऊन ते आपलें काम का अमोनें करीत आहेत. साराश ह्यांची काम करण्याची शैली लोकांस हितावह अशी आहे.

राळेगाव परगण्यांतील एका लेडे गावचा राहणारा

"क्ष"

रा. रा. वऱ्हाडसमार कर्ते यांस—

वि. वि. बाहिर्लापिकेंतील एक चमत्कारिक श्लोक आढळला तो आपले वाचकांस करमणूक होईल ह्मणून लिहितो, प्रसिद्ध करावा.

श्लोक.

क:खेभातिहतोनिशाचरपति:केनांबुधौमज्जित: ॥ क:कीदृक्तरुणीविलासगमनं किंकुर्वतेसज्जना: ॥ किंपत्रंनृपते: किंपर्जुनधनु:कोरामरामाहृत: ॥ मध्याक्षेतरगध्यमाक्षरपदैर्भूयात्तवाशीर्वच:॥१

या श्लोकांत प्रश्न आहेत ते.

१. खे क: भाति.—( आकाशांत कोण प्रकाशतो?)

२ निशाचरपति: केन हत:— ( रावण कोणी मारिला?)

३. अंबुधौ क: मज्जित:—( सागरांत कोण बुडाला? )

४. तरुणीविलासगमनं कीदृक्—[तरुण स्त्रीची विलासगति कशी असते?]

५. सज्जना: किं कुर्वते—(सज्जन काय करितात)

६. नृपते: पत्रं किं— [ राजाचें वाहन कोणतें?]

७. अर्जुनधनु: किं—( अर्जुनाचे धनुष्य कोणतें ! )

८. रामरामापहृत:क: —(रामाची बायको हरण करणारा कोण? )

याप्रमाणें कवीनें श्लोकाचे पहिले तीन चरणांत आठ प्रश्न करून शेवटच्या चरणांत सांगितलें कीं, या प्रश्नांच्या उत्तरांचीं जीं मध्याक्षरें तीं तुला आशिर्वादात्मक आहेत असें राजाला सांगितलें.

| प्रश्नांचीं उत्तरें. | मध्याक्षरें. |
|---|---|
| १ ग्रहेश [सूर्य] | हे |
| २ रामेण (रामानें) | मे |
| ३ मैनाक (पर्वत विशेष) | ना |
| ४ मंथरं [मंद] | थ |
| ५ रुचिरं (चांगले) | चि |
| ६ तुरंग [घोडा] | रं |
| ७ गांडीव (धनुष्य विशेष) | जी |

कवितेंत ह्या जागीं ज हा काहीं हेत्वर्थ घेतात.

| | |
|---|---|
| ८ रावण: (रावण) | व |

या श्लोकाच्या या साऱ्या खटाटोपीचा अर्थ हा कीं, "हे मे नाथ चिरंजीव" ह्मणजे हे माझ्या स्वामी तूं दीर्घकाल वाच

पत्रकर्ते महाराज मला वाटतें कीं हें असें काव्य फार क्लिष्ट होय. प्रश्नांच्या उत्तराचा शब्द कवीच्या मनांतील लोकांच्या मनांत आला पाहिजे; नाहींपेक्षां दुसऱ्याचा उपयोग नाहीं. आकाशांत कोण प्रकाशतो? याचें उत्तर हिरण्यगर्भ, आदि

त्य, सविता, भास्कर, हीं सूर्याचींच नावं आहेत यांतील येकादें घेतलें तर चालणार नाहीं. ग्रहेश हें जे कवीच्या मनांत आहे तेंच आलें पाहिजे व इतक्या एकंदर खटपटी पासून अर्थ गौरव तरी कांहीं उत्तम झालें असें दिसत नाहीं. केवळ आठ अक्षरें आशीर्वादाकरितां कवडी [illegible] लटपट हो! कळावें हे विनंती

आपला मित्र एक वाचक

## वऱ्हाडसमाचार

[illegible] मिती भाद्रपद शुद्ध २ शके १७९[illegible]

## मनुष्य आदराई कशानें होतो?

"विद्वान् सर्वत्र पूज्यते" हें म्हण आमच्या बहुतेक वाचकांस माहित असेल तरी तिजविषयीं दुसऱ्या [illegible] गोष्टी असतांहि उत्तम विद्येचा आदर कसा होतो ते आह्मी आपले वाचकांस अंमळ थोडक्यांत सांगू इच्छितो.

मनुष्याला विद्या चांगली असावी, सौजन्य असावें, भाषण मिष्ट असावें, आगत स्वागत असावें, सुस्वभाव असावा, लंडेलपणा नसावा इत्यादि बहुत प्रकार एके मनुष्याच्या ठाईं असले ह्मणजे तो विशेष आदराई होतो ही गोष्ट आह्मी नाकबूल करीत नाहीं. परंतु विद्येशिवाय बहुतेक चांगल्या गोष्टींचा अभाव असतांही एका विद्वान मनुष्याचे कांहींही दोष कोणी न पहातां त्याचा आदर कसा झाला व या हिंदुस्थानांत त्याचे कीर्तीचा ध्वज उभारिला गेला. असे विद्वान गृहस्थ कोण ह्मणाल तर नुकतेच मरण पावलेले मि॰ आनरस्टी साहेब प्रख्यात बारिस्टर.

आनरस्टी साहेबांचा स्वभाव फार तुसडा होता, त्यांचे कोणाशीं जमत नव्हतें, ते अतिशय बेपर्वा होते, कोणाकडे ते कधीं जात नसत व त्यांकडे कामाशिवाय कोणी जात नसत. न्यायाधिशाशीं देखील त्यांचे कधीं बनत नसे. तरी त्यांची उत्तम विद्या पाहून लोक त्यांकडे धाव घेईत. त्यांची फी पुष्कळ असे, ते ती आगाऊ घेईत व भाषण कठोर करीत तरी तें सर्व सहन करून कुळें त्यांच्या भजनीं लागत, हा आदर केवळ त्यांच्या उत्तम विद्येचा होय, दुसरा कशाचा नव्हे.

आनरस्टी साहेबाला गणगोत कोणी नव्हतें. मुलगे, बंधू किंवा इतर आप्तलोक त्यांच्या मरणप्रसंगीं मुंबईस कोणी नव्हते तरी त्यांच्या एका शब्दाच्या कर्तबगारीनें त्यांना किती आप्त मिळाले ह्मणाल तर ऐका, त्यांचें प्रेत पुरावयाला नेलें तेव्हां मुंबई शहरांतल्या सारखे रुंद व प्रशस्त रस्ते थोड्याच ठिकाणीं असतील. पण त्या मुंबईच्या रस्त्यांतून प्रेताबरोबर जाणारे लोक माबेनासे झाले इतकी दाटी त्या सभाला होती. पण ते लोक विशेष कोण ह्मणाल तर त्यांच्या जातीचे किंवा धर्माचेही नव्हते. परधर्मी, व परजातीचे पारसी, मुसलमान, व इतर हिंदू होते. कोणा युरोपियनाच्या प्रेताबरोबर ६००० पारसी व ६००० इतर गृहस्थ गेल्याचें कधीं कोणास आठवत नसेल असें आह्मास वाटतें; कवढा हा त्या पुरुषाचा आदर!

केवड्याविषयीं एका कवीनें एक उत्तम दृष्टांत दिला आहे तो आनरस्टी साहेबांना चांगला लागू पडतो.

श्लोक

व्यालाश्रयापि विकलापि सकंटकापि,
वक्रापि पंकिलभवापि दुरासदापि ॥
गंधेन बंधुरसि केतकि सर्वजंतोः
एको गुणः खलु निहंति समस्त दोषान् ॥ १ ॥

ह्मणजे केवड्याचे झाड सर्पाश्रित असतें, विरळ असतें, केवड्याला कांटे असतात, केवडा वाकडा असतो, चिखलांत असतो, दूर असतो, इतके याजमध्यें दोष आहेत तरी सुगंध ह्मणून जो एक त्यामध्यें गुण आहे तेणेंकरून तो सर्वांचा बंधूचे परी प्रिय झाला आहे. यावरून असें ह्मणतो अनेक दोषांनीं जरी भरलेला मनुष्य असला तरी त्यामध्यें एक जरी सद्गुण असला कीं, तो त्याचे सर्व दोषांवर पांघरूण घालून त्याचा सर्वत्र आदर करील. आनरस्टी साहेबांची विद्वता याप्रमाणेंच आदराई होती.

व्यवहारांत पाहिलें तर मनुष्य थोडें बहुत यस्कर झालें कीं त्याला पुढीलाविषयीं मोठी काळजी येऊन पडते, त्यांना वाटतें आपल्याला लवकर मुलें बाळें व्हावीत ह्मणजे तीं ह्मातारपणीं उपयोगी पडतील, पुढें आपलें नाव राखतील व इतकें निदान नच झालें तर अंतकाळीं हिक्कटार घेऊन प्रेताबरोबर धावतील व मंत्राग्नी तरी देतील. [illegible] पुढें कोणाच्या इच्छा तृप्त होतात किंवा कोणाच्या मागें राहतात. तें कसेंही असो, परंतु ईश्वराच्या अनुकूलतेनें ज्यांना मुलें बाळें नसतील त्यांनीं आनरस्टी साहेबाच्या प्रेतसमारंभाची वार्ता ऐकून मुलाबाळांची काळजी सोडून द्यावी. व गुणसंपादनार्थ झटावें. 'गुणी मनुष्याच्या प्रेतसंस्काराला दहा हजार परकी मनुष्यांचे हात लागले. अवगुणी मनुष्याच्या उत्तरकार्यास शेजारी देखील सगळे जात नसतील. शिवाय तोंडानें विषयीं तर बोलावयासच नको. असो. मनुष्याचा आदर उत्तम विद्येवर आहे तसा दुसरे कशावर नाहीं.

## पुस्तकांची पोंच.

ठाणें येथील स्कूलमास्तर रा. सखाराम बापुभाट [illegible] यांनी कष्टानें मुलांच्या उपयोगाकरितां सोपीं सोपीं कित्येक पुस्तकें केलीं व त्यांचा मुंबई इलाख्यांत पुष्कळ खपही चलील होत असतो असें आह्मांस समजलें आहे. या गृहस्थानीं स्वतां केलेल्या पुस्तकांपैकीं ४ पुस्तकें आह्मांस नजर पाठविलीं आहेत तीं स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. तीं पुस्तकें येणेंप्रमाणें.

१. सृष्टज्ञान परिभाषा ( फिनिकल जागृती)
२. मुंबई इलाख्याचा भूगोल.
३. ठाणें व कुलाबा जिल्ह्याचें वर्णन.
४. व्याकरणसार.

सृष्टिज्ञान परिभाषा याचीं ९६ पृष्ठ असून किंमत सहा आणे आहे या पुस्तकाची गुजराथींत तिसरी आवृत्ती छापली आहे. मुंबई इलाख्याच्या पुस्तकाची किंमत तीन आणे आहे. व त्याची हल्लीं छापलेली आवृत्ति सहावी आहे. [illegible] वर्णनाची व व्याकरणाची दुसरी आवृत्ती आहे व त्यांच्या किंमती अनुक्रमें दोन आणे व दीड आणा अशा आहेत. हीं पुस्तकें मुलांस उपयोगी असती [illegible] तरी [illegible] पुस्तकें पाहिजे असतील त्यांनीं [illegible] किंमती [illegible] पुस्तकें मागवून घेऊं. [illegible] उद्योगी [illegible] आह्मी [illegible] करितो. [illegible] आपली शाळा [illegible] करितात व मनुष्याच्या [illegible] काम पहातात.

## वऱ्हाड

देऊळगाव राजा—तारीख १७ आगष्ट. यांप्रांतीं पर्जन्य नसून शेती सुकत चालली आहे. सर्व लोक फारच दिलगीर आहेत. रानांत झालेले गवत सुकून गेलें. बाळापूरकडेही पर्जन्य नाहीं.

मि॰ बाळकरामजी [illegible] तालुक्याचे पोलीस इन्स्पेक्टर यांचे पायास कांहीं वायूचा आजार होऊन येथील इस्पतळांत आजारी होते ते दुरुस्त होऊन १६वे तारखेस आपले कामावर गेले.

येथील नेटिव डाक्टर करीमुल्ला यांजवर कांहीं संशय आल्यावरून त्यांस बंगाल्याकडे पाठविलें.

इकडे हुजरा ह्मणून येक आजार आलेला अजून कमी झाला नाहीं.

येथील राजे मानाजींग हे येथून तीन कोसावर मेहकराईत डोनगाव येथें राहतात संस्थानचे पूर्वींचे कामदार रा. दाजी नारायण वकील, रामचंद्र काशिनाथ कोंडे, बाळाजीपंत [illegible] सर्व नरतर्फ केले परंतु त्यांचे तीन तीन वर्षांचे पगार दिले नाहींत. राजे मानाजींग यांस [illegible] बिनपगारी नोकर [illegible] मिळत असतात [illegible] डाक्याकडे अलीकडे [illegible] केल्याची वार्ता [illegible] होईल तें सांगवत नाहीं. अद्याप तयारी वगैरे कांहीं नाहीं.

—०००—

शेळगाव परगण्यांतील पोष्टाच्या गैर सोयींविषयीं आमच्या आलेलें पत्र पहिले पृष्ठावर आह्मी छापलें आहे त्याकडे पूर्व वऱ्हाडचे सब इंस्पेक्टर यांनी कृपा करून लक्ष द्यावें.

मोर्शीचे तहशीलदारांनी कोणी खोटा अर्ज हुजूर केल्याबद्दल आह्मांस किरस्ता या साहेबांनीं एक पत्र आलें आहे. ते हुशार असून त्यांची चाल रीत चांगली असल्याबद्दल आह्मास ठाऊक आहे. तेव्हां अर्ज करणार कोणी दुश्मान किंवा कार्यसाधु, अगर कज्जाद असल्यास वरिष्ठांनीं बारीक चौकशी करावी.

—०००—

[illegible] एक पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं, [illegible] तहशीलदार गेले महिन्यांत दोन तीन दिवस तिकडे गेले होते त्यांनीं [illegible] चांगलें लक्ष दिलें. आणखी [illegible] आढळला तेथें [illegible] दंड वगैरे केले, व [illegible] दिल्या. पाटलाकडील [illegible] दंड झाले—[illegible] तीन [illegible] देऊन [illegible] त्यांनिही [illegible] आहेत. तहशीलदार यांनी [illegible] कामाविषयीं [illegible] आहे. पण [illegible] आहे. [illegible] नाहीं.

—०००—

[illegible] आठवड्यांत पडती भावना [illegible]. वळवाचा पाऊस थोड थोडे पडला आहे [illegible] आलें आहे. अकोल्यास गव्हाचा मंडप आहे. व त्यांतून धंद लोकड्यांनीं [illegible] असतात.

—०००—

[illegible] व मूर्तिजापुर याचे दरम्यान परवा दिवशीं पाऊस चांगला पडला असें समजतें.

—०००—

बाळापूरहून मागें ४ थे तारखेचें पत्र आलें होतें तें १० वीच्या वऱ्हाडसमाचारांत छापलें आहे त्यांत तिकडे पाऊस [illegible] लिहिलें पण ४ थे [illegible] तीन दिवस [illegible] पाऊस पडला. व पुढें ही ४।६ दिवस बरा पडला असें तार्तापत्र आल्यावरून समजतें. पण त्यापुढें आज [तारीख २१ ) पावेतों एक थेंबही नाहीं आणखी पावसाची जरूर आहे. दिवसा कडक ऊन पडतें. धान्याचा भाव चढत चालला आहे. व पडलें लोकांचें बरीच मनुष्य आजारी आहेत.

—०००—

पत्रें पाठविणारांस.

"लोकहितेच्छु, बाशीमकार" "पवत माळाकडील क्ष" "एक गरीब मुकाम गोकुळ वृंदावन" यांचीं पत्रें उशीरानें पोंचलीं तीं पुढील आठवड्यांत घेऊं.

"विद्यावृध्धीच्छु" जळगावकर याचें पत्र पोंचलें.पुढील अंकांत प्रसिध्द होईल. एक दुःखित व गांवही पत्र पोंचलें.

—०००—

आह्मास [illegible] परम संतोष वाटतो कीं उमरावती डावस्कुलांतील १७५ रुपये पगाराचे हेड आसिस्टंट मास्तर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांस १०० रुपयांवर वाशिमास पाठविलें होतें पण हल्लीं पुन्हा डायरेक्टर साहेबानीं मेहेरबानी करून त्यांस १७५ रु॰ पगारावर उमरावतीस नेमिलें. मेहेरबान कपांडी साहेब यांनीं या कामीं फार चांगली नजर

पोचाविषी व आपली पहिली चालणी सुधारली याबद्दल आम्ही त्यांचे गुण घेतो व आभार मानितों. बिच्याऱ्या रघुनाथ रावाला हे तीन महिने कांहीं दुष्ट ग्रह आले होते व त्याचें आतां निरसन झालें असेंच ह्मणावें. दुसरे काय?

आतां अमरावती हायस्कुलाची विशेष सुधारणा होईल अशी उमेद वाटते. तर लोकांनीं पूर्ववत आपलीं मुलें शाळेंत पाठवीत जावीं अशी आमची त्यांस शिफारस आहे. या स्कुलांतील ७५ रुपयांचे असि० मि० दामोदर बाबुजी यांस तळेगाव दशासर येथें नेमिलें व हायस्कुलांतील ती जागा कमी केली व रा. रा. रघुनाथ शास्त्री यांतही तेथून ५० वरून काढून ३० रुपयावर मूर्तिजापुरास नेमिलें. आणि ५० वर रिसोडचे मास्तर रा. श्रीधरपंत यांस नेमिलें.

—000—

उमरावतीस या आठवड्यांत युरोपियन लोकांचा बाल वगैरे आनंदोत्साह झाला. गुरुवारीं अकोल्याहून डेपुटी कमिशनर, डायरेक्टर, इन्स्पेक्टर वगैरे साहेब गेले होते ते शुक्रवारीं सायंकाळीं परत आले.

—000—

पोष्टाची अतिशय त्वरा—अकोल्याच्या दोन देशमुखांना गुदस्त सालीं आगष्ट महिन्याच्या २८ वे तारखेस दोन पत्रें आमच्या आफिसांतून गेलीं होतीं तीं नागपुरच्या डेड लेटर आफिसामधें जाऊन तेथून या महिन्याच्या ९ वे तारखेस आम्हास परत मिळालीं, वा:! पोष्टानें पुरे बारा महिने होऊं दिले नाहींत इतकी त्वरा कशाला केली?

—000—

मेजर ए. एच. मिकेट वऱ्हाडांतील पोलिसावरील इन्स्पेक्टर जनरल हे आजारीपणामुळें तीन महिन्यांची रजा घेऊन शिवल्यास जाणार असें वर्तमान आहे. त्यांनीं रजा घेतली म्हणजे क्या० सी. टी. केन हे अ० इन्स्पेक्टर जनरल होतील. मि० राइट बुलढाण्याचे सेकंड ग्रेड पोलिस सुपरइंटेंडेंट हे फर्स्ट ग्रेड होतील. व आमचे मेजर जेमिसन थर्ड ग्रेड आहेत ते सेकंड ग्रेड होतील असें म्हणतात.

—000—

मि० नौलिस साहेब असिस्टंट कमिशनर यांची प्रकृती नादुरुस्त आहे. ते दोनच्यार दिवस कचेरीत जात नाहींत.

—000—

वाशिमास १०० रुपयांचे मास्तरचे जागेवर तळेगाव दशासरचे मास्तर रा. लक्ष्मण गोविंद ऋषी यांस नेमिलें. आह्माला वाटतें कीं येथील मिडल क्लास स्कुलावरील मास्तर मि० सुंदर दामोदर यांचा हक्क त्या जागेवर अधिक होता. ते ८५ रुपयावरून ग्रेडेशनमध्यें ७५ वर आलेले आहेत. व त्यांची शाळाही चांगल्या स्थितींत आहे. मुलांचा भरणाही २०० च्यावर आहे, असा आजपर्यंत कधीं नव्हता. असें असतां त्यांस डायरेक्टर साहेबांनीं ही १०० ची जागा कां दिली नाहीं तें न कळे.

000—

अकोल्यास स्माल्काजकोर्ट येणार येणार अशी बहुत दिवस वार्ता आहे पण त्याप्रमाणें अजून येत नाहीं. दिवाणी कामें पुष्कळ तुंबून राहिलीं आहेत. अकोल्याचे तहशिलदार यांस तर आम्हीं रात्रींचे नऊ नऊ वाजतपर्यंत काम करितांना पाहिले आहेत व दुसरे दिवशीं सकाळीं ७ वाजतां कचेरींत आहेतच. अशी बारा पंधरा तास नोकरी कुठेंच कोणी करीत नसेल. आह्मास वाटतें कीं वरिष्ठांनीं त्यांचे हे श्रम मनांत आणावे.

—000—

गेल्या रविवारीं रेव्हरेंड नार्टन नांवाचे कोणी युरोपियन मिशनरी येथें आले होते त्यांनीं मिडल क्लास स्कुलांत येथील तरुण नेटिव गृहस्थांना क्रिश्चानिटाच्या संबधानें कांहीं व्याख्यान दिलें. मंडळी सुमार ४० जमली होती.

—000—

अकोल्याहून मेहकरास नेमलेले तहशिलदार रा. रा. एकनाथ मोरेश्वर यास रेसिडेंट साहेबांनीं बरतर्फ केलें असें समजतें. एकनाथरावांनीं अविचारानें आपणावर हा प्रसंग आणून घेतला, याजबद्दल आह्माला फार वाईट वाटतें. आह्मीं कित्येक वेळां त्यांस उपदेश केले होते पण त्यांनीं तो ऐकून आपली वृत्ती सुधारली नाहीं. यांचे दुसरे कित्येक चांगले गुण मनांत आणिले ह्मणजे यांस झालेले शासन भारी आहे असें वाटतें. परंतु खासगी गोष्टीकरितां न्यायाधिशानें न्यायासनावर बसून न्यायाकडे बरोबर लक्ष्य न देणें हें कृत्य मनांत आणिलें असतां शिक्षेचें स्वरूप भारी आहे असें वाटत नाहीं.

—000—

अकोल्यांतील जुने नामांकित वकील रा. रा. अमृतराव आबाजी यांची सनद रेसिडेंट साहेबांनीं रद्द केली असें कळतें. हे वर्तमान या आठवड्यांत बहुत लोकांस हळहळ वाटण्याजोगें आहे. या शिक्षेचे कारण कळल्यास पुढें लिहूं.

—000—

इलिचपुरचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. रामराव गोविंद हे एक महिन्याच्या रजेवर मुंबईकडे गेले.

—000—

कपाशीचा व्यापार संपल्यामुळें अकोल्याचें तारायंत्र आफीस बंद केलें.

—000—

मि० वेडडील साहेब पूर्व वऱ्हाडचे एक्झिक्युटिव इंजिनियर यांस दीड महिन्याची हक्काची रजा मिळाली. व त्यांचें काम ले० फाक्स असि० इंजिनियर यांस पाहण्याचा हुकूम झाला.

---

मि० हालडन टेंपररी असिस्टंट इंजिनियर यांस पब्लिक वर्क्स खात्यांतील नोकरीचा राजिनामा देण्याची परवानगी मिळाली.

---

क्या० एच. डी. पी. रोनिक हे थर्ड क्लास आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनर होते ते त्या जागेवर मुकरर झाले.

---

सन १८७३ चा ४ था पंजाब म्युनिसिपल आक्ट हिंदुस्थान सरकारांनीं वऱ्हाडास लागू केला. जुडि० डि०, जाहिरनामा नंबर १०९ ता० १३ जून १८७३

---

खालीं लिहिलेल्या दस्तऐवजांस कोर्ट फी भरावयाची हिंदुस्थान सरकारानें मना केली. जु० खा० चा जाहिरनामा नंबर ९९६ ता० ६ जून १८७३

क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम १९९ प्रमाणें आरोपितानां ज्याजोबो नक्कल अथवा तरजुमा द्यावयाचा तो कागद

२ क्रि० प्रो० कलम २०१ प्रमाणें आरोपितास जबान्यांच्या नकला द्यावयाच्या त्या.

क्रि० प्रो० कलम २७६ प्रमाणें फौजदारी कोर्टाचे ठराव अथवा हुकूम आणि जरवांनीं ज्यांजवर ठेविलेले चार्ज यांच्या नकला कोणा मनुष्याला कांहीं प्रसंगीमुळें लागत असल्यास त्या; आणखी यावषयीं असेंही ठरविलें आहे कीं, तो मनुष्य तुरुंगांत किंवा कोर्टांपुढे हजर असेल आणि कांहीं विशेष कारण असेल तर त्याला अशा कागदाच्या नकला द्यावयाच्या त्यांच्या लिहावळीचाही पैसा घेऊं नये.

४ क्रि० प्रो० कलम ३५७ प्रमाणें साक्षीदारांच्या जबान्याच्या नकला आरोपितास द्यावयाच्या त्या.

५ क्रि० प्रो० क० ४४६ प्रमाणें आरोपिताना ज्यांज्यांच्या नकला द्यावयाच्या त्या.

६ क्रि० प्रो० क० ५३८ प्रमाणें उपनीतिकेच्या हुकुमाच्या नकला.

## वर्तमानसार

महाबळेश्वरचें मनीआर्डर आफीस पर्जन्यकाळामुळें आक्टोबरच्या १० वे तारखेपर्यंत बंद केलें.

मि० आनस्टी साहेब बारिस्टर यांची सालीना दीड लाख रुपयांची प्राप्ती होती असें कळतें. तेंच ते मरण पावले त्याविषयींच बडोद्याहून तारायंत्रांतून एक कामगिरी त्यांनां आली होती.

डा० बुकनाट साहेब नागपुर प्रांतांतील विद्याखात्याचे इन्स्पेक्टर जनरल महामारीच्या आजारानें जबलपुरास मरण पावले. चीफ कमिशनर साहेबांनीं यांच्या मरणानिमित्त सरकारी वर्तमानपत्रांत दु:ख प्रदर्शित केलें आहे.

सुरतेस ब्राम्हण जातींत एक पुनर्विवाह लवकरच होणार आहे.

असें वर्तमान आहे कीं, मुंबईत म्युनिसिपालिटीच्या कामांत कीर्ती पावून गुजराथ्यांच्या आपलेस गेलले मि० क्राफर्ड साहेब पुन्हा मुंबईस येणार व कारटगखात्यांत त्यांनां मोठी नोकरी सरकार देणार आहे.

बडोदारेलवे कंपनीच्या तिसऱ्या क्लासच्या उतारू लोकांस कांहीं गैरसोयी व त्रास होता असें सरकारास समजल्यावरून सरकारानें त्या कंपनीचा रिपोर्ट मागितला आहे. जी. आय. पी. रेल्वे कंपनीच्याही उतारूंचे बहुत हाल होतात व त्यांविषयीं थोडे बोभाट झाले आहेत असें नाहीं. तथापि सरकार इकडे लक्ष विशेष देत नाहीं. तें देईल तर बरें होईल.

इराणचा शाहा तुर्कस्थानांत गेला.

महाराणी साहेबांचे तृतीय चिरंजीव प्रिन्स आर्थर हे स्नानाचे वेळीं बुडत असतां महत्प्रयासानें वाचले.

मुंबईच्या ग्रांट मेडिकल कालेजापैकीं दोन पारशी गृहस्थ मि० करशेटजी फ्रामजी खोरी व रुस्तुमजी कावसजी बहादूरजी हे विलायतेस इंग्लंडाच्या परीक्षेंत पास झाले. व आतां एम. डीच्या डिग्रीकारितां एडिंबरो येथें अभ्यास करीत आहेत. हें ऐकून आम्हास संतोष वाटतो.

दारुच्याचा कायदा मुंबई कौंसलांत नवा होत आहे. त्यांत माणसावर एक पैसा कर बसविला आहे. तो व दुसरे कांहीं कर कमी करावे म्हणून बरीच ओरडा ओरड झाली होती पण कोणी ऐकिली नाहीं. सर्व दारुच्या अमलांत आल्या असें कळतें.

आर्गसपत्रांत बडोदें संस्थानाविषयीं टाइम्सकर्त्याच्या मताविरुद्ध मजकूर लिहिला आहे. तो ह्मणतो कीं, श्री० मल्हारराव गायकवाड हुशार व व्यवस्थित आहेत. त्यांचे राज्यांत कांहीं बोभाट नाहीं. व त्यांचे मंत्री नानासाहेब खानविलकर, गोविंदराव मामा, बळवंतराव देव, नारायणभाई, बळवंतराव यशवंत व निंबाजी यशवंत हे फार चांगले आहेत.

देखणे आहेत कीं काय?

ए. व. त.

महाराणी साहेबांचे द्वितीय चिरंजीव ड्यूक आफ एडिंबरो हे रशिया देशांत सेप्टेंबर महिन्यांत जाणार व जानेवारी महिन्यांत व दशहाच्या कन्येशीं त्यांचा विवाह होणार.

कर्नल हेंडरसन पुण्याचे पोलिस सुपरइन्टेंडेंट यांचे जाण्याचे प्रसंगीं तेथील लोकांनीं प्रसिध्द सभा भरवून त्यांचा गौरव केला.

सर बार्टल फ्रियर साहेब यांणीं "पांडुरंग हरी" या नावाचें इंग्लिश भाषेंत एक नवीन नाटक केलें आहे.

चंद्रपुर येथें पुण्याचे रा. रामचंद्रराव कदम म्हणून गृहस्थ आहेत त्यांणीं मुलींच्या विद्यावृध्दीचे कामीं फार श्रम केले म्हणून सरकारानें प्रसिद्ध सभा भरवून त्यांस एक वाच (खिशांतील घड्याळ) नजर दिलें.

लहान मुला मुलींचीं लग्नें होऊं देऊं न येत यासाठीं अमदाबादेस एक सभा स्थापन झाली आहे व तींत मोठमोठाले विद्वान आणि कामदार मेंबर आहेत त्यांपासून कांहीं तरी फल होईल. अशी आशा आहे.

बडोद्याचे दिवाण नानासाहेब खानविलकर हे रयतेपासून लाच घेतात व जुलूम करितात असा बोभाटा रेसिडेंट साहेबांकडे आल्यावरून त्यांणीं श्री० मल्हारराव गायकवाड यांस कळविलें कीं, सदर्हू दिवाणास तुह्मी कामावरून दूर करावे. मानरून महाराजांनीं त्यांस घरीं बसण्यास हुकूम दिला. बाहेर बातमी पसरली आहे कीं दिवाण आजारी आहेत असें टाइम्सचा बातमीदार लिहितो.

पावसाची आहवाल

पुणें, रत्नागिरी, नगर, सोलापुर, कोल्हापुर, धारवाड, मुंबई, ठाणें, इंदूर, नाशिक, व सातारें येथें या आठवड्यांत पाऊस मुळीच पडला नाहीं असें तिकडील वर्तमानपत्रावरून समजतें.

[गोधअखबार पत्रांतून]

अखबार राजधानी दिल्लीजवळ आहे. तेथील महाराज मागील दिवसांत मांदे झाले होते. त्या योगानें उठण्याबसण्याचें देखील त्यांना सामर्थ्य नव्हतें. त्याजला कदरदानी या वैद्यानें उत्तम प्रकारचा उपाय करून सर्व रोगांपासून मुक्त केलें. परंतु आश्चर्य आहे कीं, महाराज साहेबांनीं त्या गरीब बिच्चारे वैद्यास एक कवडीसुद्धां दिली नाहीं. आतां या वैद्यास एक हजार रुपये दरमहा करून बडोदेसरकारांनीं बोलाविलें आहे तेव्हां जरूर आहे कीं, वैद्यमहाराज या सोन्याच्या चिमणीस हातून सोडणार नाहींत. नाहीं तर पस्तावतील.

राजधानी जंबू व काश्मीर येथील श्रीमंत महाराज यांणीं श्रीनगर येथील कोडताचे जडज बाबू निळेबर साहेब यांस त्यानीं उत्तम प्रकारें काम केल्यावरून एक सोन्याचे काकणाचा जोड वजन अजमासे ८० तोळ्यांचा बक्षिस दिला व याचप्रमाणें पवळपाचे राजानें आपला वकील जो पंजाबसरकाराकडे असतो त्यास एक हजार रुपयांचा पोषाख दिला.

बनारस येथें एक इसम आपले शेतास जात असतां त्याचा पाय एका सापावर पडला व साप त्यास डसला यावर तो मनुष्य शैपन्नास कदम गेला नाहीं इतक्यांत तो साप मेला. त्याचें कारण लोक असे सांगतात कीं हा मनुष्य कांहीं दिवसांपासून निंबाचा कंद घेत असे.

चमत्कारिक पक्षी—अगामी नावाचा पक्षी अमेरिकेंत होतो तो सापाचे मारण्यास फार उपयोगी आहे. कसेही तऱ्हेनें साप डसला तरी कांहीं अपाय त्यास होत नाहीं. आणि जेव्हां पक्षी सापास धरतो, तेच वेळेस त्यास गिळून टाकितो. व हा पक्षी मनुष्याशी स्नेह चांगला ठेवितो.

---

लंडन शहरची माहिती—इराणचे शहा लंडन शहरीं असतां त्यांस शहर माहिती कळविली ती ऐकून त्यास फारच चमत्कार वाटला लंडन शहरच्या एकंदर रस्त्यांची लांबी सुमारें १११२ मैल म्हणजे, सरळ रेघेनें लंडन शहरापासून इराणच्या मुख्य शहरापर्यंत व तेथून सीलोन बेटापर्यंत इतकी आहे. एकंदर वस्ती सुमारें ४०,१५,६९९ आहे. घरांची संख्या ५,२८,७९४ आहे. आमनीबसिस १४०० व भाड्याच्या बग्या ८,१०८ आहेत. आमनीबासिस व भाड्याच्या बग्यांचे मिळून घोडे २५००० आहेत. शहराच्या संरक्षणार्थ पोलिसचे लोक १०,७१२ आहेत. शहरांत दर साल सुमारें २,४०,००० बैल, १५,२५,००० बकरीं, १०,००० गायी, ८९०० डुकरें खपतात. शिवाय परगावांहून व परदेशाहून आलेल्या दरसाल सुमारें १,५४,०४५ टण मांसाचा खप होतो.

इराणच्या बादशहाच्या आंगावर घालण्याच्या जवाहिराची किंमत ९ कोटि रुपये आहे.

जबलपूर क्रानिकल पत्रास एकानें असें लिहिले आहे कीं अवरंगजेब बादशाहाच्या नळची गाड्या पाहण्यांत एक १०० मोहोरांच्या किमतीची एक मोहोर आली आहे. मोहोरेवर मुसलमानी शक १०८३ आहे. परिघ ४इंच व जाडी अर्धा इंच आहे.

सिविल प्रोसिजर कोड, नवा होण्याचें घाटत आहे हें कदाचित वाचकांस माहात असेल. निदान आणखी वर्ष दोन वर्षें हा कायदा होईल असें दिसत नाहीं तथापि त्यांत कसे काय फेरफार होणार आहेत हे समजण्यास वाचकांस उत्सुकता नसेल असें नाहीं. २०० रुपयांच्या आंतील रकमेवर दुसरें ( स्पेशल ) अपील नाहीं. याचप्रमाणें अवल कोडताचें व पहिल्या अपील कोडताचें मत एक पडलें म्हणजे दुसरें अपील करण्याचा हक्क नाहीं. अपील कोर्टाच्या ठरावावर अपील करण्याची परवानगी देण्याचा अधिकार त्याच कोडताकडे असावा. अशा प्रकारचे अपिलच्या बाबतींत फेरफार व्हावयाचे आहेत.

ग्वालेरीस जयाजीराव महाराज १० लक्ष रुपये खर्चून एक बाग व राजवाडा बांधणार आहेत.

इंडियनमिररवरून कळतें कीं नागपुरें इलाका मोडण्याविषयीं हिंदुस्थान सरकार विचार करीत असून हा इलाका मोडावा कीं नाहीं याविषयीं नागपुरच्या चीफ कमिशनरचें मत विचारलें होतें, चीफ कमिशनर यांनीं इलाका मोडू नये असें लिहून पाठविलें आहे.

बंगालीवरून कळतें कीं, बंगाली सिव्हिलियन बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांजकडून कांहीं रिटर्नें बरोबर गेलीं नाहींत म्हणून त्यांस बंगालच्या लेफटिनेंट गवर्नरानें सस्पेंड केलें!

बडोद्याच्या संस्थानचें उत्पन्न १,४२,००,००० रुपये होत असे तें, राज्याच्या अव्यवस्थे मुळें ८६,००,००० रुपये उत्पन्न झालें.

म्याट्रिक्युलेशनची परीक्षा येत्या नवेंबर महिन्याच्या १७व्या तारखेस होणार. अर्जे तारीख १७ सप्तेंबर पासून सुरू होणार.

बी. ए.ची परीक्षा तारीख २४ नवंबर पासून सुरू होणार.

एल. एल. बी. तारीख १७ नवेंबर रोजीं सुरू होणार

एल. सी. ई. ची पहिली परीक्षा तारीख २१नवेंबर रोजीं व दुसरी परीक्षा तारीख १डिसेंबर रोजीं सुरू होणार. ने ओ.

---

## सन १८७३ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

गावचे वंशपरंपरेचे अधिकारासंबंधी कायदा आहे तो सुधारण्याविषयींचे आक्टाचा मसुदा.

( मागिल अंकावरून पुढें चालू. )

( अ ) मुख्य हिसेदारांनीं किंवा त्यांपैकीं कांहीं हिसेदारांनीं हा आक्ट ठरल्याचे तारिखेपूर्वीं ३० वर्षांहून कमी नाहीं असे मुदतीपर्यंत पाळीचे अमुक अनुक्रमानें चाकरी केली असे [ किंवा पाळीचे सदर्हू प्रकारचे अनुक्रमाप्रमाणें चालण्यास ते आपण होऊन राजी झाले आहेत असें खात्रीनेशी शाबीद होईल ] तर पाळीची ती वहिवाट निरंतरची करावी. आणि ज्या मुख्य हिसेदारांचा चाकरी करण्याचा हक्क असेल त्यांचीं नावें व त्यांणीं पुढें कोणते अनुक्रमानें पाळीनें चाकरी करावयाची ते ठरवावें. पाळीची मुदत कोणतेही प्रसंगीं दहा वर्षांहून कमी असूं नये आणि सदर्हू प्रकारची मुदत सरल्यावर अनुक्रमानें जो दुसरा मुख्य हिसेदार असेल त्यानें लागलेच स्थानापन्न व्हावें. सदर्हू प्रकारचा कोणताही हिसेदार आपले चाकरीचे मुदतीचे आंत मरण पावला तर बाकी राहिले मुदतीपर्यंत चाकरी करण्याचा हक्क त्याचे वारसाचा आहे.

( ब. ) सदर्हूप्रमाणें पाळीनें चाकरी करण्याची वहिवाट होती, असें आढळलें नाहीं किंवा तसे वहिवाटीस राजी झाल्याचें आढळलें नाहीं, तर कुटुंबाचे ज्या मुख्यास किंवा मुख्य हिसेदारास एकट्यालाच चाकरी करण्याचा हक्क असेल तो शोधून काढावा आणि त्याप्रमाणें त्यास निरंतरचा कबूल करावें. एकाहून अधिक वहिवाटदार जरूर असतील, तेव्हां ज्या मनुष्यास एकट्यालाच चाकरी करण्याचा हक्क असेल त्यास पुरत इतके गुमास्ते नेमण्याचा हक्क आहे किंवा नाहीं किंवा त्याचे बरोबर चाकरी करण्याचा हक्क इतर कोणतेही मुख्य हिसेदारास द्यावा किंवा नाहीं हे कलेक्टरानें ठरवावें.

११. मुख्य हिसेदारास चाकरी करण्याचा हक्क असो अगर नसो तथापि त्या सर्वांच्या सह्या गावचे ठरावबंदावर किंवा गावचे ज्या इतर कागदांवर घेण्याची चाल असेल व त्या घेणें योग्य असेल त्या कागदांवर सह्या करण्याची त्याची इच्छा असेल तर त्यावर सह्या करण्याचा त्यास अधिकार आहे.

१२. चाकरी करण्याचा ज्या मनुष्याचा हक्क असेल तो चाकरी करण्यास लायक व राजी असेल तर त्यास कारण पडेल तेव्हां वहिवाट करण्याविषयीं किंवा लायक व योग्य मनुष्य गुमास्ता नेमून देण्याविषयीं आणि आणखी गुमास्ते जरूर असतील तेव्हां ते नेमून देण्याविषयीं हुकूम कलेक्टरानें करावा. सदर्हूप्रमाणें नेमून दिलेले गुमास्त्याकडे निदान पांच वर्षेंपर्यंत अधिकार चालला पाहिजे.

१३. रकम १. कोणतेही मनुष्याचा चाकरी करण्याचा हक्क असेल तो त्या अधिकाराचीं कामें चालविण्यास शरीरानें किंवा मनानें किंवा अज्ञानें नालायक आहे किंवा इतर धंद्यामुळें किंवा कामामुळें नालायक आहे असें वाटण्याची सबब कलेक्टरास असेल तर त्या मनुष्याकडून जातीनें चाकरी घेण्याची नाहीं म्हणण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे सदर्हूप्रमाणें नाहीं म्हटलेले कोणतेही मनुष्यावर अघोर अपराधाबद्दलची शाबिती झाली नसेल तर गुमास्ता नेमून देण्याचा त्यास अधिकार आहे, परंतु अघोर अपराधाची त्यावर शाबिती झाली असेल तर गुमास्ता नेमणें कलेक्टराकडे आहे.

रकम २. गुमास्ता म्हणून चाकरी करण्यासाठीं अमुक मनुष्य देतों असें म्हटलें असेल त्या मनुष्यास सदर्हूप्रमाणें नाकबूल करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे.

रकम ३. वंशपरंपरेचे कोणतेही अधिकाराची कामें स्त्रीनें जातीनें करूं नयेत. परंतु तीं करण्याचा हक्क तीस या आक्टावरून असेल तर तिला गुमास्ता नेमून देण्याचा अखत्यार आहे.

१४. बारावे कलमाअन्वयें कलेक्टरानें हुकूम केला असेल त्या हुकुमाचे तारखेपासून दोन महिन्याचे आंत त्या हुकुमाप्रमाणें न केलें तर कलेक्टरानेंच गुमास्ता किंवा गुमास्ते नेमावे. त्याकडे पांच वर्षेंपर्यंत अधिकार चालेल ती मुदत संपल्यावर पुनः हुकूम करावा. वतनाचा मुख्य किंवा इतर हिसेदार अधिकार चालविण्यास लायक व राजी असेल तर परके मनुष्यास गुमास्ता नेमूं नये.

१५. रकम १. कोणी वहिवाटदार काम चालविण्यास शरीरानें किंवा मनानें नालायक होईल त्यास अधिकारावरून दूर करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे अधिकाराची जागा सदर्हूप्रमाणें रिकामी होईल ती या आक्टाचे १२ वे व १३ वे व १४ वे कलमांत गुमास्त्याबाबद ठराव आहेत त्यास अनुसरून गुमास्ता नेमून भरावी.

रकम २. गुमास्त्याचे चाकरीबद्दल १२ वें व १४ वे कलमांत पांच वर्षांची मुदत सांगितली आहे त्या मुदतीस मालकाचे हक्काबरोबर गुमास्त्याचा हक्क संपतो ही शर्त लागू आहे.

१६. कुटुंबाचा मुख्य किंवा मुख्य हिसेदार मरण पावल्यावर याचा वडील मुलगा किंवा त्या मुलाचा अगदीं जवळचा वारस किंवा त्यास मुलगा नसेल तर त्याचा अगदीं भाऊबंद त्याचे नाव रजिस्टरांत दाखल करून त्यास स्थानापन्न कबूल करणें कलेक्टराचें काम आहे. सदर्हू प्रकारचें कबूल करणें हे दिवाणी कोर्टांतून मिळालेले अधिक जवळचे वारसाचे सर्टिफिकेटावरून फिरलें नसेल तर ते आखेरचें आहे असें समजावें.

१७. कुटुंबाचा मुख्य किंवा मुख्य हिसेदार म्हणून जो मनुष्य कलेक्टरानें कबूल केला असेल त्या मनुष्यास कलेक्टराचे परवानगीनें व सरकारानें नजराणा ठरविला असल्यास तो नजराणा दिल्यावर दत्तक घेण्याविषयीं सरकारी ज्या कानू अमलांत असतील त्या कानूंस अनुसरून दत्तक घेण्यास अखत्यार आहे.

१८. कोणतेही अल्पवयी मनुष्यास चाकरी करण्याचा हक्क प्राप्त होईल तेव्हां या आक्टाचे १२ वे व १३ वे व १४ वे कलमांत गुमास्त्याविषयीं ठराव आहेत त्या ठरावाअन्वयें गुमास्ता नेमावा. गुमास्ता नेमणें तो अल्पवयी मनुष्याचें पालन करणारास नेमून देण्यास सांगावा आणि सदर्हू प्रकारचा गुमास्ता १२ वे व १४वे व १५वे कलमांतील ठरावांस अनुसरून अल्पवयी मनुष्याचे अल्पवय संपे तोपर्यंत अधिकारावर राहील.

[ पुढें चालू. ]

---

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ३१ आगष्ट सन १८७३ इ० | अंक ३५

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वाशिमाहून

वि. वि. मेहेरबान डायरेक्टर साहेब बहादुराची स्वारी एथें तारीख १४ रोजी आली. व तेच दिवशीं गांवांतील सगळ्या सरकारी शाळा पाहिल्या. पैकी इंग्लिश मराठी आणि हिंदुस्थानी इंग्लिश शाळांची सरासरी परिक्षा घेतली. मुलांचा नंबर पाहून साहेब खूष झाले परंतु तितकें मुलांचा अभ्यास पाहून झाले नाहींत. इंग्लिश मराठी शाळेंतील शेवटल्या वर्गाची परिक्षा वगैरे कांहींएक न घेतां नुस्तें क्लास पूर्ण भरला आहे असें पाहिलें. मुलीच्या शाळेतील मुलींचा अभ्यास पाहून व मुलींनीं चांगले रितीनें कविता वगैरे म्हटल्या तें ऐकून साहेब फार खुष झाले. चवथी देवपेठेंतील शाळा उभाउभीच पाहिली. दुसरा दिवस, बहुतेक सगळा, साहेब बहादुरानीं शिकार करण्यांत घालविला. व तिसरे दिवशीं राहून चवथे दिवशीं परत अकोल्याकडेस चालते झाले. साहेब बहादुर डे० कमिशनर साहेबांचे घरीं राहिले होते.

एथें मंगळवार रोजीं सकाळचे सुमारें तीन वाजता एका झोपड्यास आग लागून त्या बरोबर चार झोंपडीं जळून खाक झालीं. नुकसान फारसें झालें नसोन प्राणहानीही बिलकूल झाली नाहीं. आसपास चांगली झाडें असल्या कारणानें आग फारशी पासरली गेली नाहीं आग विझविण्याचे कामांत योग्य अधिकाऱ्या कडून जशी तजवीज होणे तशी झाली नाहीं. उन्हाळयांत होणाऱ्या गोष्टी पावसाळयांत घडत आहेत. ही आग इतके अपरात्रीस आणि ती ही मंगळवारीं तेव्हां कोणें स्त्रीनें पुत्र होण्याचे इच्छेनें तर लाविली नसेलना?

एथील लायब्ररींत मागें नवे सेक्रेटरी नेमण्याचे वेळीं जी सभा झाली त्या बर आजपावेतों एकही झाली नाहीं किती ही आमचे लाय ब्ररीचे मेंबरांची सभा करण्याविषयीं उत्सुकता! पूर्वींपासून चालत आलेली बेबंदी वहिवाट अद्यापि बंद होत नाहीं. आमची वारंवार सभा होऊन त्यां पासून कांहीं ज्ञान प्राप्ती मिळावयाचे आशेची निराशा होते कीं काय? याच लायब्ररी गृहांत म्युनिसिपाल कमेटीच्या २१३ सभा होऊन गेल्या. आपले वस्तूचा दुसरे उपयोग करितात तरी तिचा आपण उपयोग न करणें हीं फार दुःखाची गोष्ट आहे. कळावें लोभ असावा हे विनंती.

ता० २१ माहे आगष्ट सन १८७३.

आपला मित्र

"लोकहितेच्छु"

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. आमचे एथील वर्तमानपत्रांत मागील दोन आठवड्यापासून लायब्ररींत सभा भरत असतें त्यासंबंधानें बराच मजकूर येत आहे हें आपणास माहित असेल. प्रमोदसिंधूची योग्यता किती हे तुह्मांस व तुमचे इतर बंधूंस कळलें असेलच. यांचे बरोबर भांडणें ह्मणजे त्याच्या इतकी आपली योग्यता करून घेणे आहे. याजकरितां च सभेच्या विरुद्ध कांहीं मजकूर लिहिला असतां सभासदांनीं तिकडे लक्ष्य दिलें नाहीं असें मला वाटतें. मागील एका सभेंत परतवाडा येथील लोकांस कोणकोणती उणीव आहे त्याविषयीं वादविवाद चालला असतां एका सभासदानें अशी सूचना केली कीं, येथील छापखाना जसा असावा तसा नाहीं तर तो सुधारण्याविषयीं कांहीं तजवीज करावी. ही सूचना बहुतेक लोकांस न आवडून त्याजवर वादविवाद झाला नाहीं. व एक सभासद उठून असे बोलले कीं, छापखाना बरा आहे व प्रमोदसिंधू आपले मगदुराप्रमाणें काम करितो. हीं अक्षरें आमचे एडिटरसाहेबांचे कानीं गेल्यावर त्यांस वाटलें कीं, आम्ही खरेंच लायक आहोत. मग ते फारच चढून मनमानेल तसे आपले पत्रांत डिबेटिंगक्लबसंबंधानें बोलले. सभासदांस वाचाळपंचवीसें ही त्यांणीं ह्मटलें. दुसरे रविवारीं सभेंत एडिटरराव आले होते त्याचे पत्राचे संबंधानें थोडा मजकूर एकदोन सभासद बोलले तो स्वतः कानांनीं ऐकिला असतां त्यांणीं निमूटपणें सोसून घेतला एक अक्षरही बोलले नाहींत. बोलतील काय? तरी पण त्यांचा कागद उगीच राहिला नाहीं त्यांत एक पत्रव्यवहाराखालीं पत्र आलेंच व एडिटोरियलमध्येंही कायद्याची माहिती आमच्या रावांनीं प्रगट केली. यंरे एडिटर!

माझा व लायब्ररीच्या सभेचा कांहीं संबंध नाहीं. पुष्कळ लोक जमतात त्यांत मीही एक जातो आणि एका कोपऱ्यांत बसतो. तव्यत लागेल तेव्हां उठून येतो. आमचे एडिटरराव यांचा व माझा स्नेह आहे. याजकरितां स्नेहधर्मास अनुसरून मी कान उघडण्याच्या गोष्टी सांगतो तिकडे त्यांणीं लक्ष्य द्यावें. आपले पत्राची योग्यता वाढविण्याची काळजी घ्यावी. कोणाची व्याजोक्तीनें स्तुति करूं नये. मागील पत्रांत रा. रा. पुरुषोत्तमराव भट व मेहेरबान मेकंजी साहेब यांचा स्तुतिपाठ वाचला असा वाचू नये. उभयता गृहस्थ फार पोक्त व विचारशील आहेत. अशा स्तुतीनें ते भुलणारे नाहींत व तुमचा फायदा करण्याकडे एवढ्या च कारणाने झटणार नाहींत. बरोबरीच्यानें बरोबरीच्याची स्तुती करावी. ह्मणजे ती शोभा देते. कमी दरजाच्या मनुष्यानें केली असतां हांजी हांजी होते व अशी हांजी हांजी आमच्या पुरुषोत्तमराव साहेबांस अगर मेकंजी साहेबांस कधीं आवडणार नाहीं. वऱ्हाडसमाचारकर्ते राव आतां पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों. शेवटीं आपणास हीच विनंती आहे कीं, प्रमोदसिंधू आपले धाकटे भाऊ आहे. त्याला आपणही उपदेशाच्या दोनी गोष्टी सांगाल व मजला पुन्हा या बाबद लिहिण्याचें कारण न पाडाल तर मी आपले आभार मानीन.

तीनच्यार दिवसापासून पर्जन्यानें बराच सपाटा लावला आहे तेणेंकरून शेतकरी वगैरे लोकांचीं मनें उल्हासयुक्त होत आहेत अशीच शेवटपर्यंत वृष्टी झाली असतां यंदा धान्याची वगैरे स्वस्ताई होईल. तारीख २६ माहे अगस्ट सन १८७३ इसवी. मुक्काम एलिचपूर.

एडिटराचा स्नेही

"क्ष"

जळगावाहुन—तारीख २० आगष्ट.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खालील चार ओळी आपलेकडे पाठविल्या आहेत ह्यांना जागा देण्याची मेहरबानी कराल अशी आशा करितों.

डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर यांनकडून येथील इंग्लिश मराठी शाळेंतील मुलांस वाटण्याकरितां वार्षिक परिक्षेचीं बुकें आलीं होतीं तीं वाटण्याचा समारंभ काल रोजीं येथील हेडमास्तर रा. वामन रघुनाथ यांणीं केला. समारंभास तहशिलदार, पेशकार वगैरे सरकारी कामदार व गावांतील शेटसावकार व इतर संभावित गृहस्थ मिळून सुमारें ५०।६० जमले होते. समारंभाचा थाट उत्तम प्रकारचा होता. सुमारें चार वाजतां सर्व मंडळी जमली. तेव्हां रा. वामन रघुनाथ यांणीं एक सुंदर निबंध वाचला. पत्रविस्ताराचे भयास्तव त्यांतील सारांशच एथें थोडक्यांत कळवितों:—.

प्रथम विद्या ह्मणजे काय, विद्या कशास म्हणावी, व तिजपासून कोण कोणते असंख्य फायदे होतात, हें थोडक्यांत व सुरसपणें निवेदन केलें. नंतर विद्या म्हणजे आलेला कागद वाचतां आला व साधारण हिशेब करितां आला ह्मणजे झालें हा जो वऱ्हाडांतील बहुतेक लोकांचा समज त्याजवर टीका थोडी केली व तुलनेनें फार सुधारलेला जो मुंबई इलाखा तोच उदाहरणार्थ घेऊन विद्यासंपादन करणे हे किती महत्वाचे आहे, हें दर्शविलें. व गावांतील मुख्य मुख्य संभावित गृहस्थांनीं वेळोवेळीं शाळेंत येऊन मुलें काय शिकतात हें पाहवें, व प्रसंगानुसार मुलांस पुस्तकें अगर मिठाई देऊन त्यांचे लक्ष्य विद्येकडे ओढेल असें केलें म्हणजे अर्थातच विद्याहीन इतर लोक आपले मुलांचे विद्येकडे अधिकाधिक लक्ष्य देतील, असे सुचविलें. असा निबंध वाचणे झाल्यावर तहशिलदार यांणीं आपल्या तर्फे लिहून आणलेला कांहीं मजकूर वाचविला त्याचा मतलबः—

एथील शाळामास्तरलोक माझे नेहेमीं पाहण्यांत आहेत. मास्तर लोक आपापलीं कामें मेहेनतीनें व लक्ष्य लावून करितात, हें पाहून आह्मांस मोठें समाधान वाटतें. व हेडमास्तर रा. वामनराव ह्यांनीं देउळघाटची शाळा चांगल्या प्रकारें सुधारून ते एथें बहडतिवर आले. व त्यांनां त्यांचे सुवर्तनानें एथेंही तसेंच यश मिळेल. विद्येपासून फायदे पुष्कळ आहेत ह्मणून लोकांनीं तिजकडे लक्ष्य द्यावें हे सांगणें आहे" हें झाल्यावर तहशिलदार यांनीं मुलांस पुस्तकें व पदरची मिठाई वाटली. नंतर पानसुपारी अत्तर गुलाब होऊन सभा विसर्जन झाली.

मि० मिर इनायत हुसेन तहशिलदार सुशिक्षित व सुस्वभावाचे गृहस्थ आहेत. हे येथील व तालुक्यांतील शाळांस अशा प्रकारें नेहमी उत्तजन देतात. त्यांचें सुधारणुकीकडे फार लक्ष्य आहे. हें पाहून समाधान वाटतें. असेंच लक्ष्या वारंवार दिल्यास शाळांची सुधारणा व लोकांचें कल्याण होईल.

एक विद्यावृद्धीच्छु.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. आपल्या भेटीला फार दिवस झाले. कदाचित आपण आमची ओळख देखील विसरला असाल. तर तिला संजीवन करण्याकरितां आपल्या पत्रामध्यें कांहीं मजकुराच्या चार ओळी सादर करितों. त्यास आपण आश्रय द्याल अशी आशा आहे.

मी यवतमाळ तालुक्यातील एका लहान गावांतील रहिवासी आहे. व ज्या गोष्टी हल्लीं पाहण्यांत आल्या आहेत व येत आहेत त्याजमध्ये कांहीं न्यून असलें ह्मणजे तें आपल्या कानावर घालावें तेणेंकरून सर्व गोष्टींचा खुलासा होतो अशी लोकवदंता आहे. सबब आपण खालीं लिहिलेल्या गोष्टीचा निकाल करालच.

आलीकडे वऱ्हाड पोष्ट खात्यांतील कांहीं पोष्टांचें काम वर्धा इन्स्पेक्टिंग पोष्टमास्तर यांजकडे दिलें. हल्लींच्या कालमानाप्रमाणें त्यांस कांहीं कम ज्यास्त करणें योग्यच आहे सबब त्यांनीं इतकी काटकसर केली कीं राळेगांव ब्रांच पोष्ट आणि दिग्रस या दोहींचे दरख मेसेंजर यांस सदोदितच्या रजा दिल्या. मग का

य पहावयाचें. आधीच उन्हाळा त्यात फाल्गुनमास या प्रमाणें झालें. सर्व काम तालुक्याचे हरळ मेसेंजर याजकडे आलें. आतां त्यांत एक सबब झाली कीं २५ पंचवीस कोस पर्यंत फिरावें लागतें सबब महिन्यातून एक फेरीवर आणून ठेविलें या व्यवस्थेमध्यें रयतेची मात्र पत्रें दीड अगर दोन महिन्यांनीं मिळतात असा सर्व तालुक्याभर बोभाट झाला आहे तर त्याचा बंदोबस्त व्हावा.

या तालुक्याला मि० आर्देसर दिनसाजी ह्मणून अफिशियेटिंग तहशिलदार नेमले आहेत. त्यांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा मागील वर्षी झाली. हल्लीं त्यांची काम करण्याची शैली फार चांगली आहे असें ह्मटलें तरी चालेल. जरी त्यास तहशिलीच्या कामाची माहिती तूर्त थोडी आहे तरी कांहीं दिवसांनीं दुसऱ्याच्या मदतीची जरूरी ठेवतील असें वाटत नाहीं. याजमध्यें सहनशीलता व लोकांचा मान मरातब ठेवण्याची खुबी चांगली आहे.

हा वणी जिल्हा सर्वांपेक्षां लहान असून यांत बऱ्याच घडामोडी होतात. इकडे जमीन ओसाड आहे व कितीएक गांवें इजाऱ्यानें (मक्त्यानें )दिलीं आहेत. इजारदार लोक हे कांहींअंशीं सरकारच समजले पाहिजे कारण कांहीं एखादी वस्त गांवच्या रयतेजवळ असेल तर ती त्यांस मिळण्यास एक पळही लागत नाहीं त्यांच्या रयतेच्या घरीं जें काय आहे त्याचे सर्वस्वी तेच मालक असें समजतात. सबब सरकारानीं या बाबदींत. कांहीं तरी नियम ठरवावे.

आगगाडी पासून हिंदु रयतेस बऱ्याच गैरसोयी आणि जुलूम सोसावे लागतात. मी स्वतः आगगाडींतून प्रवास थोडा दूर दक्षिणेकडेस करते वेळेस मध्यंतरीं मुक्काम वळ एथें रहाणें झालें त्या ठिकाणीं गोरा लोक टिकिटें जमाकरणार होता. मी त्याजला आपले आणि आपले मनुष्याचीं टिकिटें दिलीं व मी एक स्नेही स्टेशनच्या आंत जा ठिकाणीं उतारू एके ठिकाणीं जमतात तेथें त्याचें लगेज आणण्या करितां गेलों. तेव्हां टिकीट कलेक्टरानें आमच्या जवळ टिकिटें नाहींत असें पाहून आडवलें.मग दे माय धरणीठाव या ह्मणीप्रमाणें झालें. तितक्यांत स्टेशनमास्तर आले आणि हें प्रकर्ण सर्व त्यांस जाहिर केलें नंतर सुटका झाली. अशा प्रकारचा प्रसंग जर करितां एखाद्या स्त्रीवर आला असता तर काय झालें असतें नकळे.

पाऊस सुमारें १५ दिवसांत पडला नाहीं ह्मणून सर्व लोकांचें चित्त तिकडे लागलें आहे. जनावरांस पाणी जंगलांत मिळत नाहीं. पिकें चांगलीं आलीं आहेत, पाणी लौकर न आल्यास फार अनर्थ होईल.

रावसाहेब नजाना रामचंद्र हे हल्लीं या जिल्ह्यांत ऐ. ए. इ. आहेत ते वणीकडेस फिरण्यास गेले आहेत. यांणीं थोडक्याच वेळांत सर्व जिल्हा फिरून पाहिला. आतां पुढील सहामाही रिपोर्टामध्यें काय नवीन फेरफार करितात पहावें इंजिनीअर खात्यांतील लोकांचे डोळे उघडले नाहींत. वणीकोठे यथील शाळेची नवीन इमारत बांधली आहे तिला खर्च सुमारें १४०० रुपये लागला काम फारच उत्तम प्रकारचें केलें आहे तें असें कीं सुमारें ३ महिने झाले इतक्यांतच पडण्यास सुरू झालें. याचें नांव मजबुती आणि काम करण्याची शैली. पहा किती वर्षें पुणे एथील कात्रजच्या तलावास झालीं. पत्रविस्तारास्तव लेखणी बंद ठेवितों कळावें.

यवतमाळ जिल्ह्यांतील राहणारा
"क्ष"

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुध्द ८ शके १७९५

## स्वदेशोत्पन्न वस्तूंची आवड

हल्लीं जिकडे तिकडे वाटाघाट ही चालली आहे कीं आपले देशांत कापड विणण्याचीं यंत्रें कशीं येतील, कापड स्वस्त कसें होईल, विलायती कापड घेण्याची अवश्यकता कशानें बंद होईल, व स्वदेशीय कापडकऱ्यांत कशानें उत्तेजन येईल ही घटणा फार चांगली आहे व तिजकडे लोकांचें जितकें लक्ष्य लागेल तितकें आपले देशाचें हित आहे यांत कांहींमात्र संशय नाहीं. एका कापडाच्या कामांत जरी हा लोकांचा निश्चय सिध्दीस गेला व विलायतेहून कापड येण्याचें मुळीं बंद झालें तर हिंदुस्थानास कोटयावधि रुपयांचा फायदा होईल. काय चमत्कार आहे पहा! कापूस आपण आपल्या देशांत उत्पन्न करावा आणि विलायतेच्या लोकांनीं तो नेऊन त्याचीं वस्त्रें करून आणून आपणास विकावीं आणि आपण तीं निमुटपणें घ्यावीं व स्वदेशीय साळी, कोष्टी यास उपाशीं मारावें आणि, स्वस्थ बसावे, असा प्रकार तूर्त चालला आहे. कापडाचें हें एक उदाहरण सांगितलें पण बहुतेक व्यवहारिक गोष्टींत आपली स्थिति अशाच निकृष्ट झाली आहे. फार काय सांगावें. सुई व दोरासुध्दा थेट विलायतेहून येतो. घर बांधा, लोखंडी सामान सर्व विलायती. तें फर्निश करा, तर बिछाईत, भिंतींचे कागद, हंड्या, ग्लासें वगैरे सर्वांवे लायती. सकाळीं उठून चहा घ्या, तर प्याला व बशी विलायती, एवढेंच नाहीं, तर शिजवावयाचें भांडें देखील विलायती. उगीच एक लहानशी पेटी केली तर तिला कुलूप विलायती, एवढेंच नव्हे पण सुताराचीं हत्यारें सुध्दां विलायती. हजामतीला वस्तरा विलायती. याप्रमाणें सर्वत्र विलायती जिनसांची व्याप्ति झाली आहे व त्या जिनसा आपले इकडीलपेक्षां सुलभ व सुबक असल्यानें लोकांची स्वाभाविक रीस त्यांजवर बसत गेली तेव्हां अशा प्रसंगीं स्वदेशोत्पन्न वस्तूंचीच आवड धरिल्यास व ती चांगल्या प्रकारें अमलांत आल्यास देशाचा कल्याण होईल, नाहींपेक्षां विलायती लोक आमच्या. लोकांनां आवळा देऊन कोहळा घेऊन जाणार असें खास दिसतें. अस्तु.

मुंबईस कित्येक प्रतिष्ठित, विद्वान व द्रव्यवान लोकांनीं एकत्र जमून असा निश्चय केला आहे कीं, स्वदेशीं तयार होणाऱ्या कापडाचें दुकान मांडावें. त्यांत दुसऱ्या देशचें कापड मुळींच ठेवूं नये, व फार नफा न ठेवितां चांगले मनुष्य दुकानावर ठेवून सचोटीनें विक्री करावी. ही तजवीज फार चांगली आहे. व या दुकानांत भांडवलाचे भाग जे ठेविले आहेत तेही फार हलके ह्मणजे १० रुपयांचा एक असे ठेविले आहेत सबब बहुत लोक या दुकानाचे भागीदार होतील अशी आह्मी आशा करितों.

मुंबईस एकच दुकान होऊन पुरे नाहीं. बाहेर प्रांतींही अशीं दुकानें झालीं पाहिजेत. कारण सर्वांसच मुंबईहून कापड आणाविण्याची सोय असते असें नाहीं याजकरितां प्रांतांतूनही उद्योगी लोकांनीं अशीं दुकानें करावीं.

नुसत्या स्वदेशीय मालाची दुकानें हा ठरेल याजवरून आमचे मनांत असा अर्थ नाहीं कीं मुंबईस कापड विणण्याचीं जीं यंत्रें आहेत त्यांत तयार झालेलें कापड त्या दुकानांतून विकूं नये व तें लोकांनीं घेऊ नये. असा संकोच धरण्यांत कांहीं हशील नाहीं व तेणेंकरून नव्या उमेदीचा मोड होतो. तें कापड विलायती यंत्रावर निघालें ह्मणून विलायतेहून आलें असें नाहीं. आपले देशांत उत्पन्न झालें आहे सबब तें लोकांनीं अवश्य वापरावें व तें तलम सुती मिळत असतां सोसापुरी जाडेजोठ घेऊन नेसणें, खादीचे अंगरखे करणें, व तपकीरी पागोटीं घालणें हें युक्त नव्हे व तेणेंकरून दुराग्रह दृश्य होतो सबब तितक्या पुरतें धोरण ठेऊन आपले देशांत यंत्रांचा प्रसार विशेष होईल असें करावें.

स्वदेशीय कापड विक्रीचे दुकानांची वऱ्हाडासही गरज आहे. व तें वऱ्हाड प्रांतातील लोकांनीं मुंबईच्या तोडीवर काढावे अशी आमची इकडील पुढारी लोकांस शिफारस आहे.

## उत्तम विद्याभ्यासाविषयीं निराशा.

हिंदुस्थानांत इंग्लिश सरकारचें राज्य आहे हें पाहून सुख वाटतें. पण हें सरकार कित्येक प्रसंगीं काळ्या गोऱ्यांत भिन्नभाव दाखवितें हें पाहून दुःख वाटतें. नेटिवांनां मोठाल्या जागा देण्याचे कामीं सरकारची फार कृपणता आहे. व त्याबद्दल खरीं खोटीं कारणें काढून राजप्रतिनिधी प्रतिपादन करीत असतात. हें दुःखास्पद आहे. सरकार लाखो रुपये खर्चून विद्याशाळा घालितें हें चांगलें आहे. पण त्यांत तयार झालेल्या मनुष्यांस त्यांच्या श्रमाप्रमाणें सोयी देत नाहीं हें वाईट आहे. आमचे देशांत कलाकौशल्य नाहीं, यांत्रिक कामें नाहींत, मोठाले व्यापार आमच्या हातीं नाहींत, मग आह्मी शाळांत शिकून नोकऱ्या शिवाय दुसरें काय करावें, व त्या नोकऱ्यांचा तर दिवसानुदिवस दर उतरत चालला आहे. थोड्या वर्षांमागें साधारण प्रतीचे इंग्लिश शिकलेल्यास १०० रुपयांखालीं महिना मिळत नसे पण आतां शंभरावर, बी. ए. मिळूं लागले आहेत. बी. ए. च्या परिक्षा पास झालेल्या लोकांस मामलेदारीच्या जागा देत जाव्या असा मागें ठराव झाला होता व त्याप्रमाणें ५।४ जणांस जागाही मिळाल्या; पण आतां सरकार ह्मणते कीं, बी. ए. वाल्यांस एकदम मामलतीच्या जागा न देतां ४० व ५० रुपये पगाराच्या कारकुनीच्या मात्र जागा द्याव्या. दहा वर्षें रात्रंदिवस हाडाचें पाणी करून उत्तम विद्याभ्यास करणारास ४० रुपयांची कारकुनीची जागा, व १० वर्षें खरडेघाशी करून व र ट फ शिकून कामांत वहिवाटलेल्या मनुष्यास मामलतीच्या जागा देणें ह्मणजे उत्तम विद्वानांची केवळ निराशा करणें आहे. व असें करणें सरकारास योग्य नाहीं. येणेंकरून मोठाले विद्याभ्यास करण्याचे कामीं लोकांस उल्हास राहणार नाहीं. विद्वानाची योग्यता इंग्रज सरकार जाणत असून असें करतें हें मनांत आणिलें असतां मोठें आश्चर्यास कारण होतें पण सरकारचे बहुत प्रकार असे आहेत तेव्हां त्यांत आश्चर्य मानून कांहीं फळ नाहीं. लोकांनीं आपआपली सोय पहावी. व सरकारावर अवलंबून राहणें जितकें कमी होईल तितकें करावें व स्वतंत्रपणाचे व्यापार धंदे व इतर उद्योग करावे यांतच हीत आहे.

नवीन कायद्याप्रमाणें रस्त्यावर दस्तुरा बसवावयाच्या त्या.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| प्रत्येक चार चाकाच्या गाडीस | २—०—० |
| ,, दोन ,, ........ | १—०—० |
| प्रत्येक एक्यास .... .... .... | ०—४—० |
| ,, कमानीच्या भाड्याच्या गाडीस .... .... .... | ०—२—० |
| ,, कमानीवांचून गाडा व गाडी भरलेली व ८ जनावरांनीं ओढलेली........ | १—८—० |
| ,, सदर रिकामी.... .... | ०—८—० |
| ,, कमानीवांचून गाडा व गाडी भरलेली व सहा जनावरांनीं ओढलेली .... | ०—१२—० |
| " सदर रिकामी | ०—१—० |
| " गाडा गाडी भरलेली व चार जनावरांनीं ओढलेली | ०—८—० |
| " सदर रिकामी | ०—४—० |
| " गाडा व गाडी दोन जनावरांनीं ओढलेली व भरलेली | ०—४—० |
| " सदर रिकामी | ०—२—० |
| " रेडा अगर बैल लादलेला | ०—१—० |
| " " मोकळा | ०—०—६ |
| " हत्तीस | १—८—० |
| " उंट लादलेला | ०—८—० |

| | |
|---|---|
| " रिकामा | ०—४—० |
| " घोडा लादलेला अगर बसलेला | ०—१—० |
| " मोकळा | ०—०—९ |
| प्रत्येक तटू अगर खेचर लादलेलें अगर बसलेलें | ०—०—९ |
| ,, ,, मोकळें | ०—०—६ |
| ,, गाढव लादलेलें अथवा बसलेलें | ०—०—६ |
| ,, ,, मोकळें | ०—०—३ |
| ,, मेंढरू, शेळी, अथवा डुकर | ०—०—१ |
| ,, मेणा, डोली, पाळणा अगर ताजाण ८ हमालांचें | १—०—० |
| ,, मेणा, डोली, पाळणा अगर ताजाण ६ हमालांचें | ०—१२—० |
| ,, मेणा, डोली, पाळणा अगर ताजाण ४ हमालांचें | ०—८—० |
| ,, मेणा, डोली, पाळणा अगर ताजाण २ हमालांचें | ०—४—० |
| ,, पायीं जाणारा मनुष्य | ०—०—३ |

## वऱ्हाड

मि० क्याडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांनीं एक महिन्याची रजा घेतली आहे. ते पुणें मुंबईकडे जाणार.

—०००—

रा. अमृतराव आबाजी वकील यांस तुमची सनद रेसिडेंट साहेबांनीं रद्द केली ह्मणून डिपुटी कमिशनर साहेबांनीं तोंडीं सांगितलें. लेखी हुकूम दिला नाहीं व त्यांनीं आलेल्या पत्राची नक्कल मागितली असतां तीही दिली नाहीं. तसें करण्याची आपणास परवानगी नाहीं असें डिपुटि कमिशनर साहेब ह्मणाल्याचें ऐकतों. लेख देण्याच्या परवानगीस हरकत करण्याचा हेतू काय तो कळत नाहीं.

—०००—

उमरावतीचे वकील रा. रामचंद्र भगवंत यांची सनद कांहींकाळ सस्पेंड करण्याची वाटाघाट चालू आहे असें ऐकतों.

—०००—

अकोल्याचे मंडलक्षात स्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. नाराण बल्लाळ यांजवर देण्याघेण्याचे बाबदींत दिवाणी कोर्टाचा एक फैसल झाला त्याचे अमलबजावणीचे संबंधांत डायरेक्टर साहेब यांनीं त्यास सस्पेंड केलें आहे.

—०००—

शुक्रवारीं रात्रीं व शनिवारीं सकाळीं मिळून २॥ इंच पाऊस पडला व नदीला बराच पूर आला या सालांत हा पहिलाच पूर.

—०००—

गेल्या गुरुवारीं रात्रीं येथें युरोपीयन लोकांचें नाटक झालें

—०००—

या आठवड्यांत मेघराजानें मोठा आनंद करून सोडला. सोमवारीं थोडा पाऊस पडला. व शुक्रवारीं रात्रीं सुरू झाला तो शनवारीं सकाळीं दहा वाजेपर्यंत भिज पाऊस फार उत्तम पडला. येणें करून लोकांची मुलें प्रफुल्लित झालीं आहेत.

—०००—

मेहेरबान रतनजी जामासजी साहेब जे मागें इकडे असिस्टंट कमिशनर होते व हल्ली निजामसरकाराकडे सदर तालुकदार आहेत ते आपले वडील बंधू मि० दस्तुर बहिरामजी साहेब यांचे भेटीस गेल्या आठवड्यांत आले होते. व एक दिवस उमरावतीसही येथील मंडळीच्या भेटीस गेले होते. ते येथें असतां खामगावचेही कित्येक सभ्य गृहस्थ त्यांस भेटावयास आले होते. यांनीं एक महिन्याची रजा घेतलेली आहे. वऱ्हाडांत जसे कमिशनर तसे मोगलाईंत सदर तालुकदार आहेत. रतनजी साहेबांकडे चार जिल्ह्यांचें काम आहे. व एवढा मोठा अधिकार त्यांस मिळालेला आहे तरी त्यांची पहिली सद्वृत्ती ढळली नाहीं हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

—०००—

इलिचपुर गेले आठवड्यांत हवेचें मान कांहीं विलक्षण झालें होतें; परंतु गरीबगुरीब कोकांची दया मेघराजास येऊन त्यांणीं ता० २२ पासून आपलें ठाणें एलिचपुर जिल्ह्यांत दिलें आहे, तेणेंकरून शेतकरी लोकांची मुलें प्रफुल्लित झालीं आहेत. असेच काहीं दिवस वास्तव्य होईल तर बरें होईल. दोन दिवस थोडी पर्जन्यवृष्टी झाल्यानें धान्यादि सर्व जिनसांत व्यापाराच्या संबंधानें मंदी झाली आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

—०००—

फारेष्ट खात्यांतील रंगास्वामी हेडक्लर्क याजवर आलेले आरोपाचा निकाल बाबींत नाहीं सबब मोकदमा डिस्मीस झाला. व त्याच कचेरीतील कारकून विनायकराव यांजला कांहीं संशयावरून मे० कान्सरवेटर साहेब यांनीं बडतर्फ केलें. त्यावरून त्या खात्यांतील नोकर लोक यांणीं याकडे लक्ष दिलें पाहिजे. असें आह्मीं त्यास सुचवितो. प. सी

## नोटिस

नोटिस— वेलमी सकवार मर्द जैराम ठाकूर वस्ती मौजे जळगाव नाल्याचें तालुके अकोट जिल्हे अकोले इजला नोटिस देणार जैराम बलद जानजी ठाकूर मौजे मांडके प्रगणे पिंपळगाव राजा तालुके मलकापूर याजकडून देण्यांत येते कीं तू मजवर खुदाबंद ताजूदीन हुसेन साहेब बहादूर यांकडेस सन १८७२ सालांत भलवस्त्र मिळण्याबाबद फिर्याद करून ठराव च्यार रुपये महावारचा केला त्यास मी पूर्वीं तुजला सांगितलें कीं, मजकडून च्यार रुपये महावार मिळत नाहीं तूं फारखत घे. तर तूं ऐकत नाहींस आणि तूं दरखास्त देऊन नऊ महिन्याचे रुपये ३६ मागणार आहेस तर हे रुपये मी तुजला देत नाहीं व तुजला मी मजकडून मोकळीक या नोटिसीवरून दिली आहे तुजवर मी हक्क दावा बिलकूल करीत नाहीं व मीही दुसरी तजवीज माझी पाहिल्यावरून तुझी आपले बरें पाहावे मजकडून ठरावाप्रमाणें रुपये देववत नाहींत हें खूप समजावे कळावे तारिख ३० माहे आगस्ट सन १८७३ इसवी.

( सही. ) जैराम बलद जानजी ठाकूर मौजे मांडके निशाणी खुद दस्तुर विश्वंभर महादेव-

## वर्तमानसार

अहमदनगरच्या हायस्कुलांतील मास्तर रा. रा. गोविंद रामचंद्र भागवत एम. ए. हे उदराचे व्यथेनें पुण्यास आजारी होते त्यांस देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे. गोविंदराव हे अगदीं तरुण, उत्तम विद्वान, व स्वभावानें मोठे सुशील होते. त्यांचें हे अकालिक मरण देशाला मोठें हानिकारक झालें. हे चंद्रपुरास मास्तर होते व अकोल्यासही दोनतीन वेळां आले होते त्यावरून इकडील मंडळीत ठाऊक असतील. नगर हायस्कुलांतील मास्तर जनार्दनपंत नापत हे एम. ए. असून थोडे दिवसांमागें उदराच्याच व्यथेनें मरण पावले आहेत व यांचीही तीच अवस्था झाली.

रा. रा. वामनराव बल्लळ शिन्दे सबाडिनेट जज्ज यांस सहा महिन्याची खासगी कामाकरितां रजा मिळाली.

मि० माणकजी कावसजी एं टी. आणि मि० शंकर पांडुरंग पंडित यांस सुरतेस शहर पैमाषीकडे व त्यासंबंधीं चौकशीकडे डिपुटी कलेक्टर नेमिलें.

चिंचवडास गणपतीचें प्रसिद्ध स्थान आहे तेथील मूर्तीवर कोणी पाषाण मारून पायाचा खपला उडविला अशी ऐकीव बातमी इंदुप्रकाशांत लिहिली आहे. ही खरी असेल तर सालमनकुरीं मोठाल्या देवांच्या मूर्तीवर संक्रांत आली आहे असें दिसतें. दोनवर्षांमागें मोठाले युरोपियन लोक मारण्यावर संक्रांत आली होती तेव्हां तीन युरोपियन मोहरे दुष्टांचे बळी झाले. काय ही दुष्टांचीं कर्में!!

नाशिक जिल्ह्यांत विगतपुरी तालुक्यांत तळेगावीं नागपंचमीचे दिवशीं एक सर्प आपल्या सात पिलांसहित एका बाईच्या उरावर येऊन बसला व तो तेव्हांपासून त्याच ठिकाणीं आहे. लोक त्यांनी हात लावितात तरी ते सर्व कुटुंब कांहीं करीत नाहीं व तेथून हालत नाहीं. यामुळें तेथें बरीच यात्रा जमूं लागली आहे असेंही नाशिकवृत्त पत्रांत लिहिलें आहे. हे कितपत खरें असेल तें असो.

हिंदुस्थानांतील रेलवे कंपन्यांचें चालू सालांतील जुलाई महिन्याच्या एका आठवड्यांतील उत्पन्न.

| | रुपये |
|---|---|
| १ ईस्टइंडियन | ४०६४९७ |
| २ जबलपूर | १९२९१ |
| ३ इस्टर्न बेंगॉल | ४१९१२ |
| ४ अयोध्या व रोहिलखंड | १२२३६ |
| ५ सिंध, पंजाब व दिल्ली | ८२००० |
| ६ मद्रास | ११३०३१ |
| ७ ग्रेट सदर्नइंडिया | १६००६ |
| ८ कर्नाटक | ६६४ |
| ९ ग्रेट इंडियन पेनिन सुला | १९७९८३ |
| १० बडोदा रेलवे. | ५४७०१ |
| स्टेट रेलवे. | |
| ११ कलकत्ता व साउथ इस्टर्न | १२८६ |
| १२ नलहटी. | ११५१ |
| १३ राजपुताना | २६६९ |

इंदुरास १७ वे तारखेस नवीन पध्दतीचें हायकोर्ट स्थापन झालें.

एल्फिनस्टन हायस्कुलांतील टीचर मि० रावजी वासुदेव टिळु यांस इंदुरास शाळाखात्याचे सुपरिंटेंडेंट नेमले करते लिहे पुढच्या महिन्याच्या १ ल्या तारखेच्या सुमारास जाणार.

बिलायतेस पाठवावयाचे साक्षीदार हिंदुस्थान सरकारानें पसंत केले आहे त्याची नांवें येणेंप्रमाणें:—

बंगाल.

१ बाबू प्रतिक चंदर मुकरजी, पटनाचे मुनसफ.
२ बाबू काली प्रसन्नो बानरजी, ओरिसाचे जमीनदार.
३ आनरबल मौलवी अबदुल लतीफ डेपुटी माजिस्ट्रेट.
४ रेवरेंड जगदीश्वर भट्टाचार्य नेटिव मिशनरी हुगळी.
५ सयद हमदाद अली सबार्डिनेट जडज बिहार.

पंजाब.

६ बाबू नोबिन चंद्रराय अकौंटंट इरिगेशन डिपार्टमेंट.
७ महमद हयातखान सी. एस आय. एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर.

मुंबई.

८ मि० शांताराम नारायण.
९ " हरिदास, वेरीदास
१० " अप्पाजी रामचंद्र दफ्तरदार.
११ " शंकर पांडुरंग पंडित.

गुजराथेंत नारळी पौर्णिमेपासून तीन दिवस अहोरात्र पाऊस पडला. या पावसामुळे गुजराथेंची प्रथम धान्यें येतील असें दिसतें.

फौजदारी खटल्यांत साक्षदारास भत्ता देण्याचें दुरुस्त केलेले नियम गेल्या गुरुवारच्या मुं. च्या सरकारी ग्याझिटांत छापले आहेत. त्यांत असें आहे कीं युरोपिअन व ईस्ट इंडियन साक्षीदारांस जिल्ह्यांतील कोर्टांत येण्याबद्दल भाड्याचा जो खर्च येईल तो व खाण्याचा खर्च त्यांनीं मागितल्यास दर दिवसास अडीच रुपये द्यावे. भाड्याचा खर्च दर मैलास ६ आण्यापेक्षां जास्त असूनये. या जातीच्या पहिल्या प्रतीच्या साक्षीदारांस हायकोर्टांत साक्ष देण्याकरितां यावें लागेल तर दर मैलास ८ आणे भाडेखर्च व मुंबईंत आहेत तोंपर्यंत दर दिवस ५ रुपये व मेण्याच्या खर्चाबद्दल दर दिवस २ रुपये द्यावे. युरोपियन व ईस्टइंडियन जातीच्या दुसऱ्या प्रतीच्या साक्षीदारांस, त्यांस जो भाडेखर्च पडेल तो व मुंबईंत असतां दर दिवस ३ रुपये व मेण्याच्या खर्चाबद्दल दर दिवस १ रुपया द्यावा. पाटील, पांढरपेशे, व्यापारी, वकील व याजप्रतीचे दुसरे नेटिव लोक यांस भोजनखर्चाबद्दल दर दिवसास ६ आणे व रेलवेबद्दल व जो योग्य खर्च पडला असेल तो द्यावा. शेतकरी वगैरे दुसऱ्या प्रतीच्या नेटिवांस दररोज ४ आणे भाडें व आगगाडी वगैरेचा योग्य खर्च झाला असेल तो द्यावा. हे नियम किती अन्यायी व पक्षपाती आहेत हे लिहिणें नको. या नियमाप्रमाणें एखाद्या हलकट गोऱ्यास दरदिवस अडीच रुपये भत्ते मिळणार व नेटिव अंकताहा मोठा असलातरी त्यांस ६ आणेच!

नि. भो.

नाशिक—श्रावण महिना संपून भाद्रपद हीं लागला परंतु अद्याप पर्जन्य नाहीं. यामुळे लोकांची दिलगिरी फारच वाढली आहे व अधिकाधिक वाढत आहे कशी अवस्था होईल ती होवो. आज मात्र पर्जन्यानें थोडी सुरुवात केली आहे.

ना. वृ.

मुंबई—गेल्या आठवड्यांतही कित्येक दिवस पाऊस नव्हता, परंतु शुक्रवारपासून पडूं लागला. गेल्या रविवारीं दिवसां व सर्व रात चांगला पडला. म्हणजे २४ तासांत ८ इंच ८ दोकडे इतका पडला.

होळकरसरकारचे वकील अजम फतेमहंमद यांची इंग्लंडास जाऊन फिनान्स कमिटीपुढें हिंदुस्थानसरकारच्या जमाखर्चाविषयीं साक्ष द्यावी अशी इच्छा आहे.

कच्छचे राव यांणीं मांडवी येथील म्युनिसिपाल मंडळीस असा अधिकार दिला आहे कीं, जे कोणी तिचे कायदे मोडतील त्यांस धरून तिनें शिक्षा द्यावी.

कलकत्याच्या हाय कोर्टाचे जडज मि० जस्टिस मेकफर्सन यांणीं असा ठराव केला आहे, कीं कोणत्याही मोकदम्यांत जे दस्तैवज दाखल करवयाचे असतील ते फिर्यादीचे बरोबर देत जावे; मागाहून आणल्यास ते घेतले जाणार नाहींत.

अलीकडेस लष्करीखात्याच्या संबंधानें एक जनरल आर्डर छापून प्रसिद्ध झाली तींत सरकारचा असा ठराव लिहिला आहे कीं, प्रत्येक काळ्या पायदळ पलटणींत ७२० लोक असावेत ते असे— ८ युरोपियन आफिसर ( अंमलदार), १६ नेटिव अंमलदार, ४० हवलदार, ४० नाईक, १६ ड्रमर म्हणजे पडधमवाले आणि ६०० शिपाई.

ज्ञा. द.

रत्नागिरी—मागील आठवड्या प्रमाणेच या आठवड्यांत बुधवार पर्यंत पर्जन्य न व्हता म्हणून लोक फार हवालदील झाले होते; परंतु गुरुवारी [illegible] ठिकाणी झाले व काल [illegible] जरा भराच पर्जन्य पडला जला रात्रीं पासून हीवेळ पर्यंत पुष्कळ पडत आहे.

स. शो.

अहमदनगर—पर्जन्याची वाट पाहून लोक फार दीन झाले होते पण त्यांची मेघराजास करुणा येऊन त्यानें शेतकरी लोकाचा पोळ्याचा सण साजरा केला. ता० २२ रोजीं अस्तमाना पासून ता० २३ दोन प्रहर पर्यंत व काल रोजीं बरीच वृष्टी केली व आणखी पडण्याचीं चिन्हे दिसतात.

न्या. सिं.

जतसंस्थाना साठीं दोनशें रुपये दरमाहाचा कारभारी नेमणार आहेत. व तो सातारचे कलेक्टराचे हाताखाली वागला पाहिजे.

रा० रा० नारायण जगन्नाथ भिडे गव्हर्मेंट वकील यांणीं भर कोर्टांत त्यांची साक्ष चालली असतां अब्रूस धक्का लाविणारा मजकूर सांगितला; त्या बद्दल हाय कोर्टा मध्यें चौकशी होऊन मशार निल्हेस दोन वर्षे सस्पेंड केलें.

रेलवेकडेस जे पोलिस लोक नोकरीस आहेत व ज्यांचा पगार कांहीं रेलवेकडून व कांहीं सरकारांतून व कित्येकांचा सर्वच रेलवेकडून असतो त्या सर्वांची पेनशनाचे संबंधानें सरकारीच नोकरी समजावी असा ठराव केला आहे.

ज्ञा. च.

कन्दाहारास ज्या नावाड्यांच्या गैरवर्तणुकेमुळें पासष्ट मनुष्यें मेलीं त्यांस चार महिन्यांच्या सक्त मजुरीच्या ठेपा झाल्या असें कळतें.

सर जार्ज क्यांबेल रजेवर गेल्यावर त्यांचें बंगालचें लें. गवर्नरचें काम सर रिचर्ड टेंपल चालवितील असें हिं. पे. कर्ते म्हणतात.

सुएझच्या कालव्याचें उत्पन्न गेल्या जून महिन्यांत १,७७,२०० रु० झालें. गतवर्षाच्या जूनमध्यें ३,०७,११० रु. झालें होतें.

निजाम सरकारच्या रेलवेच्या रस्त्यावरचे तारायंत्राचें काम ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेलवेकंपनीकडे त्या सरकारानें सांगितलें.

कानपुरचा जेलदरोगा ( तुरुंगाचा अधिकारी ) व त्याच्या हाताखालचे लोक यांजवर कैदीचा खून केल्याचा आरोप येऊन चौकशी होऊन खटला सेशनकमिटकडे झाला.

दस्तुऱ्यांच्या कायद्याबद्दल बांबे ग्याझेटचा एक पत्र पाठविणारा लिहितो कीं, आडम स्मिथ या प्रसिद्ध गृहस्थाचें म्हणणें कीं, या देशांत रस्ते करणें व ते दुरुस्त राखणे हें सरकारचें काम आहे. आतां दस्तुऱ्या घेणेंच तर फक्त बादशाही फंडानें बांधलेल्या रस्त्यांवर घेऊं द्या. नाहीं तर लोकल फंडांतील पैशाच्या रस्त्यांवर घेणें म्हटलें म्हणजे मोठा चमत्कारच होतो. कारण यांत लोकांस आपले रस्ते बांधण्यास कर द्यावा लागणार, ते दुरुस्त राखण्यास कर द्यावा लागणार व त्याचा उपयोग करण्यास कर द्यावा लागणार!!!

दिल्ली ग्याझेटचा बनारसचा बातमीदार म्हणतो कीं, आम्ही मथुरे [illegible] सिंधुरच्या यात्रे हून परत येतांना [illegible] तहून कानपूर वाटेने एका झाडाखाली फराळास उतरलों. कांहीं वेळानें एका झुडपांतून एक सर्प निघाला आणि तो हिरव्याचार गवतावरून गेला; परंतु ज्यावरून तो गेला तें गवत धूर निघून जळालें. हें त्यानें व बरोबरच्या दोघा सेवकांनीं प्रत्यक्ष पाहिलें. हें खरें असेल तर चमत्कारच!

लंडनमध्यें नवीन मंडळी—हिंदुस्थानांतून विलायतेस गेलेल्या एतद्देशीय लोकांनीं लंडनांत “ इंडियन सोसाइटी ” म्हणून एक नवीन मंडळी स्थापली. तिच्या व्यवस्थापकमंडळींत मद्रासचे सी. मीनाक्ष अध्यक्ष, बंगालचे बी. डे. उपाध्यक्ष, एम. सी. मल्लिक चिटणीस, आर. पी. घोस असि. चिटणीस हे सर्व गृहस्थ सभासद असून शिवाय सिलोनचे जी. सी. काशी चेट्टी. मुंबईचे महमद एच. हाकिम व बंगालचे पी. के. राय असे दुसरे सभासद आहेत. विलायतेंत राहत असलेल्या हिंदुस्थानच्या लोकांमध्यें परस्पर विशेष ऐक्य व संबंध राहून परस्परांचे स्वदेशासंबंधी विचार कल्पना वगैरे परस्परांस कळाव्या असा या मंडळीचा स्तुत्य उद्देश आहे असें क. ए. वरून कळतें.

इं. प्र.

सोलापूर— या आठवड्यांत पर्जन्य नसून उष्णता फारच होत आहे. कालपासून अभ्रे येऊं लागलीं आहेत. या वरून एक दोन दिवसांत पाऊस पडेल असें वाटतें.

क. त.

# सन १८७३ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

गावचे वंशपरंपरेचे अधिकारासंबंधी कायदा आहे तो सुधारण्याविषयींचे आक्टाचा मसुदा.

( मागील अंकावरून पुढें चालू )

१९. वहिवाटदारास गैरचालीबद्दल किंवा कामाचे हयगयीबद्दल पराकाष्ठा सहा महिनेपर्यंतचे कोणतेही मुदतीपर्यंत अधिकारावरून महकुबीची किंवा पराकाष्ठा ५ रुपये पर्यंत किंवा वहिवाटीचे तीन महिन्याच्या वेतनाहून अधिक नाहीं इतके दंडाची शिक्षा करण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे. आणि असे बाबतींत कलेक्टराचा हुकूम अखेरचा समजावा. महकुबीचे मुदतींत कलेक्टरानें आपणास योग्य वाटेल त्या मनुष्यास गुमास्ता नेमावें.

२०. रकम १. वहिवाटदारांत बाळबोलशनचा गुन्हा (लांच घेण्याचा किंवा जुलमानें घेण्याचा गुन्हा) किंवा कपट किंवा मोठी गैरचाल केली असतां त्यास रेविन्यू कमिशनराचे मंजुरीनें त्याचे अधिकारावरून बर्तर्फ करण्याचा व या आक्टाचे १४ वे कलमांतील ठराव लागू असतील त्या ठरावाअन्वये खालीं लिहिलेले मुदतीपर्यंत तें काम चालविण्यासाठीं गुमास्ता नेमण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे. म्हणजे सदर्हूप्रमाणें झालें नसतें तर सदर्हू प्रकारचा वहिवाटदार जितके मुदतीपर्यंत तीं कामें चालविता तितके मुदतीपर्यंत तीं कामें चालविण्यासाठीं गुमास्ता नेमण्याचा अखत्यार कलेक्टरास आहे. परंतु असें ठरविलें आहे कीं, पाळीचे वतनांत व रेविन्यू कमिशनराचे मंजुरीनें बिनपाळीचे वतनांतही वतनांतील मुख्यांचे किंवा [illegible] मनुष्यास इतर हिस्सेदाराच [illegible] परके [illegible] गुमास्ता नेमणें कलेक्टरास योग्य वाटेल तर त्याप्रमाणें नेमण्याचा त्यांस अखत्यार आहे. आणखी असें ठरविलें आहे कीं, या किंवा मागले कलमांतील कोणताही ठराव पोलिस अंमलदारांस ते पोलिस अंमलदार या नात्यानें लागू नाहीं. त्याचे गैरचालीविषयीं काय करावें याबाबद सन १८६७ चे मुंबईचे ८ वे आक्टांत ठराव केला आहे.

रकम २. या कलमाअन्वयें बर्तर्फ केलेला कोणी मनुष्य पुनः कामावर नेमण्यास लायक नाहीं आणि पाळीचे वतनांतील तो मुख्य हिस्सेदार असेल तर त्याची पाळी आली असतां त्याचें काम या आक्टाअन्वयें नेमलेले गुमास्त्यानें करावें.

२१. सदरील शेवटले दोहों कलमांअन्वयें फैसले करणें ते लेखी चौकशी करून करावे आणि सदर्हू प्रकारची चौकशी करण्यासाठीं पक्षकारांस व साक्षीदारांस जबरीनें हजर करण्याविषयीं व कागदपत्र जबरीनें हजर करण्याविषयीं व जुबानी घेण्याविषयीं माजिस्त्रेटाप्रमाणेंच कलेक्टरास अखत्यार आहे.

२२. कोणतेही वहिवाटदारावर आपले अधिकाराचीं कामें करण्यांत किंवा आपले अधिकाराचे कामासंबंधीं कोणतेही अपराधाचें कृत्य किंवा कोणताही अघोर अपराध केल्याची शाबिती कोणतेही फौजदारी कोर्टांत होईल तेव्हां तें वतन सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं सरकार दाखल करण्याविषयीं फर्माविण्याचा अखत्यार सरकारास आहे.

२३. या आक्टाअन्वयें नेमलेले गुमास्त्याचे मालकास ज्या कानू व शिक्षा लागू आहेत त्याच कानू व शिक्षा सर्व गुमास्त्यांस लागू आहेत. आणि वहिवाटदाराचे गुन्ह्याची शाबिती झाली असतां वतन जसें सरकार दाखल होण्यास पात्र होतें तसें तें वहिवाटदारानें नेमले गुमास्त्यावर कोणतेही फौजदारी कोर्टांत गुन्ह्याची शाबिती झाली असतां सरकार दाखल होण्यास पात्र होईल.

२४. या आक्टाचे ९ वे व १० वें व ११ वे व १७ वे व १९ वे व २० वे कलमांतील ठराव पाटील व कुलकर्णी यांहून कमी पायरीचे गावचे वंशपरंपरेचे अधिकाऱ्यांस लागू नाहींत आणि खालचे पायरीचे वंशपरंपरेचे अधिकाऱ्यांविषयीं खालीं लिहिलेले गोष्टींबाबद रेवेन्यु व पोलिस कमिशनराचें किंवा सरकारचे एकंदर हुकुमास अनुसरून कलेक्टरास संपूर्ण अखत्यार आहे.

( अ. ) हिस्सेदार असाम्यांचे नावानीं किंवा वतनदाराचे सगळे मंडळीचे नावानें वतन दाखल करावें हें ठरविण्याबाबद,

( ब. ) हिस्सेदार असाम्यांचीं नावें दाखलें करण्याचें सदर्हुप्रमाणें ठरलें असेल तेव्हां हिस्सेदारांचे हक्क व कामें व जबाबदारी कोणते प्रकारची व किती हें ठरविण्याबाबद आणि वहिवाटदार नेमणें ते कलेक्टरानें निवड करून किंवा पाळीपाळीनें किंवा वतनदारांनीं निवड करून किंवा कलेक्टरास योग्य वाटेल त्या इतर रीतीनें नेमावे ती नेमण्याची रीति ठरविण्याबाबद.

( क. ) वतनदारांचे सगळे मंडळीचे नावानें वतन दाखल करण्याचें सदर्हुप्रमाणें ठरलें असेल तेव्हां वतनदारांपैकीं एक किंवा अधिक लायक मनुष्यें किंवा इतर रीतीनें चाकरी करण्यासाठीं आपले नजरेस येईल त्याप्रमाणें ठरविलेले मुदतींत देण्याविषयीं वतनदारांस सांगण्याबद्दल आणि त्यांणीं त्याप्रमाणें न केलें तर सदर्हु प्रकारचीं मनुष्यें आपणच नेमण्याबाबद आणि त्या पैकीं कोणी किंवा त्यांचे बारच्यांपैकी कोणी कामाची हयगय किंवा कानाडोळा किंवा कपट केलें असतां सगळे मंडळीचे समाईक जबाबदारीविषयीं ठराव करण्याबाबद.

( ड. ) वहिवाटदार नेमणें व त्यांचा मेहनताना व त्यांस दंड करणें व त्यांचे चाकरीची मुदत व त्यास बर्तर्फ करणें व त्यांचे जागेवर बदली ठेवणें व त्यांस गैरहजीर राहण्याची रजा देणें यांसंबंधीं सर्व बाबतींत व तसेंच इतर बाबतींत काम करण्याबाबद संपूर्ण अखत्यार आहे. आणि या सर्व बाबतींत तो जो हुकूम करील ते सर्व अखेरचे आहेत असें समजावें.

( पुढें चालू. )

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.